# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०७/२०१३** **दिनांक ३०.०३.२०१३**

**स्थळ - जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०५.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दि.३०.०३.२०१३ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-५९५५-२०१३, दिनांक २८ मार्च, २०१३ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दि.३०.०३.२०१३ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष, श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य
०३. किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २६.०२.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.२६२** दिनांक २६.०२.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, ते वाचून कायम करताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(०१) निर्णय क्र.१५७ मध्ये-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या मंजुर आकृतीबंधानुसार ०५ प्रशासकीय अधिकारी पदे मंजुर असून त्यापैकी ०४ पदे रिक्त आहेत. ०५ प्रशासकीय अधिकारी पदांमध्ये ०२ पदे राखीव असून त्यापैकी ०१ पद भरलेले आहे व खुल्या प्रवर्गातील तीनही पदे रिक्त आहेत. यासाठी सेवाजेष्ठतेप्रमाणे ०१ राखीव पदासाठी श्री.सुभाष नारायण गर्कल व खुल्या प्रवर्गातील ०३ पदांसाठी सर्वश्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, उत्तम पंढरीनाथ गोंदकर व दिलीप त्रिंबक उगले या कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांसाठी प्रशासकीय अधिकारी पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येऊन त्यांना विभागांची वाटणी करुन देण्यात यावी व त्यांना सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार असे पर्यंत दि.२३.०५.२००६ रोजीचे शासन निर्णयास अनुसरुन प्रशासकीय अधिकारी या पदाच्या संभाव्य वेतनाच्या ५% दराने परंतु दरमहा रु.७५०/- मात्र एवढया मर्यादेपर्यंत अतिरिक्त/ विशेष वेतन देण्यात यावे.

तसेच, ते सध्या सांभाळत असलेले विभाग त्यांचेकडेच ठेवणेत यावे व त्यांचे खालोखाल काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना संबंधीत विभागाचे काम सांभाळणेस सांगणेत यावे. सहा महिन्यांमध्ये त्यांचे कामाचे मुल्यमापन करुन उपरोक्त कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांना प्रशासकीय अधिकारी या पदांवर पदोन्नती देणेबाबत विचार करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे,**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या मंजुर आकृतीबंधानुसार प्रशासकीय अधिकाऱ्यांची ०५ पदे असून त्यापैकी ०४ पदे रिक्त आहेत. ०५ प्रशासकीय अधिकारी पदांमध्ये ०२ पदे राखीव असून त्यापैकी ०१ पद भरलेले आहे व खुल्या प्रवर्गातील तीनही पदे रिक्त आहेत. यासाठी सेवाजेष्ठतेप्रमाणे ०१ राखीव पदासाठी श्री.सुभाष नारायण गर्कल व खुल्या प्रवर्गातील ०३ पदांसाठी सर्वश्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, उत्तम पंढरीनाथ गोंदकर व दिलीप त्रिंबक उगले या कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांसाठी प्रशासकीय अधिकारी पदांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येऊन त्यांना विभागांची वाटणी करुन देण्यात यावी व त्यांना सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार असे पर्यंत दि.२३.०५.२००६ रोजीचे शासन निर्णयास अनुसरुन प्रशासकीय अधिकारी या पदाच्या संभाव्य वेतनाच्या ५% दराने परंतु दरमहा रु.७५०/- मात्र एवढया मर्यादेपर्यंत अतिरिक्त/ विशेष वेतन देण्यात यावे.

तसेच, प्रशासकीय अधिकारी पदे भरणेसाठी यापुर्वी झालेल्या निर्णयानुसार रिक्त असलेल्या काही पदांवर शासनाकडून योग्य व लायक अधिकारी प्रतिनियुक्तीने घेणेसाठी महाराष्ट्र शासनाकडे पत्रव्यवहार करावा व उर्वरित पदांसाठी गुणवत्तेनुसार योग्य मार्ग अवलंबुन लेखी/ मौखिक परिक्षा घेण्यात येऊन सदर जागा भराव्यात.

उपरोक्त चारही जागांकरिता अतिरिक्त पदभार दिल्याने त्या पदावर उपरोक्त कर्मचाऱ्यांचा हक्क निर्माण होणार नाही, अशी लेखी समज त्यांना देण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**विषय नं.०२** **दिनांक ०७.०३.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.२६३ दिनांक ०७.०३.२०१३ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०३ नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता माहे, जानेवारी-२०१३**

**(ब) माहे फेब्रवारी -२०१३ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(क) माहे फेब्रवारी-२०१३, मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(A)** माहे जानेवारी-२०१३, जमा रु.३८,०१,६२,६१२/- आणि खर्च रु.२०,५३,४५,७०६/ चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील माहे जानेवारी - २०१३ मधील रुपये २,४९,१८२/-चा तक्ता, दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या माहे फेब्रुवारी-२०१३ मधील जमा रु.१२,२२,७०,३६९/- चा तक्ता तसेच, माहे फेब्रुवारी-२०१३ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तु यांच्या विक्रीचा रुपये १,७५,४२५/- मात्रचा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२६४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी-२०१३ या महिन्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**(B)** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे फेब्रुवारी-२०१३ मधील रुपये ४६,१९,९५९/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२६४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी -२०१३ मध्ये गरीब रुग्णांना वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(C)** साईनाथ रुग्णालयात फेब्रुवारी -२०१३ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण साठी रुपये १,८८,६७६/-, मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२६४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईबाबा रुग्णालयात माहे जानेवारी-२०१३ मध्ये गरीब रुग्णांना वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(D)** श्री साईबाबा रुग्णालयात माहे जानेवारी-२०१३ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.३९,९१,७६३/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२६४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. श्री साईनाथ रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात माहे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर- २०१२ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

**(E)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे ऑगस्ट-२०१२ मध्ये रुपये १,८०,४३२/-, सप्टेंबर,२०१२ मध्ये रुपये २,१४,०५७/-, ऑक्टोबर मध्ये २०१२ रुपये १,८०,८११/- नोव्हेंबर, २०१२ मध्ये रु.१,९४,७४६/- व माहे डिसेंबर-२०१२ मध्ये रु.१,२५,०१०/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.२६४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०६. श्री साईबाबा रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात माहे ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर- २०१२ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

**(F)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे ऑगस्ट-२०१२ मध्ये रुपये ११,६२,५५४/-, सप्टेंबर,२०१२ मध्ये रुपये १३,२०,१९७/-, ऑक्टोबर २०१२ मध्ये रुपये ११,९३,३८१/- नोव्हेंबर,२०१२ मध्ये रु. ११,७२,०५७/- व माहे डिसेंबर-२०१२ मध्ये रु. १०,३९,२२६/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.२६४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०७. माहे जानेवारी, फेब्रुवारी-२०१३ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**(G)** माहे जानेवारी व फेब्रुवारी-२०१३ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ५३,५२३ व ४८,०५४ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/ कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२६४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**०८. पाणी तपासणी अहवाल.**

**(H)** माहे फेब्रुवारी-२०१३ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.२६४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४ श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणेकामी आर्किटेक्टची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. ०७/०२/२०१३ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रक्कम रु. २ कोटी मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देणेत आली आहे. सदर कामासाठी फ्लोअरींगचे डिझाईन तयार करणे, सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन निविदा तयार करणे इ. सेवा पुरविणेकामी आर्किटेक्टची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यासाठी मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार पुणे येथिल इंटेरीअर डिझायनर आर्किटेक्ट धनश्री भजेकर यांना शिर्डी येथे मंदिर परिसराची समक्ष पहाणी करुन डिझाईन देणेकामी दूरध्वणीवर विनंती करण्यात आली होती. त्यानुसार शुभंकर एन्टरप्राईजेस पुणे यांचे आर्किटेक्ट धनश्री भजेकर यांनी दि. १८/०२/२०१३ रोजी शिर्डी येथे भेट देऊन मंदिर परिसरातील फ्लोअरींग करावयाचे भागाची समक्ष पाहणी केली. दि. २१/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये शुभंकर एन्टरप्राईजेस यांनी सदरहु प्रकल्पासाठी आर्किटेक्ट सेवा पुरविणेकामी प्रकल्पाचे अंदाजपत्रकाचे २.५% फी अधिक सर्व्हीस टॅक्स असा प्रस्ताव सादर केला आहे.

वरीलप्रमाणे प्रस्तावानुसार शुभंकर एंन्टरप्रायजेस, पुणे हे प्रकल्पाचे आर्किटेक्ट म्हणून डिटेल एस्टीमेट व टेंडर डॉक्यूमेंट तयार करणे, वर्किंग ड्रॉइंग व डिझाईन पुरविणे, क्वालीटी कंट्रोल, बिले तपासणी इ. सेवा पुरविणार आहेत.

संस्थानचे अलीकडचे कालावधीतील विविध (पूर्ण झालेले व सुरू असलेल्या) प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या आर्किटेक्ट यांना उपरोक्त प्रमाणे सेवा पुरविणेकामी २ ते २.५% आर्किटेक्ट फी अधिक सर्व्हीस टॅक्ससह अदा करणेत आलेली आहे / येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | प्रकल्पाचे नांव | आर्किटेक्टचे नांव | आर्किटेक्ट/प्रकल्प व्यवस्थापन फी |
|---|---|---|---|
| १. | साईगार्डन प्रकल्प | आर्किटेक्ट माथूर ॲण्ड कापरे असो. नवी दिल्ली | आर्किटेक्ट व प्रकल्प व्यवस्थापन फी- २.५% |
| २. | संस्थान निधीतुन शिर्डी बसस्थानक विकसीत करणे | काबरे चौधरी, आर्किटेक्टस, नाशिक | आर्किटेक्ट फी -२% |
| ३. | साईआश्रम प्रकल्प | आर्कि. डी. ओ. निकम, पुणे. | आर्किटेक्ट फी अधिक सर्व्हीस टॅक्स - ०.७५% |
| ४. | शिर्डी शहरातील रस्ते संस्थानमार्फत विकसित करणे | युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि. पुणे | आर्किटेक्ट व प्रकल्प व्यवस्थापन फी- २.५% |

तरी श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींग नुतनीकरणाचे कामाकरिता शुभंकर एन्टरप्रायजेस, पुणे यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करणे बाबत व त्यासाठी अदा करावयाचे फी बाबत मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींग नुतनीकरणाचे कामाकरिता आर्किटेक्ट म्हणून शुभंकर एन्टरप्रायजेस, पुणे यांची नेमणूक करणेत यावी. तसेच, सदरहु प्रकल्पासाठी आर्किटेक्ट सेवा पुरविणेकामी त्यांना प्रकल्प अंदाजपत्रकाचे २% फी + सर्व्हीस टॅक्स देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०५ लंडन (युके) येथे संस्थानचे अधिकृत माहिती केंद्र म्हणून साईभक्त श्री.राज यांनी चालविलेले माहिती केंद्रास मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** लंडन येथील रहिवासी साईभक्त श्री. राज यांनी त्यांचेकडील दिनांक ३१ ऑगस्ट २०१२ रोजीच्या पत्राने ते लंडन येथे श्री साईबाबांचे जीवन,त्यांचे कार्य,त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार त्यांनी स्थापन केलेल्या "व्दारावती" माहिती केंद्राव्दारे करीत आहेत, असे कळविले आहे. सदर केंद्रास संस्थानने अधिकृत मान्यता द्यावी म्हणून त्यांनी प्रस्ताव दिलेला आहे.

त्यात प्रामुख्याने खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

१) "व्दारावती" माहिती केंद्र हे श्री साईभक्तांची सर्व प्रकारे सेवा करीत आहे.

२) लंडन येथे जी इमारत आहे, ज्याठिकाणी व्दारावती माहिती केंद्र चालू आहे. ती इमारत शितल यांचेकडे भाडेकरु म्हणून आहे. संस्थानने सदर जागेचे भाडे अथवा इतर खर्च देण्याची आवश्यकता नाही.

३) सदर माहिती केंद्रासाठी संस्थानने लंडन निवासी संस्थानचा प्रतिनिधी म्हणून कोणा एकाची नेमणूक करणार असल्यास त्याला साधारणतः ५,०००/- रुपये पगार दरमहा देण्यात यावा. किंवा संस्थान जी ठरविल ती रक्कम दरमहा देण्यात यावी. सदर रक्कम शितल यांच्या नावाने पाठविणेत यावी. जर हे शक्य नसल्यास, ते त्यांचेकडील मनुष्यबळ वापरणार आहेत.

४) याठिकाणी संस्थानप्रमाणे साईचरित्राचे विनामुल्य वाटप करण्यात येते. तसेच संस्थानमध्ये जे जे उत्सव साजरे करण्यात येतात ते सर्व उत्सव या ठिकाणी साजरे करण्यात येतात.

५) ब्रिटनमध्ये दिवसे न दिवस साईभक्तांची संख्या वाढत आहे.भारताबाहेरच्या अशा आमच्या सारख्या संस्थाना संस्थानने प्रोत्साहन देण्यात यावे ही विनंती.

वरीलप्रमाणे त्यांनी बाबी नमुद केलेल्या आहेत.

**ब)** संस्थानतर्फे लंडन येथील रॉयल अल्बर्ट हॉल येथे दिनांक १९ सप्टेंबर २०१० रोजी "साईभजन संध्या" हा कार्यक्रम करण्यात आला. त्यावेळेस संस्थानचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य सदर कार्यक्रमास उपस्थित होते. सदरचा कार्यक्रम उत्कृष्ट झालेला आहे. सदर कार्यक्रमास साईभक्त श्री. राज यांनी मोलाचे सहकार्य केलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मध्ये समितीचे कर्तव्य व अधिकार कलम १७ (ब) श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबत उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील अशी तरतुद आहे.

सदर तरतुदीचा विचार करता साईभक्त श्री.राज यांनी लंडन येथे चालवित असलेले व्दारावती माहिती केंद्राला संस्थानचे अधिकृत माहिती केंद्र म्हणून मान्यत देणे उचित राहील.

साईभक्त श्री राज यांनी चालविलेले व्दारावती माहिती केंद्रास संस्थानने अधिकृत माहिती केंद्र अशी तत्वतः मान्यता दिल्यावर साईभक्त श्री राज यांचेकडून त्यांनी चालविलेले व्दारावती माहिती केंद्राचा पत्ता तसेच त्यांच्या आणखी काही अटी व शर्ती व त्यांचे आणखी काय कार्यक्रम आहेत याची माहिती संकलीत करण्यात येईल.

साईभक्त श्री राज यांनी लंडन येथे व्दारावती माहिती केंद्र म्हणून चालविण्यासाठी त्यांचे मनुष्यबळ वापरण्याच्या अटीवर संस्थानने अधिकृत मान्यता देणे उचित राहील.

खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

साईभक्त श्री राज यांनी येथे श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य याबाबत साईभक्तांसाठी चालविलेले माहिती केंद्र त्यांचेकडील मनुष्यबळ वापरण्याच्या शर्तीवर संस्थानचे अधिकृत माहिती केंद्र म्हणून मान्यता देणे अथवा न देणे.

**निर्णय क्र.२६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री. राज हे चालवित असलेले माहिती केंद्राची उद्दीष्टे काय आहेत, त्यांचे नियोजन कशा पध्दतीचे आहे, तसेच माहिती केंद्रास संस्थानची अधिकृत मान्यता कशासाठी आवश्यक आहे इत्यादी बाबतची विस्तृत माहिती त्यांचेकडून मागविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्री.बन्सीलाल अमृतलाल जैसवाल रा.बावनबुजुर्ग, तहसिल महराजगंज यांनी त्यांचे जमीन मौजे अतरेहटा येथील गट नं.११६५ मधील १००० चौरस मीटर जागा संस्थानला देणेबाबत दिलेला प्रस्ताव.**

**प्रस्ताव-** श्री. बन्सीलाल अमृतलाल जैसवाल यांनी त्यांची जमीन मौजे अतरेहटा तहसिल महराजगंज येथील जमीन संस्थानला दान देणेबाबत दिलेला पत्ररुपी प्रस्ताव दिनांक ०५ मार्च २०१३ रोजी प्राप्त झालेला आहे.

त्यांचा अर्ज व त्यासोबत दिलेले कागदपत्राचे अवलोकन केले असता खालील बाबी स्पष्ट होतात.

१. अर्जात त्यांनी साधारण १००० चौरस मीटर जागा संस्थानला मंदिर बांधणेकामी देणेबाबत प्रस्ताव दिलेला आहे. त्यांचे असेही म्हणणे आहे की, जर मंदीर बांधणे शक्य नसेल तर त्याठिकाणी दवाखाना बांधणेत यावा.

२. अर्जासोबत जोडलेले कागदपत्र पाहिले असता मौजे अतरेहटा तहसिल महराजगंज जिल्हा रायबरेली येथील आहे. त्याचा गट नं. ११६५ मी. असून क्षेत्र १.५२० आहे.

३. परिवर्तन संबंधी रकाना पाहिला असता त्यातील ० हे. २१० आर क्षेत्र शेती व्यवसायासाठी असून ०.१६९ भुमि अकृषिक कारणाकरिता वापरणेसाठी परवानगी मिळालेली आहे.

४. मु.न. २०९९/ १०/२.९.११ अन्वये गट नं. ११९५ पैकी १३८-९५चौरस मीटर क्षेत्रावरील श्री बन्सीलाल अमृतलाल यांचे नाव कमी करुन श्रीमती गीतादेवी जायसवाल रामचंद्र जायसवाल व श्रीमती सुनिता जायसवाल सुरेंद्र जायसवाल यांचे नांव दाखल केलेले आहे. यावरुन संपुर्ण क्षेत्र हे अर्जदाराचे मालकीचे नाही हे सिध्द होते.

५. संस्थानचे शिर्डी सोडून इतर ठिकाणी मंदीरे बांधणेचे सध्या तरी धोरण नाही.

६. प्रस्तुत जागा ही रायबरेली जिल्हयामधील आहे. त्याठिकाणी अर्जदाराने दवाखाना बाधणेबाबत प्रस्ताव दिलेला आहे. संस्थानचे सध्याचे मनुष्यबळ विचारात घेता संस्थानला इतक्या लांब ठिकाणी जागा जरी दान म्हणून मिळत असेल तरीदेखील दवाखाना बांधणे व तो कार्यान्वित करणे शक्य होणार नाही.

७. तसेच सदर जमिनीबाबत आणखी वाद असल्यास त्याची माहिती मिळवणे सहज शक्य होणार नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करुन अर्जदाराने देऊ केलेली दान म्हणून जमीन स्वीकारणे उचित होणार नाही.

याबाबत खालील बाबतीत निर्णय होणेस विनंती आहे.

श्री बन्सीलाल अमृतलाल जैसवाल यांची मौजे अतरेहटा तहसिल महराजगंज जिल्हा रायबरेली येथील दान म्हणून देण्यात येणारी जमीन गट नं. ११६५ पैकी क्षेत्र १००० चौरस मीटर स्विकारणे अथवा न स्विकारणे.

**निर्णय क्र.२६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. बन्सीलाल अमृतलाल जैसवाल, रा.बावनबुजुर्ग, तहसिल महराजगंज यांनी त्यांची मौजे अतरेहटा येथील गट नं.११६५ मधील १००० चौरस मीटर जागा संस्थानला देणगीदाखल देणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७ संस्थान मालकीच्या मौजे निमगाव कोऱ्हाळे व कनकुरी प्लॉटमधील विहीरींची खोली वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनाकरिता दिवसें दिवस साईभक्तांची मोठया प्रमाणात वाढ होत आहे. सार्वजनिक सुट्टयांचे दिवशी शिर्डी येथे अचानक मोठया प्रमाणात गर्दी होते. संस्थान मार्फत शिर्डी येथे येणा-या साईभक्तांची निवास व भोजन व्यवस्था माफक दरात करणेत येते. संस्थानचे निवासव्यवस्थेकरीता बांधण्यात आलेल्या इमारतीकरिता पाणी पुरवठा करणेकामी कनकुरी येथे साठवण तलाव असून सदर तलावातील पाण्याचे शुध्दीकरण करुन प्रत्येक भागातील इमारतीकरीता पाणी पुरवठा करणेकामी तयार करणेत आलेल्या अंडरग्राऊंड टाकीत सोडले जाते.

यावर्षी पावसाळयात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे महाराष्ट्रात सगळीकडे पिण्याचे पाण्याची तिव्र टंचाई भासत आहे. तसेच धरणामध्ये पाण्याचा साठाही कमी प्रमाणात आहे. त्यामुळे पिण्याचे पाण्याकरिता सोडण्यात येणारे कॅनालचे रोटेशन कमी दिवस चालणार आहे. पूर्वी ज्यादा दिवस कॅनालचे रोटेशन चालू राहात असल्याने संस्थानचे साठवण तलावाील पाण्याची लेव्हल बरेच दिवस स्थीर राहायची त्यामुळे पुढील रोटेशन पर्यंत पाण्याची कमतरता भासत नव्हती. शिर्डी येथे साईभक्तांची गर्दी दिवसेदिवस वाढत असल्याने पाण्याची गरजही वाढलेली आहे. मागील वर्षी जूनमध्ये पाण्याची कमतरता भासल्यामुळे संस्थानचे साठवण तलावा लगतचे विहीरीचे पाणी तलावात घेणेत आले होते. तसेच परिसरातील खाजगी विहीर मालकांचे विहीरीवरून पी.व्ही.सी पाईप लाईन टाकून पाणी घेणेत आले होते.

यावर्षी भीषण दुष्काळामुळे पिण्याची पाण्याची तिव्र टंचाई भासणार असल्याने संस्थानचे कनकुरी येथील साठवण तलावाची पाझर गळती थांबवावी लागेल तसेच संस्थानचे परिसरातील विहीरीची खोली वाढवावी लागेल याकामी संस्थानचे साठवण तलाव येथील ३ विहीरी तसेच साईगार्डन जवळील निमगांव-को-हाळे येथील गट नं. १८२ पैकीचे क्षेत्रातील व गट नं. २३५ येथील विहीरींची खोली १० ते १५ फुटापर्यंत वाढवावी लागेल. जेणेकरुन पाण्याची आवक वाढून साठवण क्षमताही वाढेल

उपरोक्तप्रमाणे एकूण पाच विहीरींची खोली १५ फुटापर्यंत वाढविणे कामी अंदाजे रु. ९,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी संस्थानचे कनकुरी व निमगांव-कोऱ्हाळे येथील विहीरींची खोली वाढविणे कामी येणारे अंदाजे रु. ९,००,०००/- मात्रचे खर्चास व याकामी कोटेशन मागविणेस मंजुरीस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या मौजे निमगाव कोऱ्हाळे, कनकुरी प्लॉटमधील ०५ विहीरींची खोली वाढविणेकरिता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०८ मंदिर परिसरातील मिटींग हॉल जवळील किचनचे नुतनीकरण करणे.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसरात जनसंपर्क कार्यालयाजवळ मिटींग हॉल व ट्रांझीट सुट १ ते ४ तसेच किचनची सुविधा करणेत आलेली आहे. मिटींग हॉलमध्ये वेळोवेळी मिटींग आयोजीत केलेल्या असतात. त्यावेळेस अल्पोहार चहा कॉफी इ. ची व्यवस्था करणेत येते. किचनची साईज वाढविणेकामी व किचनमधून मिटींग हॉलमध्ये येणेकामी किचनचे पूर्वेकडील लगतचे स्टोअर रुमची भिंत व टॉयलेट काढून घेणेत आले आहे. मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी किचनमध्ये सर्व सोयीयुक्त सुविधा तयार करणेबाबत खालीलप्रमाणे सूचना केल्या आहे.

१. किचनमधील भिंतीस पूर्ण उंचीपर्यत सिरॅमीक टाईल्स बसविणे

२. किचन प्लटफॉर्ममध्ये स्टोअरेज तयार करणे

३. किचनमध्ये साहित्य ठेवणेकामी वॉल कॅबीनेट तयार करणे

४. किचनमध्ये उत्तर बाजुकडील भिंतीस बेशीन बसविणे

याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No | Description | Qty | Uint | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Removing kotah stones from without bed concrete including coveying & stacking the materials | 27.00 | $M^2$ | 298/- | 8,046/- |
| 02 | Removing Ceramic tiles dado, without mortor including disposing of spoils | 25.00 | $M^2$ | 215/- | 5,375/- |
| 03 | Providing & laying vetrified tiles of size 600 mmx600 for flooring | 27.00 | $M^2$ | 780/- | 21,060/- |
| 04 | Providing & Fixing in required position dado of vetrified tiles 9 mm thk of size 600x300<br>1. Mosiac brown upto kitchan otta top<br>2. Mosiac Ivory upto slab level | 55.00 | $M^2$ | 1142/- | 62,810/- |
| 05 | Providing & Fixing kitchn Base Cabmate/ Trolly | 1 (4 Nos/ set) | Set | 32459/- | 32,459/- |
| 06 | Providing & Fixing in kitchen wall cabinate | 01 | No | 58474/- | 58,474/- |
| 07 | Providing & Fixing sink make nirali Elegance large, satin finish of size 1143 mmx508 mm including all connection with sinik cock of Johnson 'Avon' | 01 | No | 9400/- | 9400/- |
| 08 | Providing & applying Luster finish paint in two coats of approved color | 28.00 | $M^2$ | 170/- | 4760/- |
| | Total Rs | | | | 2,02,384/- |
| | Add 5 % % contengengences | | | | 10,119/- |
| | Total | | | | 2,12,503/- |

उपरोक्तप्रमाणे मंदिरपरिसरातील मिटींग हॉल जवळील किचनचे नूतनीकरणेकामी रक्कम रु.२,१२,५०३/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी याकामी येणारे खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील मिटींग हॉल जवळील किचनचे नुतनीकरण करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,१२,५०३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **संस्थानचे मुसळगांव ता.सिन्नर येथील पालखी थांब्याचे नुतनीकरण व परिसर विकास कामाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मुसळगांव ता. सिन्नर येथील पालखी थांब्याचे नूतनीकरण व परिसर विकासाचे काम ठेकेदार श्री. चंद्रशेखर भाऊसाहेब काजळे, मु.पो. शिंगणापूर ता. कोपरगांव यांना देणेत आले आहे. त्याचा संक्षिप्त तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | माहिती |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | संस्थानचे मुसळगांव ता. सिन्नर येथील पालखी थांब्याचे नूतनीकरण व परिसर विकास करणे |
| ०३ | ठेकेदार | श्री. काजळे चंद्रशेखर भाऊसाहेब मु.पो. शिगणापूर ता. कोपरगांव |
| ०४ | मंजुर निविदा रक्कम | रु.२१,७९,६४०/- |
| ०५ | कार्यादेश क्र. व दिनांक | जा.नं.३५८८ दि.०८/१०/२०११ |
| ०६ | करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दिनांक | दि.१५/०१/२०१२ |
| ०७ | प्रत्यक्ष काम सुरु केल्याचा दिनांक | दि.१५/०१/२०१२ |
| ०८ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | सहा महिने |
| ०९ | करारनामानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | दि.१४/०७/२०१२ |
| १० | विलंबापोटी दंडाची रक्कम | रु.५००/- प्रती दिवस (दि.३१/१२/२०१२ अखेर १७० दिवसांसाठी होणारी दंडाची एकूण रक्कम रु.८,५०००/-) |
| ११ | कामाची सद्यस्थिती | मुख्य शेड मधिल दोन रुमचे विट बांधकाम, आतील- बाहेरील प्लास्टर पूर्ण, खिडकीकरीता एम.एस. ग्रील तसेच शेडचे बाजुने टाटा ब्ल्यु स्कोप शिटचे क्लॅडींग करीता स्ट्रक्चरल स्टीलचे फॅबिकेशनचे काम पूर्ण त्यानंतर साईटवर दि.२५/०३/२०१२ पासून काम बंद आहे. |
| १२ | ठेकेदार यांनी कामाची गती वाढविणेबाबत व काम बंद असलेबाबत वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहाराचा तपशिल | १. इकडील जा.नं.६४६८ दि.२४/०३/२०१२ चे पत्र<br>२. इकडील जा.नं.४५८ दि.०३/०५/२०१२ चे पत्र<br>३. इकडील जा.नं.२१२९ दि.११/०८/२०१२ चे पत्र<br>४. इकडील जा.नं. २५८० दि.१०/०९/२०१२ ची नोटीस<br>५. जा.नं.४६५७ दि.०९/०१/२०१३ ची नोटीस |

ठेकेदार यांचे काम दि.२५/०३/२०१२ पासून इकडील बंद आहे. ठेकेदार यांना काम सुरु करुन विहीत मूदतीत काम पूर्ण करणेबाबत वेळोवेळी समक्ष तसेच उपरोक्त तक्त्यातील अ.नं.११ मधिल पत्रानुसार पाठपुरावा करणेत आला आहे. परंतू त्याबाबत ठेकेदार यांचेकडून कुठलाही प्रतिसाद मिळालेला नाही. ठेकेदार यांना इकडील जा.नं.४६५७ दि.०९/०१/२०१३ अन्वये नोटीस देणेत आलेली असून आपणांस देणेत आलेला कार्यादेश रद्द का करणेत येवू नये ? तसेच आपले जमा असलेली डिपॉझीट रक्कम जप्त करुन निविदा शर्तीनुसार आपणांवर कायदेशीर कारवाई का करण्यात येवु नये ? याचा लेखी खुलासा नोटीस मिळालेपासून सात दिवसांचे आत सादर करणेबाबत नोटीस देणेत आली आहे. परंतू याबाबत ठेकेदार यांनी अद्यापपर्यंत कुठलाही खुलासा सादर केलेला नसल्याने यावरुन त्यांची काम करण्याची इच्छा दिसून येत नाही. करीता ठेकेदार यांना दिलेला कार्यादेश रद्द करुन ठेकेदार यांची संस्थानकडे जमा असलेली डिपॉझीट रक्कम जप्त करणेबाबत तसेच याकामी उर्वरीत कामाचे नव्याने अंदाजपत्रक तयार करुन वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मुसळगांव, ता. सिन्नर येथील पालखी थांब्याचे नूतनीकरण व परिसर विकासाचे काम करणारे ठेकेदार श्री. चंद्रशेखर भाऊसाहेब काजळे, मु.पो. शिंगणापूर ता. कोपरगांव यांना दिलेला कार्यादेश रद्द करणेत येऊन, त्यांची अनामत रक्कम जप्त करणेत यावी. तसेच, उर्वरीत कामाचे नव्याने अंदाजपत्रक तयार करणेत यावे व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **श्री साईनाथ रक्तपेढीचे रक्त पिशवीचे दरात वाढ व काही रक्तघटकांचे दर कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढी सन २००० मध्ये सुरु करणेत आलेली आहे. रक्तपेढी सुरु करतेवेळी रक्तपिशव्या व रक्तघटकाचे दर निश्चीत करणेत आलेले आहेत. त्यानंतर गेल्या १२ वर्षात रक्तपेढीच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. सध्या रक्तपेढी विभागास रक्त साठविणेकामी आवश्यक असलेली रक्तपिशवीची किंमत, रक्तगट तपासणीसाठी लागणारे रिएजंट, रक्ताच्या चाचण्या करण्यासाठी येणारा खर्च, रक्त जुळवा जुळवी साठी लागणारे रिएजंट, नवीन अद्ययावत घेतलेली मशिनरी, मशिनरीजचा मेंटेनन्स, इलेक्ट्रीसिटी या सर्वावर होणारा खर्च विचारात घेता, सध्या असलेल्या रक्तपेढीच्या दरात वाढ करणे आवश्यक आहे.

तसेच काही रक्तघटकांचा वापर कमी होत आहे. हे रक्तघटक तयार करणेसाठी येणारा खर्चही कमी आहे. अशा रक्तघटकांचे दर कमी करता येईल.

श्री साईनाथ रक्तपेढीचे सध्याचे दर व रिझर्वेशन चार्जेस तसेच इतर रक्तपेढयांचे सध्याचे तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

श्री साईनाथ रक्तपेढीचे रिझर्वेशन चार्जेस - रु.५०/-

| Sr. No | Product | Shri Sainath Blood Bank | | Civil Hosp. A.nagar | | Anand Rushiji Hosp., A.nagar | | PMT Loni | | Rotory Blood Bank, Rahuri | | Jondhale Blood Bank, Shrirampur | | Jankalyan Blood Bank, A.nagr | | M G M Auran - gabad | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Charges Rs | | | | | | | | | | | | | | | |
| | | Full | Conc-ession | Full | Conc-ession | Full | Conc-ession | Full | Conc-ssion | Full | Conc-ession | Full | Conc-ession | Full | Conc-ession | Ful | Conc-ession |
| 1 | Whole Human Blood (WHB) | 450 | 400 | 425 | - | 850 | 700 | 400 | 400 | 1400 | 850 | 850 | 850 | 900 | 800 | 850 | 750 |
| 2 | Packed cells volume (PCV) | 500 | 400 | - | - | 850 | 700 | 400 | 400 | - | - | 850 | 850 | 900 | 800 | 850 | 750 |
| 3 | Fresh Frozen Plasma (FFP) | 500 | 400 | - | - | 550 | 400 | 500 | 500 | - | - | 400 | 400 | 750 | 650 | 400 | 300 |
| 4 | Human Plasma (HP) | 500 | 400 | - | - | - | - | 500 | 500 | - | - | 400 | 400 | 750 | 650 | 400 | 300 |
| 5 | Platelet Concen-trate (PLC) | 600 | 500 | - | - | 550 | 400 | 500 | 500 | - | - | 400 | 400 | 750 | 650 | 400 | 300 |
| 6 | Cryopr-ecipitate (CRYO) | 500 | 400 | - | - | - | - | 500 | 500 | - | - | -- | -- | 750 | 650 | 400 | 300 |

तसेच श्री साईनाथ रक्तपेढीचे दरात वाढ करणेसाठी सोबत जोडलेल्या पत्रा प्रमाणे संबंधितांचे मार्गदर्शन घेणेत आलेले आहे.

1. Guidelines for recovery of service charges for blood components by National Blood transfusion council.
2. Article on Prices of blood units in South East Asia

श्री साईनाथ रक्तपेढीस सध्या येत असलेला खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे -

Cost per unit for a single Blood bag

| Sr. No. | Items | Approximate service Charges Rs. |
|---|---|---|
| 01 | Blood bags (Empty)<br>Single Bag -Rs.70/- (WHB)<br>Double Bag - Rs.140/- (PCV+Plasma)<br>Triple Bag Rs.300/- (PCV+Plasma + Platlet)<br>Average cost for bag | Rs.200/- |
| 02 | HBV,HCV,HIV,VDRL,MP Testing | Rs.300/- |
| 03 | Donor Hemoglobin Testing | Rs.10/- |
| 04 | Blood grouping antisera Testing | Rs.30/- |
| 05 | Cross - matching Testing | Rs.50/- |
| 06 | Chemicals - each bag | Rs. 30/- |
| 07 | Stationery - each bag | Rs.20/- |
| 08 | Average salary | Rs.400/- |
| 09 | Power (approx) | Rs. 50/- |
| 10 | Equipment Maintainence | Rs.32/- |
| 11 | Glassware | Rs.10/- |
| | Total - | Rs.1132/- |

उपरोक्त प्रमाणे येणा-या खर्चाचा तसेच इतर रक्तपेढीत आकारल्या जाणा-या दराचे अवलोकन करुन श्री साईनाथ रक्तपेढीचे खालील प्रमाणे सुधारित दर आकारणी करता येईल.

नवीन प्रस्तावीत दर - (प्रस्तावीत रिझर्वेशन चार्जेस - रु.१००/- )

(सध्याचे रिझर्वेशन चार्जेस रु.५०/- इतके आहे.)

| Sr. No. | Product | Approx Cost / Unit | सध्याचे दर | | नवीन प्रस्तावीत दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Full Charge Rs. | Concession Charge (Voluntary Donation Card) Rs. | Full Charge Rs. | Concession Charge (Voluntary Donation Card) Rs. |
| 1 | Whole Human Blood (WHB) | 1132 | 450 | 400 | 650 | 600 |
| 2 | Packed cells volume (PCV/ SPRC) | 700 | 500 | 400 | 600 | 500 |
| 3 | Fresh Frozen Plasma (FFP) | 500 | 500 | 400 | 500 | 400 |
| 4 | Human Plasma (HP) | 300 | 500 | 400 | 300 | 200 |
| 5 | Platelet Concen-trate (PLC) | 600 | 600 | 500 | 600 | 500 |
| 6 | Cryoprecipitate (CRYO) | 300 | 500 | 400 | 300 | 200 |

तरी श्री साईनाथ रक्तपेढीचे दरात प्रस्तावीत केल्याप्रमाणे अ.नं.१ व २ मध्ये वाढ करणेस व अ.नं. ३ व ५ चे दर आहे तेच ठेवणेस तसेच अ.नं.४ ते ६ मध्ये घट करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीमधील प्रस्तावात नमुद केलेले अ.नं. १,२,३ व ५ चे दर पुर्वीप्रमाणे आहे तेच ठेवणेत यावे. तसेच, अ.नं.४ व ६ चे नवीन प्रस्तावित केलेप्रमाणे सुधारीत दरांची आकारणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.११** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता थ्री सिटर चेअर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील बाहय रुग्ण विभागात विविध प्रकारच्या ओ.पी.डी मध्ये रुग्ण अथवा रुग्णांचे नातेवाईकांना ब-याच वेळा बसण्याचे जागे अभावी उभे राहावे लागते. सध्या तेथे असलेले थ्री सिटर चेअरची संख्या कमी पडत आहे. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालय विभागाने ५० नग थ्री सिटर चेअरची त्यांचे दि.०८/०२/२०१३ रोजीचे मागणी पत्रान्वये मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाकरिता लागणारे थ्री सिटर खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविण्यात आले होते व सदर कोटेशन हे मा. त्रिसदस्य समिती सभा दि.०८/१२/२०१२ रोजी उघडून चर्चा वाटाघाटी करण्यात आल्या होत्या. व सदर सभेत चर्चा वाटाघाटी नंतर निर्णय क्र. ९८७ अन्वये नमुन्याची समक्ष पाहणी करुन अंतीम निर्णय घेऊन खरेदी करण्यात यावे असे ठरले होते. सदर थ्री सिटर चेअरचे नमुने वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षक यांनी समक्ष पाहणी केली असून M/s. Metro Metal Industries, Aurangabad यांचे निम्नतम दर रक्कम रु.३२०८.५० असलेला नमुना समधानकारक असून त्यानुसार २५ नग थ्री सिटर चेअर खरेदीचा पत्र क्र.८९७४ दि.२२/०२/२०१३ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

सदर २५ नग थ्री सिटर चेअरची सध्या श्री साईबाबा रुग्णालयात आवश्यकता नाही. त्यामुळे सदर २५ नग थ्री सिटर चेअर श्री साईनाथ रुग्णालयास देता येतील तर उर्वरित २५ नग चेअर M/s. Metro Metal Industries, Aurangabad यांचे देय मंजुर दर प्रति नग रु.३२०८.५०/- या दराने खरेदी करता येतील.

तरी उपरोक्त २५ नग थ्री सिटर चेअर M/s. Metro Metal Industries, Aurangabad यांचे मंजुर दर रक्कम रु. ३२०८.५० या प्रमाणे खरेदीस व याकामी येणाऱ्या पुर्णांकीत रक्कम रु ८०२१३/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील बाहय रुग्ण विभागात विविध प्रकारच्या ओ.पी.डी. मध्ये रुग्ण अथवा रुग्णांचे नातेवाईकांना बसणेकरीता २५ नग थ्री सिटर चेअर M/s. Metro Metal Industries, Aurangabad यांचे रु.३,२०८.५० मात्र प्रति थ्री सिटर चेअर या मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु ८०,२१३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१२** **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरीता Old Video Gastroscope with Accessories Buyback करुन नविन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी Video Gastroscope with Accessories ची आवश्यकता असते. सध्या त्यांच्याकडे असलेले OGD Scope सन १९९९ साली M/s. J. Mitra, Mumbai यांचेकडुन रु.४,६०,०००/- खरेदी केला होता. सदर Gastroscope हा १३ वर्ष जुना असून तो वापरुन खराब झालेले आहे. त्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करतांना अडचणी येतात. त्यांनी औषध भांडार प्राप्त दि.२३/०७/२०१२ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग Video Gastroscope with Accessories ची मागणी केलेली आहे.

सदर Video Gastroscope with Accessories खरेदीकामी M/s. Olympus Medical Systems India Pvt. Ltd., Gurgaon यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Olympus Medical Systems India Pvt. Ltd., Gurgaon यांनी पत्र क्र. HWPL/OLYMP/W१२१३/१२० दि.१२/०९/२०१२ चे पत्रान्वये सदर Video Gastroscope with Accessories चे दर कळविलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Item | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Video Gastroscope with Medical Grade Monitor & Trolley (old OGD Scope Buyback) | 1 | 682500.00 | 682500.00 |
| | Buyback Value of Old Machine | | | |
| | | | Total Amt. in Rs. | 682500.00 |

उपरोक्त ०१ नग Video Gastroscope with Accessories खरेदीकामी अंदाजे रु.६,८२,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी ०१ नग नविन Video Gastroscope with Accessories विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व जुना Video Gastroscope with Accessories हा Buyback करुन याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.६,८२,५००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागामधील Old Video Gastroscope with Accessories Buyback करणेत येऊन, नवीन Video Gastroscope with Accessories खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले. तसेच, याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,८२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१३** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Revolving Chair खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील अधिक्षक कार्यालयाने दि.०८/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये ५५ नग Revolving Chair- Half Back Support ची आणि ०३ नग Revolving Chair - Full Back Support ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे असलेल्या खुर्च्यांपैकी काही खुर्च्या वापरुन खराब झालेल्या आहेत. तर काही विभागात कमी पडत आहे. त्यामुळे वरील प्रमाणे मागणी आहे.

मा. त्रिसदस्य समिती सभा दि.८/१२/२०१२ निर्णय क्र. ९६९ मंजुरीन्वये सध्या श्री साईबाबा रुग्णालयाकरिता अशाच प्रकारच्या २६ नग Revolving Chair - Half Back Support गोदरेज कंपनीच्या M/s. Sai Enterprises, Shrirampur व ०७ नग Revolving Chair - Full Back Support हया M/s. Metro Metal Industries, Aurangabad यांचेकडुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे व त्यानुसार २६ नग Revolving Chair - Half Back Support गोदरेज कंपनीच्या M/s. Sai Enterprises, Shrirampur यांना इकडील पत्र क्र. ८८४१ दि.१६/०२/२०१३ अन्वये प्रती नग रु.३९९९/- तर ०७ नग Revolving Chair - Full Back Support हया M/s. Metro Metal Industries, Aurangabad यांना इकडील पत्र क्र. ८८५५ दि.१९/०२/२०१३ अन्वये प्रती नग रु.६१८८.०० या प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तेव्हा सदर दोन्ही प्रकारच्या Revolving Chair वरील मंजुर दराने खरेदी करता येतील.

उपरोक्त मंजुर दराने ५५ नग Revolving Chair - Half Back Support खरेदीकामी रक्कम रु.२,१९,९४५.०० इतका तर ३ नग Revolving Chair- Full Back Support खरेदीकामी रक्कम रु.१८,५६४.०० इतका असा एकत्रीत रक्कम रु. २,३८,५०९/- इतका खर्च येईल.

तरी उपरोक्त दोन्ही प्रकारच्या Revolving Chair मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या एकत्रीत रक्कम रु. २,३८,५०९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील अधिक्षक कार्यालयाकरिता आवश्यक असलेल्या ५५ नग Revolving Chair- Half Back Support व ३ नग Revolving Chair- Full Back Support मागील मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या एकत्रित रक्कम रु.२,३८,५०९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४ श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरीता Shadowless Lamp खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी विभागाने वेगवेगळया प्रकारच्या (गायनॅक ऑर्थोपेडीक व जनरल इ.) शस्त्रक्रिया करणेकामी Shadowless Lamp ची आवश्यकता असते. सदरचे Shadowless Lamp हे सन १९९९ साली खरेदी केले होते. परंतु सदर Shadowless Lamp हे वापरुन खराब झालेले आहे. त्यामुळे त्यांनी दि.०३/०९/२०१२ रोजीचे मागणीपत्रान्वये ०३ नग Shadowless Lamp ७ + ४ Dome ची मागणी केलेली आहे.

सदर Shadowless Lamp ची अंदाजे किंमत प्रती नग रु.३,००,०००/- इतकी असून ०३ नग Shadowless Lamp करिता अंदाजे रु. ९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Item | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Shadowless lamp ( Gynaec- 2 & Surgery- 1) (Min. 2.50 Lux.) | 3 | 300000.00 | 900000.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 900000.00 |

उपरोक्त ०३ नग Shadowless Lamp खरेदीकामी अंदाजे रु.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा ०३ नग Shadowless Lamp विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ९,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरीता आवश्यक असलेले ०३ नग Shadowless Lamp विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१५ श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थो ओ.टी. विभागाकरीता Pneumatic Drill System खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थो ओटी विभागात Pneumatic drill system ची आवश्यकता आहे. सध्या त्यांच्याकडे असलेले Pneumatic drill system सन २००६ मध्ये रु.५७५०५८/- इतक्या किंमतीत खरेदी केलेले होते. परंतु ते वापरुन खराब झालेल्या असल्यामुळे त्यांनी दि.१६/०१/२०१३ चे मागणीपत्रान्वये ०१ नग Pneumatic drill system ची मागणी केलेली आहे.

सदरचे Pneumatic drill system खरेदीकामी M/s. Synthes Medical Pvt. Ltd., Gurgaon यांचेकडुन अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Synthes Medical Pvt. Ltd., Gurgaon यांनी दि.१७/०१/२०१३ चे ईमेल पत्रान्वये सदर Pneumatic drill system चे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Item | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Pneumatic drill system | 01 | 3,50,000.00 | 3,50,000.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 3,50,000.00 |

उपरोक्त ०१ नग Pneumatic drill system खरेदीकामी अंदाजे रु.३,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा ०१ नग Pneumatic drill system विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थो ओ.टी. विभागाकरीता आवश्यक असलेली ०१ नग Pneumatic Drill System विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. ३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१६ श्री साईबाबा रुग्णालयाचे ऑर्थो ओ.टी. विभागाकरिता Battery Operated Drill मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि.१०/०१/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये वरील प्रकारचे एक Battery Operated Drill ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या एकच Battery Operated Drill मशिन आहे. व ते जर खराब झाले तर व दुरुस्ती होऊन येणेस वेळ लागला तर रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणुन एक पर्यायी उपलब्धता (Standby) ठेवणेसाठी मागणी केलेली आहे.

याकामी अंदाजे खर्चासाठी १) M/s. Staan Bio-med Engineering Pvt.Ltd., Coimbatore २) M/s. Spectravision Meditech, Nipani ३) M/s. Saili Surgical, Shirdi ४) M/s. Manman Mfg Co. Pvt. Ltd., Pune यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यापैकी M/s. Manman Mfg Co. Pvt. Ltd., Pune यांचे दरपत्रकातील Specification आपले मागणी प्रमाणे असुन दर देखील योग्य आहे. तेव्हा त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी अंदाजे रु.३,७३,९८६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No | Name of Item | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Battery Operated Drill<br>• Manman Universal Handpiece (Sushee) with R/F & speed control switch (Autoclavable) Manman Battery charger with 2 day capable of charging Li-ion Batteries (with mains cord) with volt meter. Manman Batteries 02 nos. (Non autoclavable) with autoclavable battery case.<br>• Manman cannulated Drilling Attachment max speed 1200 RPM & with Fixed S.S. Chuck (0-1/4") with Extra Manman chuck key.<br>• Manman Reaming Attachment with max. speed 400 RPM Cannulated & AO type quick coupling<br>• Manman Saggital saw Attachment (Set of five blades) | 01 | 3,73,986.00 | 3,73,986.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 3,73,986.00 |

तरी सदरचा ०१ नग Battery Operated Drill विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३,७३,९८६/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाचे ऑर्थो ओ.टी. विभागाकरिता आवश्यक असलेले ०१ नग Battery Operated Drill मशिन विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. ३,७३,९८६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७ ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आलेल्या परिचारीका/ परिचारक यांची ११ महिने कालावधीची नेमणूक संपुष्टात येत असलेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १२/०६/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४१६ नुसार ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक करण्यात आलेल्या परिचारक/परिचारीका यांचेबाबत वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय संचालक यांचे अहवालानुसार परिचारक/परिचारीका यांना पुढील ११ महिने कालावधीकरीता, याआधी देण्यात आलेल्या नेमणूक आदेशातील अटी-शर्तीनुसार तात्पुरती नेमणूक देण्यात यावी, असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयास अनुसरुन दि. २६/०६/२०१२ रोजीचे मंजूर टिपणीनुसार एकूण १८ परिचारक/ परिचारीका यांना पुढील ११ महिन्यांची नेमणूक देण्यात आलेली आहे. त्यांची सदर ११ महिने कालावधीसाठी नेमणूक माहे मे, २०१३ ते माहे सप्टेंबर, २०१३ दरम्यान संपुष्टात येत आहे. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | नाव | नेमणूक आदेश व दिनांक | हजर दिनांक | ११ महिने मुदत संपुष्टात येत असलेची तारीख |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | श्री विशाल निळकंठ कुलकर्णी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९०/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | ०३/०६/२०१२ | ०२/०५/२०१३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | कु. मनिषा स्टिफन आवारे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९३/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | ०५/०६/२०१२ | ०४/०५/२०१३ |
| ३ | कु. आशुमती संपत सदाफुले | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९२/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | ०६/०६/२०१२ | ०५/०५/२०१३ |
| ४ | कु. रिटा मॅन्युएल मुन्तोडे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९१/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | ०६/०६/२०१२ | ०५/०५/२०१३ |
| ५ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९५/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | ०७/०६/२०१२ | ०६/०५/२०१३ |
| ६ | कु. कांचन विनायक शिंदे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९४/२०१२ दि.३०/०६/२०१२ | ०९/०६/२०१२ | ०८/०५/२०१३ |
| ७ | श्री. आशिष शरद सुर्यवंशी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९७/२०१२ दि.३०/०६/२०१२ | ११/०६/२०१२ | १०/०५/२०१३ |
| ८ | श्रीमती सारीका फकीरा बनसोडे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९६/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | २७/०६/२०१२ | २६/०५/२०१३ |
| ९ | सौ. आशा रमेश जगताप | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९८/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | २९/०६/२०१२ | २८/०५/२०१३ |
| १० | कु. प्रतिमा रामचंद्र कोळगे | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/२९९/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | ०५/०७/२०१२ | ०४/०६/२०१३ |
| ११ | श्री. राहुल प्रकाश ओहोळ | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/३००/२०१२ दि. ३०/०६/२०१२ | १५/०७/२०१२ | १४/०६/२०१३ |
| १२ | कु. प्राजक्ता दिपक जाधव | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/६१०/२०१२ दि. १७/०९/२०१२ | ०८/०९/२०१२ | ०७/०८/२०१३ |
| १३ | सौ. रुपाली राजेंद्र गवळी | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/६११/२०१२ दि. १७/०९/२०१२ | १०/०९/२०१२ | ०९/०८/२०१३ |
| १४ | श्रीमती विजया उज्वल शेळके | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/६१२/२०१२ दि. १७/०९/२०१२ | १४/०९/२०१२ | १३/०८/२०१३ |
| १५ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/६१३/२०१२ दि. १७/०९/२०१२ | १७/०९/२०१२ | १६/०८/२०१३ |
| १६ | सौ. रुथ निलेश श्रीवास्तव | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/६१४/२०१२ दि. १७/०९/२०१२ | २७/०९/२०१२ | २६/०८/२०१३ |
| १७ | कु. कविता योसेफ पंडीत | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/७५२/२०१२ दि. ३१/१०/२०१२ | ११/१०/२०१२ | १०/०९/२०१३ |
| १८ | श्रीमती अलका भिमराव बिराजदार | जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/ एचआर/७५३/२०१२ दि. ३१/१०/२०१२ | १२/१०/२०१२ | ११/०९/२०१३ |

उपरोक्त अ.नं. ४ कु. रिटा मॅन्युएल मुन्तोडे ह्या दि. १७/०९/२०१२ ते ०६/०१/२०१३ या कालावधीत गैरहजर असून त्यांनी दि. ०७/०१/२०१३ रोजी कामावर हजर करुन घेणेबाबत अर्ज सादर केला आहे. त्यांची ११ महिने कालावधीची नेमणूक दि. ०५/०५/२०१३ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांना दि. ०५/०५/२०१३ अखेर काम करण्याची एक संधी देण्यात यावी, असा मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०७/०२/२०१३ रोजीचे सभेत निर्णय झालेला आहे. तसेच रिटा मुन्तोडे यांचे दि. ०६/०६/२०१२ ते दि. १६/०९/२०१२ या कालावधीतील त्यांचे काम समाधानकारक असलेबाबत वैद्यकिय संचालक यांचे अभिप्राय आहे.

वैद्यकिय अधिक्षक-श्री साईनाथ रुग्णालय व वैद्यकिय संचालक- रुग्णालये यांनी उपरोक्त परिचारक/परिचारीका यांचे कामकाजाबाबतचा गोपनीय अहवाल दिलेला असून त्यामध्ये त्यांचे काम समाधारकारक असून रुग्णालयांसाठी परिचारीकांची आवश्यकता असल्याने त्यांना पुढील ११ महिने कालावधीकरीता / नियमाप्रमाणे मुदतवाढ देण्यात यावी, असे नमूद केले आहे.

दि. २८/०१/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीनुसार दोन्ही रुग्णालयांसाठी स्टाफ नर्स या पदाच्या जागा भरणेच्या निर्णयास्तव मा. त्रिसस्यीय समितीचे ०७/०२/२०१३ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि, रुग्णालयांसाठी स्टाफ नर्स या पदांसोबत आवश्यक असलेली इतर पदे भरणेसाठी मा. उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे ॲप्लीकेशन दाखल करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही चालू आहे. तथापि, रुग्णालयांत स्टाफ नर्सची आवश्यकता असल्याने उपरोक्त स्टाफ नर्स यांना टप्या-टप्याने पुढील ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या नेमणूका देता येतील.

तरी, वैद्यकिय अधिक्षक- श्री साईनाथ रुग्णालय व वैद्यकिय संचालक- रुग्णालये यांनी दिलेल्या गोपनीय अहवालानुसार उपरोक्त तक्त्यातील परिचारक / परिचारीका यांना टप्या-टप्याने पुढील ११ महिने कालावधीसाठी पूर्वीचे आदेशातील अटी-शर्तीवर तात्पुरत्या नेमणूका देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८ संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना ९० दिवसांऐवजी १८० दिवस प्रसूती पगारी रजा मंजूर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे रुग्णालयांकडील महिला कर्मचाऱ्यांनी दि. ०६/०३/२०१३ रोजीचे अर्जान्वये राज्य शासनाच्या नियम क्र. अरजा१४०९/प्र.क्र.८/९/सेवा-६ दि. २४/०८/२००९ प्रमाणे प्रसुती रजेचा कालावधी १८० दिवस केलेला आहे. परंतु, श्री साईबाबा संस्थानमधील महिला कर्मचाऱ्यांना ९० दिवसच प्रसुती रजा मिळते. तरी सर्व महिलांची गरज व परिस्थिती लक्षात घेता ही रजा १८० दिवस मिळावी, अशी विनंती केली आहे.

संस्थान सेवा नियम ११९१ मधील कलम १३ व दि मॅटर्निटी बेनिफीट ॲक्ट १९६१ चे तरतुदीस अनुसरुन संस्थान सेवेत असलेल्या कायम अथवा रेग्युलर (प्रासंगिक व डेलीवेजेस तसेच कंत्राटी महिला कर्मचारी सोडून) महिला कर्मचाऱ्यास पूर्ण संस्थान सेवा कालावधीत शासन नियमाप्रमाणे ०२ बाळंतपणास ०६ महिने व एका बाळंतपणास ०३ महिने (१२ आठवडे) याप्रमाणे पगारी प्रसूती रजा (मॅटरर्निटी लिव्ह ) मंजूर करण्यात येते. दि मॅटरर्निटी बेनिफीट ॲक्ट १९६१ चे तरतूदीप्रमाणे सदर महिला कर्मचाऱ्याची प्रस्तावीत प्रसुतीपूर्वी कमीत कमी १२ महिने सेवा पूर्ण झालेली असावी व त्याकालावधीत कमीत कमी ८० दिवस काम केलेले असावे हे बंधनकारक आहे.

आता केंद्रशासनाने ०६ व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनातील महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजेचा कालावधी १३५ दिवसांवरुन १८० दिवसांपर्यंत वाढविला आहे. याच धर्तीवर राज्य शासनातील महिला कर्मचाऱ्यांना सध्या अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविणेबाबत महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाने शासन निर्णय क्र.अरजा-१४०९/ प्र.क्रः८/ ०९/ सेवा-६, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.२४ ऑगस्ट २००९. पारीत केला आहे. त्यात राज्य शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

०१) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ च्या नियम ७४ मधील तरतूदीनुसार राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविणेत यावी. या सुविधेचा लाभ फक्त दोन अपत्यांपूरताच मर्यादीत राहील. प्रसूती रजा मंजूर करण्याच्या इतर शर्ती पूर्वीप्रमाणे यापूढेही लागू राहतील.

०२) या सुविधेचा लाभ आदेश निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

०३) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील या संबंधातील विद्यमान तरतूदी या शासन निर्णयातील तरतूदीपुरते सुधारण्यात आले असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रितसर सुधारणा यथावकाश करण्यात येईल.

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे ९० दिवसाऐवजी १८० दिवस प्रसूती रजा मिळावी अशी संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी केली आहे.

त्यानुसार संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना ९० दिवसांऐवजी १८० दिवस प्रसुती रजा मंजूर करणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०३/२०१० रोजीचे सभेतमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र. ३२४ नुसार संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना सध्या अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसुती रजेची मर्यादा आहे तशीच ठेवण्यात यावी. त्यामध्ये वाढ करण्यात येऊ नये असा निर्णय झालेला आहे.

तरी, उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे संस्थान सेवेत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना शासन निर्णयाप्रमाणे ९० दिवसांऐवजी १८० दिवस प्रसूती रजा देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय क्र.अरजा-१४०९/ प्र.क्रः८/ ०९/ सेवा-६, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.२४ ऑगस्ट २००९ पारीत केला आहे. त्या निर्णयातील अटी/ शर्तीस अधीन राहुन अनुज्ञेय असलेली ९० दिवसांची प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसांपर्यंत वाढविणेत यावी. या सुविधेचा लाभ संस्थानमधील कायम महिला कर्मचाऱ्यांना दि.०१.०४.२०१३ पासून लागू करणेत यावा व प्रसुती रजा कालावधीमध्ये सदर कर्मचाऱ्यांच्या जागेवर ठेकेदारामार्फत बदली कर्मचारी घेण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच, संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवस प्रसूती पगारी रजा देणेसाठी शासन निर्णयातील अटी/ शर्ती यांचा अभ्यास करावा व यासाठी संबंधीत ठेकेदाराबरोबर चर्चा करणेत येऊन अशा प्रकारची किती प्रकरणे असतात इ. माहिती घेऊन, श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट यांचा कायदेशीर अभिप्राय घेण्यात यावा व सविस्तर प्रस्ताव पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/ अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१९ कोर्ट कामकाज अहवाल.**

**प्रस्ताव-** रुग्णालये व शैक्षणिक संस्थेमधील काही संस्थान कर्मचारी व अधिकारी यांनी संस्थानचे विरोधात विविध न्यायालयामध्ये तक्रार अर्ज/ पिटीशन दाखल केले होते. त्यामध्ये विविध न्यायालयाने संस्थानचे बाजूने निर्णय दिलेले आहेत. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे परिशिष्ट 'अ' म्हणून अवलोकनार्थ सादर केले आहे.

**निर्णय झालेल्या कोर्ट केसेस प्रकरणांची माहिती**

**परिशिष्ट अ**

| अ. नं. | तक्रारदार / अर्जदार यांचे नांव व कोणत्या कोर्टासमोर | तक्रार, रिव्हीजन नंबर, रिट पिटीशन नंबर | अर्जाचा विषय | निर्णय दिनांक | निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सौ.सुलोचना सुनिल तांबटकर, मा.मुंबई हायकोर्टाचे खंडपीठ, औरंगाबाद | रिट पिटीशन ३५२/२००८ | पदोन्नतीसाठी | १३.०१.२०१० | माघार / काढून घेतले |
| ०२ | श्रीमती मंदा जगन्नाथ शेळके, मा. मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर | तक्रार यु.एल.पी. ९८/२००१ | बदली आदेशा विरुध्द | १३.१०.२०१० | नामंजुर / डिसमिस |
| ०३ | श्री.देवकुमार शंकर साळवे, मा.मुंबई हायकोर्टाचे खंडपीठ, औरंगाबाद | रिट पिटीशन ५९०९/२०११ | बडतर्फीचे आदेशा विरुध्द | १३.०९.२०११ | माघार / काढून घेतले |
| ०४ | डॉ.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, मा.कामगार न्यायालय, अहमदनगर | तक्रार यु.एल.पी. ०७/ २०११ | बडतर्फीचे आदेशा विरुध्द अंतरीम आदेशासाठी अर्ज | २०.०९.२०११ | नामंजुर / डिसमिस |
| ०५ | श्री.बाजीराव कनलाल वाणी, मा.शाळा न्यायाधिकरण, सोलापुर | अपिल नं.१७/२०१० | पदोन्नतीसाठी | ०२.१२.२०११ | नामंजुर / डिसमिस |
| ०६ | डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, मा.कामगार न्यायालय, अहमदनगर | तक्रार यु.एल.पी.७४/ २०१० | टर्मिशन आदेशा विरुध्द अंतरीम आदेशासाठी अर्ज | १६.०७.२०११ | नामंजुर / डिसमिस |
| ०७ | श्री.देवकुमार शंकर साळवे, मा.कामगार न्यायालय, अहमदनगर | तक्रार यु.एल.पी.३४/ २०११ | बडतर्फी आदेशा विरोधात | ०९.०३.२०१२ | माघार / काढून घेतले |
| ०८ | सौ.सुलोचना सुनिल तांबटकर, मा.मुंबई हायकोर्टाचे खंडपीठ, औरंगाबाद | रिट पिटीशन १०३१८/ २०१० | पदोन्नतीसाठी | २०.०७.२०१२ | माघार/ काढून घेतले |
| ०९ | सौ.करुणा बाबाराव इंगळे, मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर | तक्रार यु.एल.पी.४३/ २००८ | पदोन्नतीसाठी | ०१.०९.२०१२ | नामंजुर / डिसमिस |
| १० | डॉ.ज्ञानेश्वर विश्वनाथ बोराडे, मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर | रिव्हीजन यु.एल.पी. ७८/ २०११ | अंतरीम आदेशा विरुध्द | ११.०१.२०१३ | नामंजुर / डिसमिस |
| ११ | डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर | रिव्हीजन यु.एल.पी. ५६/ २०११ | अंतरीम आदेशा विरुध्द | २३.०१.२०१३ | नामंजुर / डिसमिस |

**निर्णय क्र.२८० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२० श्री साईबाबा संस्थान रुग्णालयांमध्ये ए.आर.टी.सेंटर सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान रुग्णालय, शिरडी येथे PPP, ART सेंटर सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत मा. जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांनी मा.जिल्हा न्यायाधिश तथा अध्यक्ष, त्रिसदस्यीय समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांचे नावे जा.क्र.जिरुअ/ART Centre/PPP/ डापकु/ ११३२०/२०१२ दि.२९/१०/२०१२ अन्वये पत्र पाठविले आहे.

एच.आय.व्ही., एडस् संसर्गीत व्यक्तींना उपचार (ART) घेण्यासाठी ART केंद्रे चालविले जाते. सदर केंद्रात रुग्णांना आयुष्यभर एडस् वरील उपचार पुरविले जातात. या उपचारात सातत्य असणे, अत्यंत आवश्यक असते. परंतु एच.आय.व्ही. संसर्गामुळे रुग्ण आधीच मानसिक दृष्टया खचलेले असतात. तसेच शारिरीक स्थिती ठिक नसल्याने अशा रुग्णांना दुरचा प्रवास शक्य होत नाही. त्यामुळे अनेक रुग्ण उपचार अर्धवट सोडतात, असे मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांनी संदर्भीय पत्रात म्हटले आहे.

सध्या अहमदनगर जिल्हयात जिल्हा रुग्णालय व प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी अशा दोन ठिकाणी ART केंद्र सुरु आहेत. तसेच यासंदर्भात अधिक माहिती घेतली असता, कोपरगांव व श्रीरामपूर येथे Link ART सेंटर सुरु करणेत आलेचे समजते. सदर सेंटरमधुन रुग्णांना मोफत एडस् वरील औषधे दिले जातात. या सर्व ठिकाणी मिळून आजमितीस ११०८४ रुग्णांची उपचारासाठी नोंदणी झालेली आहे. प्रवरा मेडिकल ट्रस्ट, लोणी येथील ART केंद्रात राहाता, संगमनेर, अकोले येथील रुग्ण उपचार घेत आहे.

श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये ART केंद्र सुरु केल्यास राहाता तालुका, श्रीरामपुर, कोपरगांव, व काही प्रमाणात संगमनेर भागातील रुग्ण उपचार घेऊ शकतात असे मा. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी संदर्भीय त्यांचे पत्रात पुढे म्हटले आहे. परंतु नाशिक जिल्हयातील काही भाग उदा.येवला तालुका तसेच औरंगाबाद जिल्यातील काही भाग उदा वैजापुर तालुका येथील काही रुग्ण सुध्दा शिरडी येथील प्रस्तावीत ए.आर.टी सेटरमध्ये उपचारासाठी येतील असा अंदाज आहे कारण सदर तालुक्याचे, जिल्हयांचे ठिकाण शिरडीपेक्षा बरेच दुर आहे त्यामुळे अशा रुग्णांना शिरडी येथे येणे सोयीचे राहील. अशा

प्रकारे सध्याची रुग्ण संख्या तसेच नव्याने एच.आय.व्ही. संसर्गीत होणा-या रुग्णांचे प्रमाण लक्षात घेता, येथे दरमहा अंदाजे ५००० म्हणजेच दररोज सरासरी १९० रुग्ण उपचारासाठी येण्याची शक्यता आहे.

सध्या श्री साईनाथ रुग्णालयामध्ये जिल्हा रुग्णालयामार्फत सन २००६ पासून आय.सी.टी.सी सेंटर (एडस् समुपदेशन केंद्र) चालविले जाते. सदर केंद्रात सरासरी दर महा ४०० रुग्णांची मोफत एचआयव्ही तपासणी केली जाते. तसेच रुग्णांचे एडस् आजाराविषयी समुपदेशन केले जाते.

श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयामध्ये ART केंद्र सुरु करावयाचे झाल्यास खालील प्रमाणे व्यवस्था करावी लागेल.

(०१) जागा - ART सेंटर हे सामान्यतः वर्दळ नसलेल्या ठिकाणी असावे लागते. एडस रुग्णांविषयी समाजात असेलेल समज गैरसमज व Social Stigma विचारात घेऊन सदर केंद्रांची रचना करावी लागते. एडस् संसर्गीत बहुतांश रुग्णांना क्षय रोगाची लागण झालेली असते. अशा रुग्णांसाठी स्वतंत्र थुंकी तपासण्याची व्यवस्था- Designated Microscopy Centre (D.M.C) सुरु करावे लागेल. तसेच अत्यवस्थ एडस् संसर्गीत रुग्णांना भरती करणेसाठी किमान १० बेडचे नविन वार्डही सुरु करावे लागेल. तसेच सदर केंद्राच्या दैनदिन कामकाजासाठी प्रतिक्षालय, तपासणी कक्ष, समुपदेशन कक्ष, प्रशासकीय कक्ष, स्टाफ रुम, इ. करिता जागा उपलब्ध करावी लागेल.

याकरिता सध्या श्री साईनाथ रुग्णालयात जागा उपलब्ध नाहीत. याकरिता रुग्णालय परिसरतील पश्चिमेकडील मोकळया जागेत स्वतंत्रपणे बांधकाम करावे लागेल.

(०२) स्टाफ -ART Centre संबंधी उपरोक्त सुविधा देण्याच्या अनुषंगाने सदर केंद्र कार्यान्वीत करणेसाठी खालील प्रमाणे नव्याने मनुष्यबळाची नेमणुक करावी लागेल.

| | | |
|---|---|---|
| i) फिजिशियन | - | ०१ |
| ii) पॅथोलॉजीस्ट | - | ०१ |
| iii) वैद्यकीय अधिकारी (RMO) | - | ०२ |
| iv) फार्मासिस्ट | - | ०२ |
| v) (सोशल वर्कर) एम.एस.डब्ल्यु | - | ०१ |
| vi) लॅब टेक्नीशियन | - | ०२ |
| vii) स्टाफ नर्स | - | ०३ |
| viii) लिपीक टंकलेखक | - | ०१ |
| ix) मदतनीस | - | ०२ |

तरी श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये PPP/ART सेंटर सुरु करावे किंवा कसे याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ए.आर.टी. केंद्र सुरु करणेसाठी आवश्यक असलेली जागा संस्थानचे दोन्हीही रुग्णालय परिसरामध्ये सध्या उपलब्ध नसल्याने, नियोजित रुग्णालय प्रकल्प उभारणी करणेचे वेळेस ए.आर.टी. केंद्र चालु करणेबाबत विचार करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१** **रुग्णालयांमध्ये निवासी वैद्यकीय अधिकारी (आर एम ओ) यांच्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूका करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी वैद्यकिय संचालक, उप वैद्यकिय संचालक व श्री साईनाथ रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी आदि. पदे भरणेकामी दि.२६/०९/२०१२ रोजीचे पुण्यनगरी (पूणे), दि. २७/०९/२०१२ रोजीचे नवाकाळ (मुंबई), दि.२८/०९/२०१२ रोजीचे देशोन्नती (नागपूर) या वर्तमान पत्रांत तसेच संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन उमेदवारांकडून अर्ज मागविणेत आलेले होते. सदर जाहिरातीमध्ये आर एम ओंच्या ०७ जागांचा व सी एम ओच्या ०३ जागांचा समावेश करण्यात आला आहे.

मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचा CIVIL APPLICATION NO.१२०५६/ २०१२ मधील PIL No. १८/२०११ दि. १६/१०/२०१२ मधील Clause No. ६- नुसार स्थायी पदावर कायम कर्मचारी कोर्टाचे परवानगी शिवाय नेमता येणार नाही, असा आदेश झालेला असल्याने स्थायी पदावर आर एम ओंच्या नेमणूक करणेबाबत कार्यवाही चालू आहे.

सध्या दोन्ही रुग्णालयांत रुग्णांना वैद्यकिय सेवा पुरविणेकामी आर एम ओ कमी पडत आहे. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आर एम ओ या पदाच्या ५६ जागा मंजूर असून त्यापैकी १३ जागा रिक्त आहे. कोर्टाच्या आदेशानुसार आर एम ओंची नेमणूक करणेच्या प्रक्रियेस काहीसा कालावधी लागणार असल्याने तात्पुरते स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी आर एम ओंची नेमणूक करावी अशी मागणी प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी केली आहे.

आर एम ओ या पदावर ११ महिने कालावधीसाठी काम करण्यास तयार असलेलबाबत खालील उमेदवारांनी अर्ज सादर केलेले असल्याने दि. १५/०२/२०१३ व दि. ०१/०३/२०१३ रोजी सदर उमेदवारांच्या मुलाखती प्र. वैद्यकिय सचांलक, रुग्णालये, प्र. वैद्यकिय अधिक्षक-श्री साईनाथ रुग्णालय व डॉ. हरिष बजाज-हृदयरोग तज्ञ यांनी घेतलेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. नं. | उमेदवाराचे नाव व पत्ता | शैक्षणिक पात्रता | मुलाखतीत मिळालेले सरासरी गुण | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. पंकज सुभाषचंद्र कारेमोरे<br>नारायणधाम, राजेंद्र नगर,<br>तुमसर, जि. भंडारा | एमबीबीएस-२००३<br>डी आर्थो-२००६ | ०७ | श्री साईनाथ रुग्णालयासाठी निवड. |
| २ | डॉ. गणेश रामदास गव्हाणे<br>मु.पो.ता. राहुरी, ता. अहमदनगर | एमबीबीएस-२०१०<br>डीसीएच-२०१२ | ६.५ | श्री साईनाथ रुग्णालयासाठी निवड |
| ३ | डॉ. केतन राजेंद्र मालपाणी<br>६४५, बाजारपेठ, संगमनेर,<br>जि. अहमदनगर | एमबीबीएस-२०११ | ०५ | श्री साईनाथ रुग्णालयासाठी निवड. |
| ४ | डॉ. राजेश भाऊसाहेब गुडदे,<br>मातोश्री लक्ष्मी कॉलनी, एमएसईबी जवळ,<br>गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद | एमबीबीएस-२०१० | ०५ | श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी निवड |
| ५ | डॉ. दिग्विजय शिंदे<br>फ्लॅट नं. ३, बालाजी अपार्टमेंट, देवाचा मळा, संगमनेर, ता. संगमनेर<br>जि. अहमदनगर | एमबीबीएस-२०१० | ०५ | श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी निवड |
| ६ | डॉ. नितीन पंडीत लोणारे<br>२, मॉडेल फ्रेंडस् सोसा. समर्थ नगर कॉलेज रोड, नाशिक | एमबीबीएस-२०११ | ०४ | श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी निवड |
| ७ | डॉ. संतोष किशोर पोखरकर<br>शिवाजी नगर, मु.पो. ता. संगमनेर | एमबीबीएस-२०१० | ०४ | श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी निवड |

उपरोक्त उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या असून, त्यापैकी अ नं. ०१ ते ०३ चे उमेदवारांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे व अ.नं. ४ ते ७ चे उमेदवारांना श्री साईबाबा हॉस्पीटलकडे ११ महिने कालावधीसाठी आर एम ओ या पदावर घेऊन त्यांना मासिक रु. २७,०००/- मानधनावर कंत्राटी पध्दतीने घेण्यात यावे, असे प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांनी सुचविले आहे.

तरी, प्र. वैद्यकिय संचालक, रुग्णालये यांचे मागणीनुसार उपरोक्त उमेदवारांच्या संबंधीत रुग्णालयांकडे ११ महिने कालावधीसाठी आर एम ओ या पदावर कंत्राटी पध्दतीने मासिक रु. २७,०००/- मानधनावर नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२२ श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी.विभागाकरीता इन्स्ट्रुमेंट खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी विभागाने मागणीपत्रकान्वये विविध प्रकारच्या जनरल व नेफ्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे. कारण सदर इन्स्ट्रुमेंट त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत व सदर इन्स्ट्रुमेंटची शस्त्रक्रिया करतांना आवश्यकता भासते. त्यामुळे त्यांनी खालील इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Name of Item | Qty | Rate Per | Total Amount |
|---|---|---|---|---|
| | **A - General Instrument** | | | |
| 1 | Bone Cutter (Lions Jaw) double action | 2 | 3865.00 | 7730.00 |
| 2 | Bone Nibbler | 2 | 3750.00 | 7500.00 |
| 3 | Rib Raspater | 2 | 810.00 | 1620.00 |
| 4 | Adson Tooth Forcep 6″ | 4 | 505.00 | 2020.00 |
| 5 | Adson Plain Forcep 7″ | 4 | 520.00 | 2080.00 |
| 6 | Fine Needle Holder | 4 | 1315.00 | 5260.00 |
| 7 | Mixter Forcep Small | 4 | 485.00 | 1940.00 |
| 8 | Mixter Forcep Medium | 4 | 545.00 | 2180.00 |
| 9 | Mixter Forcep Large | 4 | 580.00 | 2320.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | Fine Dissecting Scissor 6″ | 4 | 580.00 | 2320.00 |
| 11 | Fine Dissecting Scissor 9″ | 4 | 765.00 | 3060.00 |
| 12 | Bone Finer | 2 | 1215.00 | 2430.00 |
| 13 | Varicose Vein Stripper | 8 | 1745.00 | 13960.00 |
| 14 | Tooth Forcep 6″ | 10 | 385.00 | 3850.00 |
| 15 | Tooth Forcep 7″ | 10 | 425.00 | 4250.00 |
| 16 | Tooth Forcep 8″ | 10 | 460.00 | 4600.00 |
| 17 | Fine Needle Holder 6″ | 4 | 1110.00 | 4440.00 |
| 18 | Fine Needle Holder 7″ | 4 | 1185.00 | 4740.00 |
| 19 | Fine Needle Holder 8″ | 4 | 1330.00 | 5320.00 |
| 20 | Loins Bone Nibbler Double Action | 2 | 4140.00 | 8280.00 |
| 21 | Hand Instruments Suction Cannula 10mm | 1 | 4725.00 | 4725.00 |
| 22 | Hand Instruments Suction Cannula 5 mm | 1 | 4200.00 | 4200.00 |
| 23 | Hand Instruments Suction Cannula 3 mm | 1 | 4200.00 | 4200.00 |
| 24 | Knel Graper 5mm | 2 | 2000.00 | 4000.00 |
| 25 | Knel Graper 3mm | 2 | 2000.00 | 4000.00 |
| 26 | Babcock 5mm | 2 | 6300.00 | 12600.00 |
| 27 | Babcock 3mm | 2 | 5775.00 | 11550.00 |
| 28 | Allies Forcep 5mm | 2 | 6300.00 | 12600.00 |
| 29 | Allies Forcep 3mm | 2 | 5775.00 | 11550.00 |
| 30 | Biopolar 5mm | 2 | 6825.00 | 13650.00 |
| 31 | Biopolar 3mm | 2 | 5775.00 | 11550.00 |
| 32 | Scissor 5mm | 2 | 6750.00 | 13500.00 |
| 33 | Scissor 3mm | 2 | 6187.50 | 12375.00 |
| 34 | Duckbell 5mm | 2 | 12600.00 | 25200.00 |
| 35 | Duckbell 3mm | 2 | 10000.00 | 20000.00 |
| 36 | Needle Holder (R) | 1 | 14175.00 | 14175.00 |
| 37 | Needle Holder (L) | 1 | 14175.00 | 14175.00 |
| 38 | Trocars (Sharp) 12mm | 4 | 29838.50 | 119354.00 |
| 39 | Trocars (Sharp) 10mm | 4 | 29838.50 | 119354.00 |
| 40 | Trocars (Sharp) 5mm | 6 | 27111.00 | 162666.00 |
| 41 | Trocars (Sharp) 3mm | 4 | 17734.50 | 70938.00 |
| 42 | Trocars (Sharp) Blunt | 2 | 17734.50 | 35469.00 |
| 43 | Reducer Tube or Cap 5-12 | 4 | 5649.00 | 22596.00 |
| 44 | Reducer Tube or Cap 10-5 | 4 | 8064.00 | 32256.00 |
| 45 | Reducer Tube or cap 10-3/5-3 | 2 | 5649.00 | 11298.00 |
| 46 | Laproscopic Maryland 5mm | 2 | 50032.50 | 100065.00 |
| 47 | Laproscopic Maryland 3mm | 2 | 52227.00 | 104454.00 |
| 48 | Laproscopic Hook 5mm | 1 | 11613.00 | 11613.00 |
| 49 | Laproscopic Hook 3mm | 1 | 6384.00 | 6384.00 |
| 50 | Vere's Needle | 2 | 7119.00 | 14238.00 |
| **B - Nephroscopy Instrument (Indian make)** | | | | |
| 1 | Clot Forceps | 2 | 31500.00 | 63000.00 |
| 2 | Triproance Forceps | 2 | 31500.00 | 63000.00 |
| 3 | Stone Removal Forceps | 4 | 25828.00 | 103312.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **13,23,947.00** |

उपरोक्त इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आलेले होते. त्यांचे दरपत्रकानुसार उपरोक्त इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी अंदाजे रु. १३,२३,९४७/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त इन्स्ट्रुमेंट विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १३,२३,९४७/- (अक्षरी - तेरा लाख तेवीस हजार नऊशे सत्तेचाळीस रुपये मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाद नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी.विभागाकरीता आवश्यक असलेले इन्स्ट्रुमेंट विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी**

**करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १३,२३,९४७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२३ सुधारित अंदाजपत्रक सन २०१२-१३ बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे कामकाज मा.त्रिसदस्य समिती पहात आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे:

*(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील.*

सन २०१२-१३ या चालू आर्थिक वर्षासाठी (माहे एप्रिल,२०१२ ते मार्च,२०१३ या कालावधीसाठी ) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा- खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ एप्रिल,२०१२ चे सभेतील निर्णय क्रमांक २८७ नुसार मंजुर करण्यात येऊन मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई व मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना सादर करण्यात आलेले आहे.

माहे डिसेंबर, २०१२ अखेर प्रत्यक्ष जमा-खर्चाचे अवलोकन केले असता काही बाबींवरील जमा व खर्च मुळ तरतुदींपेक्षा अधिक होतील अशी शक्यता असल्याचे/ झाल्याचे दिसुन येते. यामुळे याबाबींसाठीची मुळ तरतुद माहे मार्च, २०१३ अखेर अपुरी पडणार आहे. अंदाजपत्रकातील काही वाढीव खर्चाच्या बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१ **स्टेशनरी :-** विविध विभागांना लागणारी स्टेशनरीचे दरामध्ये झालेल्या वाढीमुळे खर्चात वाढ झालेली असुन १३.३७ लक्ष रुपयांची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने १८.३७ लक्ष रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

२. **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान खर्च:-** मंडप खर्च, किटकनाशक फवारणी आदी खर्चात झालेली वाढ तसेच या वर्षात बेडशीट,चादर खरेदी तसेच गादी नविन बनविल्यामुळे खर्चात झालेली वाढ यामुळे २५ लक्ष रुपयांची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ५५ लक्ष रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

३. **विद्युतगृह आकार:-** विदयुत साहीत्यात दरामध्ये झालेल्या वाढीमुळे खर्चात वाढ झालेली असुन ५३.३९ लक्ष रुपयांची केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ७२ लक्ष रुपयांची सुधारित तरतुद करण्यात आली आहे.

४. **बँक चार्जेस:-** बँक सेवामध्ये झालेली तसेच Online Donation यात वाढ झाल्याने २५ लक्ष रुपयांचे केलेली तरतुद पुरेशी नसल्याने ३० लक्ष रुपयांची सुधारीत तरतुद करण्यात आली आहे.

उर्वरित मध्ये संबंधित खर्चात सर्वसाधारण वाढ झाल्याने त्यात सुधारीत तरतुद करण्यात आलेली आहे.

इतर जमा वा खर्चाच्या बाबींवरील मुळ तरतुदींमध्ये काही बदल अपेक्षित नसल्याने त्या तरतुदींचा पुनर्उल्लेख करण्यात आलेला नाही.

तरी कृपया प्रस्तावित सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.२८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, प्रस्तावित सुधारित अंदाजपत्रकाच्या प्रति राज्य शासन व मा.धर्मादाय आयुक्त मुंबई यांचेकडे नोंद घेणेसाठी पाठविण्यात याव्यात,असे ठरले.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२४ सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे मुळ अंदाजपत्रक.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे कामकाज सध्या मा.त्रिसदस्य समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम-(२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतुद पुढील प्रमाणे आहे :

(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आाणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्तांकडे पाठवील.

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे आवश्यक आहे. सोबत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यातील जमा- खर्चाच्या ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत:

**जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१२-१३ | अंदाजपत्रक २०१३-१४ रक्कम | टक्के | वाढ / घट टक्के |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रारंभीची शिल्लक | १७,७७,१६,९७९ | ४,५५,००,००० | | |
| ०२ | देणगीद्वारे मिळणारी अपेक्षित जमा | ३४२,५२,७५,००० | ३४४,१३,२९,००० | ६६% | ०.४६% |
| ०३ | अपेक्षित महसुली जमा | १५५,१४,८०,००० | १७७,८९,००,००० | ३४ % | ४.३५% |
| ०४ | एकुण जमा (२+३) | ४९७,६७,५५,००० | ५२२,०२,२९,००० | १००% | ५% |
| ०५ | अपेक्षित निर्गंतवणुक | २२,८०,३२,०२१ | ०० | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०६ | **एकुण अपेक्षित जमा :**(१+४+५) | ५३८,२५,०४,००० | ५२६,५७,२९,००० | | |

**खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयात)

| अ. नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २०१२-१३ | अंदाजपत्रक २०१३-१४ रक्कम | टक्के | वाढ / घट टक्के |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अपेक्षित भांडवली खर्च | १६९,१७,७०,००० | १४६,०७,५६,००० | ३१% | -१४% |
| ०२ | अपेक्षित महसुली खर्च | ६०,८१,८९,००० | ७२,८३,८५,००० | १५% | २०% |
| ०३ | अपेक्षित किरकोळ खर्च | ७७,९०,००० | ७९,३४,००० | ०१% | २% |
| ०४ | न्यासाच्या उदीष्टांवरीलअपेक्षित खर्च | २६७,७२,०४,००० | २११,६९,३०,००० | ४५% | -२१% |
| ०५ | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | ३५,२०,५१,००० | ३८,७२,८३,००० | ८% | १०% |
| | एकुण खर्च (१ ते ५) | ५३३,७०,०४,००० | ४७०,१२,८८,००० | १००% | -१२% |
| ०६ | अंतिम शिल्लक | ४,५५,००,००० | ५६,४४,४१,००० | | |
| **एकुण अपेक्षित खर्च :-** | | ५३८,२५,०४,००० | ५२६,५७,२९,००० | | |

**ब)** अधिनियम २००४ चे कलम २२ (२) मधील तरतुदींनुसार, व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपुर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल.

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २०१३-१४ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधीतून होणारा संभाव्य खर्च या तरतुदीच्या अधिन राहुन करता येईल.

सन २००४-०५ ते २००९-१० या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव दाखल केलेले होते. त्यास शासन निर्णय क्र. सासंवि-२००९/५४७/(५७/०९)-का.सोळा. दिनांक २१ ऑगस्ट, २०१० अन्वये मान्यता मिळालेली आहे.सन २०१०-११_या आर्थिक वर्षात प्रायोजित बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानूसार वाढीव झालेला खर्च व्यवस्थापन निधीमध्ये वर्ग करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच सन २०११-१२ या आर्थिक वर्षात प्रायोजीत बाबीवर झालेल्या व लेखापरिक्षकांनी प्रमाणित केल्यानुसार झालेला खर्च हा तरतुदीपेक्षा कमी आहे. सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतुन होणांरा अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासना कडे प्रस्ताव दाखल करावा लागेल.

**क)** संस्थानच्या विविध विभागांनी साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या पायाभुत सुविधेत वाढ करणे तसेच त्यांना दळणवळण्याच्या विविध सोयी उपलब्ध करून देणे याकामी नगरपंचायती अंतर्गत कामास व इतर खर्चासाठी अनुदान शिर्षकाखाली खर्च प्रस्तावित केलेला आहे. श्री साईबाबा संस्थान अधिनियमातील कलम २१ अंतर्गत संबंधित विभागाकडून छाननी समितीच्या अभिप्रायानुसार शासनाकडून मंजुरी प्राप्त करुन घेण्याच्या अटीस अधीन राहून अंदाजपत्रकात अनुदान या शिर्षकाखाली भरीव तरतुद दर्शविण्यात आली आहे.

**ड)** मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३)(सी) ५ मधिल तरतुदीमध्ये पाच वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधाकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहीलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील पाच वर्षातील अखर्चित उत्पन्न रुपये ४३५ कोटी मात्र एवढे आहे. या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील तीन वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठयाप्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये वाढ झालेली दिसत आहे.

तथापी चालु वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५% खर्च व अखर्चित उत्पन्नाचे खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे. त्यामुळे सदरचे अखर्चित उत्पन्न वेळेत खर्च न केल्यास त्यावर आयकर लागु होउन तो भरणे क्रमप्राप्त होईल,अशा आयकराची रक्कमही मोठी असेल. तरी कृपया याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

अपेक्षित जमा व खर्चाच्या अंदाजपत्रकाची विवरणे, परिशिष्ट अ व ब म्हणून सोबत जोडण्यात आली आहेत.

तरी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व मा. त्रिसदस्य समितीच्या मंजुरीने राज्य शासन व मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे माहीतीसाठी पाठविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, प्रस्तावित मुळ अंदाजपत्रकाच्या प्रति राज्य शासन व मा.धर्मादाय आयुक्त मुंबई यांचेकडे नोंद घेणेसाठी पाठविण्यात याव्यात, असे ठरलें.** (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२५ सोने व चांदी नाण्यांच्या विक्री किंमतीचे बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रींची प्रतिमा असलेली सोन्याची ५ ग्रॅम, १० ग्रॅम वजनाची व चांदीची २० ग्रॅम वजनाची नाणी तसेच २.५ ग्रॅम सोन्याचे पेंडन्टस साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ अन्वये, सोने-चांदीच्या बाजाराभावात वेळोवेळी जसजशी वाढ अथवा घट होईल त्याप्रमाणात यांच्या विक्री मुल्यात वाढ अथवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये, दिनांक १८ सप्टेंबर, २०१२ ते १६ मार्च, २०१३ या कालावधीत सोने व चांदीचे बाजारभावात वाढ तथा घट (संदर्भः- दैनिक सकाळ) झाल्याने मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात वेळोवेळी, सोने-चांदी नाणी व पैडन्टसच्या विक्री मुल्यात बदल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रमाणे विक्री मुल्यात केलेल्या बदलाचे विवरण खालील प्रमाणे-

| अ. क्र. | दरात बदल केल्याचा दिनांक | सोने २.५ ग्रॅम | सोने ५ ग्रॅम | सोने १० ग्रॅम | चांदी २० ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | २६.०९.२०१२ | ८४००/- | १६६००/- | ३३०००/- | १३५०/- |
| ०२. | २४.११.२०१२ | ८६००/- | १७०००/- | ३३६००/- | १४००/- |
| ०३. | १७.०१.२०१३ | ८,२००/- | १६,२००/- | ३२,१००/- | १३००/- |
| ०४. | २३.०२.२०१३ | ७८५०/- | १५५००/- | ३०७००/- | **१२००/-** |

तरी सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेंडन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १८ सप्टे, २०१२ ते १६ मार्च, २०१३ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्यात्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने/ चांदीचे नाणी व पेंडन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दि.१८ सप्टे, २०१२ ते दि.१६ मार्च, २०१३ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलाची नोंद घेण्यात येऊन त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२६ गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे एप्रिल, २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे: -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | ४/४/२०१३ | १८,८१,०६,२८९/- |
| २) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ९/४/२०१३ | १३,७३,४४,५३३/- |
| ३) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १३/४/२०१३ | १७,६२,५२,७२०/- |
| ४) | बँक ऑफ बरोडा, नासिक | १३/४/२०१३ | १३,२७,१६,१८९/- |
| ५) | बँक ऑफ बरोडा, नासिक | १७/४/२०१३ | ३०,९६,७१,१०८/- |
| ६) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १९/०४/२०१३ | ६,६०,९४,७७०/- |
| ७) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २४/०४/२०१३ | २२,०३,१५,९००/- |
| ८) | कॅनरा बँक, शिर्डी | २६/०४/२०१३ | १६,५१,६८,४६९/- |
| ९) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे एप्रिल २०१३ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | एकूण रक्कम - | १,४९,५६,६९,९७८/- |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. १४९.५६ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने,

संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) इंडीयन बँक, शिर्डी
१३) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१४) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १४ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१४९.५६ कोटीची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीच्या सभेसमोर निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.२८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १४ या स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१४९.५६ मात्र कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.२७ साईनाथ छाया इमारतीसमोरील ओट्याच्या कडेने लोखंडी रेंलीग बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.प्रशासकिय अधिकारी साहेब (निवासस्थाने) यांनी स्वत: राऊंड घेऊन सुरक्षितता व स्वच्छतेबाबत निर्देश दिले. साईनाथ छाया इमारतीसमोरील ओट्यावर बाहेरील व्यक्ती बसून खाद्यपदार्थाची विक्री करतात, घाण करतात, केरकचरा टाकतात. त्यामुळे तेथे काम करणा-या कर्मचा-यांना व भक्तांना त्रास होतो. त्याकरिता साईनाथ छाया इमारतीसमोरील ओट्याच्या कडेने लोखंडी रेलींग तयार करुन मिळणेकामी साईप्रसाद निवासथान विभागाने दि.०९.०२.२०१३ चे डी.पी.क्र.६०२ नुसार कळविले आहे.त्यानुसार लोखंडी रेलींग तयार करुन बसविणेकामी चे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | जी.आय.राऊंड पाईप ,' बी ' क्लास.<br>साईज :- ४० एम.एम. | ३०० फुट | रु. १२०/-<br>(प्रति फुट ) | रु. ३६,०००/- |
| ०२) | जी.आय. राऊंड पाईप ,' बी ' क्लास.<br>साईज :- २५ एम.एम. | ५२०फुट | रु. ९१/-<br>(प्रति फुट ) | रु. ४७,३२०/- |
| ०३) | जी.आय.बेन्ड<br>साईज :- ४० एम.एम. | ३० नग | रु. १५०/-<br>(प्रति नग ) | रु. ०४,५००/- |
| | | | **एकुण रक्कम :-** | रु. ८७,८२०/- |

उपरोक्तप्रमाणे साईनाथ छाया इमारतीसमोरील ओट्याच्या कडेने लोखंडी रेंलीग बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु.८७,८२०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून उपरोक्त काम करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनाथ छाया इमारतीसमोरील ओट्याच्या कडेने लोखंडी रेंलीग तयार करुन बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलावून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.८७,८२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२८ परांच्या (Scaffolding) खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानमार्फत वर्षभरात तीन मुख्य उत्सव साजरे केले जातात. या उत्सवांमध्ये देखाव्यांवर प्रकाश झोत मारणेकरीता लोखंडी परांची (Scaffolding) तयार करुन त्यावर इलेक्ट्रीकल फिटींग लावल्या जातात. तसेच इतर वेळेच्या स्टेज कार्यक्रमांचे वेळेस स्टेजवरील प्रकाशव्यवस्थेकरीता परांचीचा उपयोग केला जातो.

आपणाकडे सदरील प्रकारच्या परांच्या उपलब्ध नसल्यामुळे बाहेरील ठेकेदारांकडून कामासाठी तात्पुरती परांची (Scaffolding) आणून काम पूर्ण करावे लागते. सदरील प्रकारच्या परांच्यांची (Scaffolding) आपणास नेहमीच गरज भासते. एक परांची १० फूटाची असून आपणाला कामासाठी २० फूटांची परांची आवश्यक असते. उत्सवात, श्री साई प्रसादालयात काम करतांना ४० फूटांची परांचीची आवश्यकता भासते. याकरीता १० फूट उंचीचे ०४ नग परांच्या (Scaffolding) खरेदी कराव्या लागणार आहेत. खरेदी कराव्या लागणा-या परांच्याचा (Scaffolding) तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. no. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| ०१) | Scaffolding with Platform Height - १० Feet Size :- ८`x३` | ०४ Nos. | Rs. ३७,५००.०० | Rs. १,५०,०००.०० |

उपरोक्तप्रमाणे १० फूट उंचीचे ०४ नग परांच्या (Scaffolding) खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.१,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे परांच्या (Scaffolding) खरेदी कोटेशन मागवून करावी लागणार आहे.

तरी सदरचे १० फूट उंचीचे ०४ नग परांच्या (Scaffolding) कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत विभागासाठी आवश्यक असलेले १० फूट उंचीच्या ०४ नग परांच्या (Scaffolding) विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२९ श्री साईनाथ रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक यांचे कक्षात नवीन ए.सी. बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक कक्षामध्ये बसविण्यात आलेल्या विंडो ए.सी.खुप जुना झाला असून, चालू स्थितीत त्याचा खुपच आवाज येतो, त्यामुळे कामकाजात व्यत्यय होतो. तसेच व्यवस्थीत कुलींग होत नाही. त्यासाठी सदर ठिकाणी ०२ टन क्षमतेचा स्प्लिट वॉल मॉऊंटेड नवीन ए.सी.बसविणेबाबत कळविलेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे मागणी केल्यानुसार मा.वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे कक्षात बसविणेसाठी आवश्यक असणारा ०२ टन क्षमतेचा स्प्लिट वॉल माऊंटेड ए.सी.विद्युत विभागाकडे सध्या शिल्लक नाही. त्यासाठी सदर ठिकाणी नवीन ए.सी.खरेदी करुन बसवावा लागणार आहे. खरेदी कराव्या लागणा-या ए.सी.चा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. no. | Discription | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| ०१) | Voltas Make, Split Wall Mounted, ३ Star, Air Conditionar Capacity : २ TR. | ०१ Nos. | Rs. ४३,०००/- | Rs. ४३,०००/- |

उपरोक्तप्रमाणे मा.वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे कक्षात बसविणेसाठी आवश्यक असणारा ०२ टन क्षमतेचा स्प्लिट वॉल माऊंटेड ए.सी.ची खरेदी कोटेशन मागवून करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रुपये ४३,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२९० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक यांचे कक्षामध्ये बसविणेसाठी ०२ टन क्षमतेचा स्प्लिट वॉल माऊंटेड ए.सी. विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३० समाधी मंदिर परिसरातील दक्षिण बाजूकडील कंपाऊंड भिंतीवर स्टेनलेस स्टील ग्रील बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१२.१२.२०१२ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयान्वये शिर्डी येथे श्री साईच्या दर्शनासाठी येणा-या भक्तांच्या गर्दीचे नियोजन व मंदिर, मंदिर परिसराचे सुरक्षा व्यवस्थेबाबत तसेच इतर सुट्टयांच्या/ सणाच्या दिवशी होणारी नगर-मनमाड रोड व इतर रोडवरील वाहतुक नियंत्रित करावयाच्या उपाय योजनाबाबत निर्णय क्र.११०५ अन्वये संमत झालेला आहे. सदरहू निर्णयानुसार केलेल्या कार्यावाही बाबत दि.३१.०१.२०१३ रोजी मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब, मा.पोलिस अधिक्षक साहेब, अहमदनगर,

पोलिस निरीक्षक शिर्डी पोलीस स्टेशन, वाहतुक नियंत्रण शाखा यांचे उपस्थितीत झालेल्या मिटींगमध्ये चर्चा होऊन मंदिर परिसराची पहाणी करण्यात आली. मा.पोलिस अधिक्षक साहेब., यांनी मंदिर परिसराचे दक्षिण बाजूकडील कंम्पाऊंड भिंतीवर सध्या असलेल्या स्टेनलेस स्टील ग्रीलमध्ये काही ठिकाणी गॅप आहेत, त्या ठिकाणी स्टेनलेस स्टील ग्रील बसविणेबाबत सुचना दिली आहे. तसेच सध्याची ग्रील काही ठिकाणी ढिली झालेली असून ती दुरुस्त करण्यात यावी अशी सुचना दिली आहे. याकामी दक्षिणबाजूकडील कंम्पाऊंड भिंतीचे खालील उर्वरीत भागात स्टेनलेस स्टील ग्रील बसविणे आवश्यक आहे, असे बांधकाम विभागाने दि.१२.०२.२०१३ चे पत्रानुसार विद्युत विभागास कळविले असून त्यानुसार नैवैद्य कोठीचे पश्चिम बाजू, गुरुस्थान गेटवरील भागात, दक्षिण बाजू महाव्दार क्र. ४ ते नगर मनमाड रस्त्यापर्यंत स्टेनलेस स्टील ग्रील तयार करुन बसविण्याचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशिल | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप साईज :- ४०x २ एम.एम. | ७५० फुट | रु. ३००/- (प्रति फुट ) | रु. २,२५,०००/- |
| ०२) | स्टेनलेस स्टील राऊंड पाईप साईज :- ३३x १.६ एम.एम. | १३०० फुट | रु. २००/- (प्रति फुट ) | रु. २,६०,०००/- |
| ०३) | स्टेनलेस स्टील भाले ३० एम.एम. राऊंड | ४०० नग | रु. १००/- (प्रति नग ) | रु. ०,४०,०००/- |
| | | **एकुण रक्कम :-** | | रु. ५,२५,०००/- |

उपरोक्तप्रमाणे स्टेनलेस स्टील ग्रील बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रु. ५,२५,००० /- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावास व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलाविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर परिसरातील दक्षिण बाजूकडील कंपाऊंड भिंतीवर सुरक्षीततेच्या दृष्टीने स्टेनलेस स्टील ग्रील बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स /वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ५,२५,००० /- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३१ साईआश्रम भाग ०१ व ०२ कडील एअरपोर्ट टाईप लगेज ट्रॉली पुरविणेचे कामाचे बीलातून दंड वसुल करुन राहिलेली फायनल बीलाची रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या समितीच्या दिनांक १९-०२-२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेत विषय क्र.१३ निर्णय क्र.१८३ अन्वये साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ करिता २४० नग एअरपोर्ट टाईप लगेज ट्रॉली पुरविणेकामी मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांना जा.नं.एसएसएस / विद्युत / ३३६ / २०१२ दिनांक २५-०४-२०१२ अन्वये रू. १४,७१,५००.०० इतक्या रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मे.साई इंजिनिअर्स,अंबड,नाशिक यांनी त्यांचे नाशिक येथील वर्कशॉपमध्ये ट्रॉली तयार करुन साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ करिता २४० नग एअरपोर्ट टाईप लगेज ट्रॉली पुरविलेल्या आहे. या २४० नग एअरपोर्ट टाईप लगेज ट्रॉली पुरविणेची कामाची मुदत तीन महिन्याची म्हणजेच दि.२५-०७-२०१२ पर्यंत होती. परंतू मे.साई इंजिनिअर्स,अंबड,नाशिक यांनी दिनांक २२-११-२०१२ अखेर काम पूर्ण करुन दिलेले असून कामास ११९ दिवसाचा विलंब लागलेला आहे. त्यानंतर आता त्यांनी दिनांक २३-०१-२०१३ चे अन्वये फायनल बील क्र.१४ सादर केलेले आहे. बीलाचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१) | कामाची एकुण मूळ मंजूर रक्कम | रू.१४,७१,५००/- |
| ०२) | सादर केलेल्या फायनल बीलाची रक्कम | रु.१४,७१,५००/- |
| ०३) | वजा सिक्युरिटी डिपॉझिट ५% | रु.००,७३,५७५/- |
| ०४) | वजा इन्कम टॅक्स १% | रु.००,१४,७१५/- |
| ०५) | वजा वॅट २% | रु.००,२९,४३०/- |
| ०६) | झालेल्या एकुण दंडाची (११९ x१०० प्रती दिन ) रक्कम | रु.००,११,९००/- |
| ०७) | एकुण वजावट (३ + ४ + ५+६) | रु.०१,२९,६२०/- |
| ०८) | निव्वळ देय रक्कम ( २ - ७ ) | रु.१३,४१,८८०/- |

तरी मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांच्या उपरोक्त फायनल बीलाच्या देय रक्कम रुपये १४,७१,५००/- मधून टॅक्सेस, सिक्युरिटी डिपॉझीटची व विलंब झालेल्या कामाची दंडाची रक्कम प्रती दिन १०० प्रमाणे वजावट होऊन निव्वळ देय रक्कम रुपये १३,४१,८८०/- (अक्षरी रुपये तेरा लाख एक्केचाळीस

हजार आठशे ऐंशी) मात्र मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांना फायनल बीलाची रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३२ महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे यांची साईआश्रम भाग ०१ व ०२ या प्रकल्पाच्या सौर उर्जा यंत्रणेची सल्लागार फी आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २१-११-२०१० चे सभेतील विषय क्र.०६ निर्णय क्र.८५४ अन्वये मे.जैन इरिगेशन सिस्टिम लि.,जळगांव यांचे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन त्यांना संस्थान पत्र क्र.एसएसएस / विद्युत / १०८८७ / २०१० दि. ०६-१२-२०१० अन्वये साईआश्रम भाग ०१ व भाग ०२ प्रकल्पाकरिता सौर ऊर्जा यंत्रणा बसविणेकामी रक्कम रु.५,११,००,०००/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला होता. तसेच त्याच निर्णयानुसार सदरच्या सौर उर्जा यंत्रणेच्या सल्लागापदी महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे (मेडा) यांची नियुक्ती करुन त्यांना संस्थान पत्र क्र.एसएसएस / विद्युत / १२२१७ / २०११ दिनांक १९-०२-२०११ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. या कार्यादेशानुसार प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या किंमतीचे ३ टक्क्याप्रमाणे सल्लागार फ़ी आदा करण्याचे ठरलेले आहे.

यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४-०७-२०११ चे सभेतील विषय क्र.५७ निर्णय क्र.५४८ अन्वये मे.जैन इरिगेशन सिस्टिम लि.,जळगांव यांचे कामाचे कार्यादेशात बदल करण्यात येऊन संस्थान पत्र क्र.एसएसएस / विद्युत / २८५९ / २०११ दिनांक ०५-०९-२०११ अन्वये साईउद्यान, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) तसेच साईआश्रम भाग ०१ व भाग ०२ करीता नवीन कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे.जैन इरिगेशन सिस्टिम लि.,जळगांव यांचे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) तसेच साईआश्रम भाग ०१ व भाग ०२ करीता सौर ऊर्जा यंत्रणा बसविणेकामी कार्यादेशाची रक्कम रु.५,२३,६०,०००/- इतकी आहे. या रकमेमध्ये सदरची यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतरच्या पुढील पाच वर्षाच्या वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट रकमेचाही समावेश आहे.

यानुसार मे.जैन इरिगेशन सिस्टिम लि.,जळगांव यांची साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) तसेच साईआश्रम भाग ०१ व भाग ०२ करीता सौर ऊर्जा यंत्रणा बसविणेकामी फ़ायनल बीलाची रक्कम रु.४,७५,१८,५४७/- इतकी झालेली आहे (या रकमेमध्ये पुढील पाच वर्षाच्या वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट रकमेचा समावेश नाही). त्यानुसार महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे (मेडा) यांना झालेल्या फ़ायनल बीलाच्या रक्कम रु. ४,७५,१८,५४७/- च्या ३ टक्केप्रमाणे रक्कम रु. १४,२५,५५६/- आदा करावी लागणार असुन यापुर्वी महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे ( मेडा ) यांना रक्कम रु. ३,८३,२५०/- आदा करण्यात आलेली आहे. आता राहीलेली रक्कम आदा करणेसंदर्भात महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे (मेडा) यांनी पत्र क्र. शिर्डी संस्थान / २०१० / सीआर-६८ / सोलर / ४५४६ दि. ०३-१०-२०१२ नुसार कळविलेले आहे.

तरी महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे (मेडा) यांची एकुण झालेली रक्कम रु.१४,२५,५५६/- मधुन यापुर्वी आदा केलेली रक्कम रु.३,८३,२५०/- वजा जाता उर्वरित रक्कम रु.१०,४२,३०६/- मात्र आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३३ साईआश्रम भाग ०१ व ०२ कडील जॉनसन लिफ्टस प्रा.लि. पुणे यांचे लिफ्ट कामाचे फायनल बील आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७-११-२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०३ निर्णय क्र.८७६ अन्वये साई आश्रम भाग-०१ व भाग-०२ प्रकल्पाकडील सर्व इमारतीमध्ये लिफ्ट बसविणेकामी मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांना जा.नं.एसएसएस/ विद्युत /१३८९३/ २००९ दि.१३-११-२००९ अन्वये रक्कम रु. २,६०,००,०००/- इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांनी दि.३०.०३.२०१२ रोजी सर्व २० लिफ्टचे काम पुर्ण केलेले आहे.

त्यानुसार साईआश्रम भाग -०१ कडील १२ इमारती + ०१ आर ब्लॉक अशा एकुण १३ इमारतींच्या बांधकामास शासनाची परवानगी मिळालेली असून या इमारतींचे ड्रॉईंगही मंजुर झालेले आहे. परंतु साईआश्रम भाग -०२ कडील ०६ इमारती + ०१ आर ब्लॉक अशा एकुण ०७ इमारतीं असून या इमारतींच्या बांधकामास शासनाची परवानगी मिळालेली नसून या इमारतींचे ड्रॉईंगही मंजुर झालेले नाही. त्यामुळे साईआश्रम भाग -०१ येथे बसविण्यात आलेल्या एकुण १३ नग लिफ्टची महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे मा.लिफ्ट इंस्पेक्टर यांनी पाहणी करुन सदरच्या १३ लिफ्टचे लायसन्स संस्थानकडे सुपुर्द केलेले आहेत. उर्वरित साईआश्रम भाग -०२ येथील ०७ नग लिफ्टचे लायसनस या

इमारतींच्या बांधकामास शासनाची परवानगी मिळाल्यानंतर तसेच या इमारतींचे ड्रॉईंग मंजुर झाल्यानंतर सदर इमारतींचे मंजूर ड्रॉईंग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे मा.लिफ्ट इंस्पेक्टर यांचेकडे सादर करता येईल व त्यानंतर या लिफ्टची पाहणी होऊन लायसन्सची कार्यवाही पुर्ण होऊ शकेल.

त्यानुसार मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांनी दि.३०/०३/२०१२ रोजीच सर्व २० लिफ्टचे काम पुर्ण केलेले असून दि.३०/०७/२०१२ रोजी फायनल बील सादर केलेले आहे. सदरचे झालेले काम संस्थानचे कन्सल्टंट - पीएमसी मे.डॉर्स्च कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांनी सदरचे बील तपासले असून मे.डॉर्स्च कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांनी दि.३०/०८/२०१२ रोजी लेखी पत्र पाठवून पेमेंटसाठी कळविलेले आहे. परंतू साईआश्रम भाग -०२ कडील ०७ नग लिफ्टच्या लायसन्सची पुर्तता झालेली नसल्याने मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांचे फायनल बीलाबाबत पुढील कार्यवाही करण्यात आलेली नव्हती.

परंतू मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांनी सदर बीलाबाबत वारंवार तगादा सुरू केला असून त्यांना साईआश्रम भाग -०२ कडील ०७ नग लिफ्टच्या लायसन्सची पुर्तता झालेनंतरच तुमचे फायनल बील अदा करता येईल असे सांगितले असता त्यांचे म्हणणे आहे की साईआश्रम भाग -०२ कडील ०७ नग लिफ्टच्या लायसन्सची पुर्तता करणेकारीता आवश्यक असणारी बांधकाम परवानगी व ड्रॉईंग संस्थानच्या बांधकाम विभागाकडून अद्याप प्राप्त झालेली नसल्याने आम्हाला ( मे. जॉन्सन लिफ्ट यांना ) लायसन्सची पुर्तता करता आलेली नाही. त्यामुळे सदरची चूक ही आमची ( मे. जॉन्सन लिफ्ट यांची ) नसून संस्थानचीच आहे. तसेच फायनल बील अदा केल्यानंतरही संस्थानकडे ५ % सिक्युरिटी डिपॉझीटची रक्कम रु. १३,००,०००/- मात्र शिल्लक राहते ही रक्कम त्यांचे फायनल बीलाचे काम पुर्ण झालेपासून १ वर्ष संस्थानकडे जमा राहणार आहे. परंतू काम दि.३०.०३.२०१२ रोजी पूर्ण झालेने ही रक्कम दि.३० मार्च २०१३ पर्यंत म्हणजे अजून जास्तीत जास्त ४ महिने संस्थानकडे जमा राहील. त्यामुळे यात बदल करुन बील सादर केल्याच्या तारखेपासून म्हणजे दि. ३० जुलै २०१२ पासून पुढील १ वर्ष डिफेक्ट लियाबिलीटी पिरियड धरण्यास मान्यता असावी म्हणजे दि.३० जुलै २०१३ रोजी डिफेक्ट लियाबिलीटी पिरियड पुर्ण होईल. तो पर्यंत संस्थानला जर बांधकामाची परवानगी मिळाली तर मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे हे लायसन्सबाबत पुर्तता करु शकतील.फायनल बीलाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| ०१) | कामाची एकुण मूळ मंजूर रक्कम | रु. २,६०,००,०००/- |
| ०२) | सादर केलेल्या फायनल बीलाची रक्कम | रु. २,६०,००,०००/- |
| ०३) | वजा एकुण सिक्युरिटी डिपॉझिट ५% | रु. ०,१३,००,०००/- |
| ०४) | यापुर्वी कपात केलेली सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम | रु. ०,१०,४०,०००/- |
| ०५) | आता कपात करावयाची सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम (३-४) | रु. ०,०२,६०,०००/- |
| ०६) | वजा एकुण इन्कम टॅक्स २% | रु. ०,०५,२०,०००/- |
| ०७) | यापुर्वी कपात केलेली इन्कम टॅक्सची डिपॉझिटची रक्कम | रु. ०,०४,१६,०००/- |
| ०८) | आता कपात करावयाची इन्कम टॅक्सची रक्कम (६-७) | रु. ०,०१,०४,०००/- |
| ०९) | वजा एकुण वॅट २% | रु. ०,०५,२०,०००/- |
| १०) | यापुर्वी कपात केलेली वॅटची रक्कम | रु. ०,०४,१६,०००/- |
| ११) | आता कपात करावयाची वॅटची रक्कम (९-१०) | रु. ०,०१,०४,०००/- |
| १२) | यापुर्वी आदा केलेली बीलाची रक्कम | रु. २,०८,००,०००/- |
| १३) | एकुण वजावट (५ + ८ + ११ +०१२ ) | रु. २,१२,६८,०००/- |
| १४) | निव्वळ देय रक्कम ( २- १३ ) | रु. ०,४७,३२,०००/- |

तरी उपरोक्त प्रमाणे फायनल बीलाच्या रु.२,६०,००,०००/- या रकमेतून सिक्युरिटी डिपॉझीट, इन्कम टॅक्स, वॅट तसेच यापुर्वी आदा केलेल्या बीलाची वजावट होऊन निव्वळ देय रक्कम रु. ४७,३२,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तेचाळीस लाख बत्तीस हजार) मात्र मे. जॉनसन लिफ्टस प्रा.लि., पुणे यांना आदा करणेस व बील सादर केल्याच्या तारखेपासून म्हणजे दि. ३० जुलै २०१२ पासून पुढील १ वर्ष डिफेक्ट लियाबिलीटी पिरियड धरण्यास मान्यता मिळणेस विनंती

**निर्णय क्र.२९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.३४ मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे दि.०४.०३.२०१३ चे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१२ - १३ (नोव्हें.-१२ ते मार्च-१३) साठी प्रसादालय विभागासाठी ९००० क्विंटल गहु आटा खरेदीकामी मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे सम्राट कंपनीचे गहु आट्याचे प्रति क्विंटल (व्हॅटसह) दर रु.२,०१०/-(अक्षरी रुपये दोन हजार दहा) न्युनतम असल्याने मान्य करण्यात आले, व त्यांना इकडील जा.क्र.एसएसएस/ वशी / खरेदी-प्रसाद/३७३०/२०१२ दि.१९.११.२०१२नुसार खालील प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

| अ. क्र. | मालाचा तपशिल | मागणी क्विंटलमध्ये | दर प्रति क्विंटल व्हॅटसह | एकुण रक्कम | ५% सुरक्षा अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | गहु आटा - सम्राट | ९,००० | २,०१०/- | १,८०,९०,०००/- | ९,०४,५००/- |
| ०२ | तांदुळ - नवीन सोना मसुरी | ३,५०० | २४४१/- | ८५,४३,५००/- | ४,२७,१७५/- |
| ०३ | मसुर - आख्खा | १६० | ४,१५१/- | ६,६४,१६०/- | ३३,२०८/- |
| | | | एकुण रक्कम रुपये | २,७२,९७,६६०/- | १३,६४,८८३/- |

पुरवठा आदेशाप्रमाणे त्यांचेकडून दि.२७.११.२०१२ रोजी १०० क्विंटल गहु आट्याचा पुरवठा झालेला होता.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी त्यांचे दि.२२.११.२०१२ रोजीचे पत्रामध्ये पुरवठा आदेशातील सम्राट ब्रॅण्ड गहु आटा मिल मालक देण्यास तयार नसल्याने सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा करण्यास अडचण निर्माण होत असल्याने आम्ही सम्राट ब्रॅण्डचा गहु आट्याचा पुरवठा करु शकत नाही. आपल्या टेंडर फॉर्ममध्ये ४ प्रकारचे गहु आट्याची मागणी केली होती, त्यातील कॅप्टन कुक ब्रॅण्डचा गहु आटा हा बेस्ट क्वॉलिटीचा मी त्याच दरात प्रति क्विंटल रु.२,०१०/- प्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहे. तरी माझ्या अर्जाचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती केलेली होती.

त्यानुसार सदरचे विषयाबाबत दि.३०.११.१२ रोजी मा.जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे झ ालेल्या मा.व्य.स.(त्रीसदस्य) च्या सभेपुढे मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेसह निवड समितीने निवडलेल्या सम्राट आटयाच्या उर्वरीत तीन निविदाधारकांना चर्चा-वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले होते.

सदर सभेत गहु आटा खरेदीबाबत सविस्तर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे निर्णय क्र.८८७ संमत करण्यात आलेला आहे. "सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा करणेसाठी द्वितीय निम्नतम दरधारक मे.आर.मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद यांना त्यांनी चर्चेअंती देऊ केलेल्या रु.२,०५२/- प्रति क्विंटल (व्हॅटसह) या दराने संस्थान प्रसादालयासाठी सम्राट ब्रॅण्ड गहु आटा पुरवठा करणेसाठी कार्यादेश देणेत यावा. सदरचा आटा जादा दराने खरेदी केल्यामुळे दरातील फरकाची रक्कम न्युनतम दरधारक मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेकडून वसुल करणेत यावी. मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी पुरवठा आदेशानुसार सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा पुरवठा न केल्यामुळे त्यांची गहु आट्यासाठी असलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करणेत यावी व त्यांना ३ वर्षासाठी संस्थानमध्ये गहु आटा पुरवठा करण्यासंबंधी खरेदी प्रक्रियेत सहभाग घेता येणार नाही, असा निर्णय झालेला आहे.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१२ सभेतील निर्णयाप्रमाणे गहु आट्यासाठी असलेली ५% डिपॉझिट रक्कम रु.९,०४,५००/- व द्वितीय न्युनतम दरधारक यांचेकडून जादा दराने खरेदी केलेल्या गहु आट्याच्या फरकाची रक्कम रु.३,७३,८००/- असे एकुण रु.१२,७८,३००/- (अक्षरी रुपये बारा लाख अठ्ठयाहत्तर हजार तीनशे) मात्र वसुल करण्यात आलेली आहे.

मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी त्यांचेकडील दि.०४.०३.२०१३ चे पत्रान्वये "प्रसादालयाकरिता सम्राट गहु आटयाचे टेंडर आम्हांला मिळाले होते, परंतू सम्राट कंपनीने आम्हाला माल पुरवठा करणेस नकार दिल्यामुळे तो माल आम्ही पुरवू शकलो नाही. तो सविस्तर विषय आम्ही बोर्डाच्या मिटींगमध्ये मांडला होता. याप्रकरणामध्ये आंम्हाला भाव फरकाचे रु.३,७३,८००/- व ५% सिक्युरिटी डिपॉझिटचे अंदाजे ९ लाख रुपये व तीन वर्षाच्या आटयाच्या टेंडरमध्ये बंदी असे तिहेरी दंड लावण्यात आले आहेत.

१. तरी आमची विनंती अशी आहे की, मागील १० ते १२ वर्षापासून श्री साईबाबांची सेवा व माल पुरवठा करित आहोत, परंतू आजपर्यंत आमच्या हातून काहीही चुकीचे घडलेले नाही व हि सेवा पुढे व्यवस्थित चालु राहील.
२. सध्या तांदुळ पुरवठ्याचे टेंडर आम्हांला मिळालेले आहे. सध्या पाऊस नसल्यामुळे व दुष्काळ पडल्यामुळे तांदळाचे भाव एक हजार रुपये प्रति क्विंटल प्रमाणे वाढलेले आहे, त्यामध्ये सुद्धा आम्हांला अंदाजे ३० ते ३५ लाख रुपयांचे नुकसान होत आहे.
३. तरी वरील विषयी विनंती करण्यात येते की, गहु आट्याचे प्रकरणामध्ये आमची काहीही चुक नाही व यामध्ये आम्हांला जास्तीत २ लाखापर्यंत दंड लावण्यात यावेत व तांदुळामध्ये काही भाव वाढवून देण्यात यावेत व बाकी दोन्ही दंड माफ करण्यात यावेत. आपण सहानुभूतीपुर्वक या विषयावर निर्णय घेण्यात यावेत" अशी विनंती केलेली आहे.

मे.हिरालाला चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांनी दि.२२.११.२०१२ दि.२१.१२.२०१२ व दि.२१.०१.२०१३ रोजी उपरोक्त विषयाबाबत वेळोवेळी पत्र दिलेले आहेत, सदरचा विषय मा.त्रिसदस्य

समितीचे दि.०७.०२.२०१३ चे सभेत सादर करण्यात आला असता, त्यावर पुढील प्रमाणे निर्णय क्र.७५ झालेला आहे. "सदरहु विषय स्थगित ठेवण्यात यावा, परंतू व्यवस्थापन समितीने यापुर्वी घेतलेल्या निर्णयावरील कार्यवाही चालु ठेवावी."

तरी मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांचे दि.०४.०३.२०१३ रोजीचे पत्राबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड यांना चर्चा करणेसाठी पुढील सभेसमोर समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३५ लाडू निर्मिती विभाग स्वतंत्र होणेकामी निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत साईभक्तांचे सोईसाठी सन १९९३-१९९४ पासून प्रसाद लाडू तयार करुन विक्री करण्यात येते. सध्या संस्थानचे प्रसादालय विभागाकडून बनविण्यात येणारे प्रसादलाडू हे गावराण तुप, हरबराडाळ बेसन, साखर, हिरवी विलायची, काजू, खिसमिस यापासून बनविणेत येत असून एका लाडूचे वजन हे ५० ग्रॅम असून ३ लाडूचे पॅकेटसाठी रु.१०/- प्रती पाकीट या अल्पदरात साईभक्तांना विक्री करण्यात येत आहे.

दिवसेंदिवस साईभक्तांचे संख्येत वाढ होत असल्याने सन २०११-२०१२ करीता लाडू बनविणेकामी दोन ठेकेदारांची नियुक्ती करणेत आलेली असून तरीही गरजेप्रमाणे लाडू उपलब्ध होत नसलेमुळे प्रत्येक भक्तास रांगेतून १ किंवा २ पाकीटे देण्यात येतात. जुने प्रसादालय येथे ८ लाडू विक्री काऊंटर, व्दारावती व नविन भक्तनिवासस्थान येथे प्रत्येकी एक काऊंटर असे एकूण १० प्रसादलाडू विक्री काऊंटर साईभक्तांचे सोईसाठी सुरु आहे. भविष्यात जुन्या प्रसादालयाची साई प्रसाद नं.१ व साईप्रसाद नं.२ इमारतीचे जागेचा इतर कामासाठी वापर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तेथील लाडू निर्मितीचे काम बंद होईल. त्या ठिकाणचे काम बंद झाल्यास भक्तांना कमीत कमी २ पाकीटे पुरविणेही शक्य होणार नाही.

सन २००० ते २०१२ अखेर मोतीचूर लाडू विक्री संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे.

| वर्ष | मोतीचूर लाडू पाकीटे विक्री संख्या | | वर्ष | मोतीचूर लाडू पाकीटे विक्री संख्या | |
|---|---|---|---|---|---|
| (एप्रिल ते मार्च) | वार्षिक संख्या | दैनंदिन सरासरी संख्या | (एप्रिल ते मार्च) | वार्षिक संख्या | दैनंदिन सरासरी संख्या |
| २००० ते २००१ | ४५७९३३४ | १२५४६ | २००६ ते २००७ | ११२३६५२५ | ३०७८५ |
| २००१ ते २००२ | ५२२५४४३ | १४३१६ | २००७ ते २००८ | १४३६६८०६ | ३९३६१ |
| २००२ ते २००३ | ६१५११३६ | १६८५२ | २००८ ते २००९ | १५४९३२९८ | ४२४४७ |
| २००३ ते २००४ | ६६२८१०४ | १८१५९ | २००९ ते २०१० | १३८८२३१९ | ३८०३४ |
| २००४ ते २००५ | ७३८३३५१ | २०२२८ | २०१० ते २०११ | १२७४५२८० | ३४९१९ |
| २००५ ते २००६ | ८१९५६२३ | २२४५४ | २०११ ते २०१२ | १६६९२३०७ | ४५७३२ |

लाडू निर्मिती विभाग स्वंतत्रपणे करण्यासाठी मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये खालीलप्रमाणे ठराव झालेले आहेत.

१) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१०.०१.२०१० मधील निर्णय क्र.१९२ नुसार प्रसादालय विभागाकडे प्रसादलाडूची मागणी दर वर्षी २०% ने वाढत आहे. यामुळे जागा कमी पडत आहे. तसेच यापुढे पेरु बर्फी बनविण्यासाठी जागेची गरज आहे. त्यासाठी स्वतंत्र लाडू व पेरु बर्फीचे फुड प्रोसेसिंग युनिट बनविण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.०९.२०१० मधील निर्णय क्र.७५१ नुसार प्रसादालय विभागाकडे प्रसादलाडूची मागणी दर वर्षी २०% ने वाढत आहे. यामुळे जागा कमी पडत आहे. यासाठी जागा, माल ये-जा करण्याची वाहतुकीचा मार्ग, मोठया प्रमाणात दाळ दळण्याची मिल, लाडू वाळविण्यासाठी हवेशीर शेड इत्यादीसाठी प्रसादालयाजवळ जागा निश्चित करण्यात आलेली आहे. परंतु सदर जमीनीचा झोन बदलण्याची कार्यवाही चालू असलेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेत सांगितले. याबाबत आराखडे तयार करणेकामी श्री सुरेश बाबु, मुंबई यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणुक करण्यावी यावी. याकामी त्यांना योग्य ते मानधन देण्यात यावा असे ठरले.

३) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३.०२.२०११ मधील निर्णय क्र.१२४ नुसार स्वतंत्र लाडू विभाग सुरु करणेकामी मा.विश्वस्त श्री शैलेश कुटे, श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी जागेची पहाणी करुन, जागा निश्चित झालेनंतर आर्किटेक्ट श्री शक्ती परमार यांची नेमणुक करावी असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानंतर मा.विश्वस्त डॉ.एकनाथ गोंदकर यांनी दि.१८.११.२०११ रोजी निमगांव कोऱ्हाळे येथील संस्थान मालकीच्या जागेची पहाणी करुन गट नं.२१८ मधील ०१ हेक्टर क्षेत्र असलेली जागा निश्चित केली. त्यावर बांधकाम विभागाने प्रसादालय विभागाकडे लाडूचे उत्पादन, विक्रीचा तपशील, साठवणुकीसाठी आवश्यक जागा, बुंदी तळण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शेगडया, भविष्यातील जागेची

गरज तसेच पॅकींग व्यवस्था, लाडू निर्मितीसाठी कार्यरत असलेले कर्मचारी व सध्या असलेल्या युनिटची जागा याबाबतची माहिती मागविली असता, श्री साई प्रसादालयाने सध्या असलेल्या युनिटचे जागेची माहिती बांधकाम विभागास दिनांक २०/०१/२०१२ रोजी दिलेली आहे. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव बांधकाम विभागाने मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर केला असता -

४) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.०१.२०१२ निर्णय क्र.१४८ नुसार प्रसादलाडू निर्मिती व्यवस्थेसाठी मौजे निमगाव कोऱ्हाळे गट नं.२१८ मधिल ०१ हेक्टर क्षेत्र निश्चित करण्यात यावे. तसेच या कामासाठी श्री पुष्कर कानविंदे द ऑडी ग्रुप, पुणे यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणुक करुन त्यांचेमार्फत नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करण्यात यावे असे ठरले. त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९.०२.२०१२ निर्णय क्र.१७२ नुसार मान्यता देण्यात आली.

श्री साई प्रसादालयामध्ये दैनंदिन सरासरी सुमारे ३५,००० ते ५५,००० व गर्दीच्या काळात ६०,००० ते ८०,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत आहेत. तसेच दर्‌रोज सुमारे ८,००० ते १५,००० अन्नपाकीटांची विक्री होत आहे. त्यानूसार दिवसेंदिवस साईभक्तांची प्रसादलाडूची मागणी व भक्तांची वाढणारी संख्या याचा विचार होऊन लाडू प्रसाद बनविणेकामी स्वतंत्र भव्य अत्याधुनिक मशिनरीसह लाडू निर्मिती विभाग सुरु करणे गरजेचे आहे. सध्या साईभक्तांना श्री साई प्रसादालयामार्फत प्रसादलाडू बनवून कॅन्टीन विभागामार्फत वितरीत करण्यात येत आहे. श्री साई प्रसादालयाचे कामकाज सकाळी ७ ते ३ व दुपारी ३ ते ११ अशा दोन शिफ्टमध्ये सुरु चालते.

श्री साई प्रसादालयाचे कामकाज पहाणेसाठी प्रसादालयातील मंजूर आकृतीबंधानूसार एक मॅनेजर व दोन अधिक्षक यांची गरज आहे. परंतू सध्या प्रसादालयाचे कामकाज एकच अधिक्षकाचे नियंत्रणाखाली सुरु आहे. त्यामुळे प्रसादालयातील प्रसादभोजन, अन्नपाकीटे, लाडू प्रसाद येथील सर्व कामकाज पहाणे अडचणीचे ठरत असून साईभक्तांची गैरसोय होत आहे. साईभक्तांना वेळेवर प्रसादभोजन, अन्नपाकीटे व विना विलंब लाडू प्रसाद मिळणेसाठी स्वतंत्र लाडू विभागाची निर्मिती होणे आवश्यक आहे. तरी उपरोक्त ठरावास अनुसरून लाडू प्रसाद निर्मिती विभाग स्वतंत्र होणेकामी मा.त्रिसदस्सीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना विना विलंब लाडू प्रसाद मिळावा, याकरिता अत्याधुनिक मशिनरीसह स्वतंत्र लाडू प्रसाद निर्मिती विभाग सुरु करणेसाठी जागेची पहाणी करुन जागा निश्चित करणेत यावी व सध्याचे लाडू प्रसाद निर्मिती विभागावर नियंत्रण ठेवणेकामी स्वतंत्र अधिक्षकाची नेमणूक करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३६** **साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ चे R-Block इमारतीतील उपहार गृहासाठी तज्ञ सल्लागार नियुक्तीकामी प्राप्त झालेले दरपत्रक व मोफत प्रस्तावानुसार तज्ञ सल्लागार पदी नियुक्ती करणेकामी निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई आश्रम भाग- ०१ व ०२ चे R-Block इमारतीतील उपहार गृहासाठी किचन ईक्वीपमेंट्स, स्टे.स्टील फर्निचर, गॅस सिलेंडर मेनफोल्ड यंत्रणा खरेदी व उभारणी तसेच नामवंत ग्रुपला उपहारगृह चालविणेस देणेकामी विषय तज्ञांचे मार्गदर्शन मिळणेकामी दि.२८/०४/२०१२ चे त्रिसदस्सीय समिती सभेपुढे सदर विषय मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार प्रस्तुत कामाकरीता सल्लागार नियुक्तीचे प्रक्रियेत पारदर्शकता येणेकामी पुणे, मुंबई येथील नामांकित वृत्तपत्रात सल्लागार नियुक्तीबाबतची जाहीरात देवून सिलबंद पाकीटात अनुभव व अपेक्षित मानधनासह प्रस्ताव मागविण्यात यावे असे ठरले होते.

त्यानुसार पुणे, मुंबई, औरंगाबाद येथील महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आलेली होती. तसेच टेंडर वेबसाईटवर डाऊन लोड करण्यात आलेले होते. त्यानुसार खालील ५ एजन्सींनी विहीत मुदतीत सिलबंद दरपत्रक सादर केलेले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. नं. | निविदाधारकाचे नाव | दरपत्रकातील दर रु. | चर्चा /वाटाघाटी करुन देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| १. | HCTS International, Mumbai. | मोफत सेवा | अनुपस्थित |
| २. | Sandeep Govalkar Design Associates, Mumbai | - | 3.33% + Service Tax |
| ३. | Shri Kiran S. Manjrekar, Mumbai | - | - |
| ४. | Mrs. Shirley Santosh Jori, Pune | - | मोफत सेवा |
| ५. | M/S Kitchen Krafts, Mumbai | ७,५०,०००/- | अनुपस्थित |

उपरोक्त एजन्सीं पैकी अ. नं. २ ते ४ चे प्रतीनिधी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे चर्चा व वाटाघाटीसाठी समक्ष हजर होते. प्रत्यक्ष चर्चा व वाटाघाटीनंतर त्यांनी फेर प्रस्ताव बंद पाकीटात दिलेले

होते. प्रस्तुत सिलबंद दरपत्रक दिनांक १५.९.२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीसमोर उघडणेत आलेले असुन त्यावर सविस्तर प्रस्ताव तयार करुन पुढिल त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात यावे असे ठरले. त्यानुसार आलेल्या दरपत्रकाचा तुलनात्मक खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | निविदाधारकाचे नाव | चर्चा /वाटाघाटी नंतर फेर सादर केलेले दर | चर्चा /वाटाघाटी नंतर फेर सादर केलेल्या अटी शर्ती |
|---|---|---|---|
| २. | Sandeep Govalkar Design Associates, Mumbai | एकुण प्रकल्प किमंतीच्या ३.३३% + सर्व्हिस टॅक्स. | प्रवास खर्च अंतर्भुत. |
| ३. | Shri Kiran S. Manjrekar, Mumbai | साईआश्रम भाग १ व २ करीता एकत्रित रक्कम रु. २,५०,०००/- + सर्व्हिस टॅक्स | १.लॉजींग, बोर्डीग व प्रवास खर्च संस्थानने आदा करावा. |
| ४. | Mrs. Shirley Santosh Jori, Pune | एकुण प्रकल्प किमंतीच्या २% + सर्व्हिस टॅक्स | १. शिर्डी ते पुणे व्यतीरिक्त व्हिजीट चार्जेस वेगळे आदा करावे लागतील.<br>२. ॲटोकॅड ड्राईंग, लेआऊट ड्राईंग तसेच इक्युपमेंट स्पेशीफिकेशन संस्थानने द्यावयाचे आहे. |

प्राप्त दरपत्रक व फेर दरपत्रकानुसार अ.नं. १ चे निविदाधारक HCTS International, Mumbai यांनी मोफत सेवेचा प्रस्ताव दिलेला आहे. अ. नं. ३ चे निविदाधारकास श्री प्रसादालयाचे किचन उभारणीकामाचा अनुभव आहे.

तरी साई आश्रम फेज १ व २ चे किचन सल्लागार नियुक्तीबाबतचा निर्णय होणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ चे R-Block इमारतीतील उपहार गृहासाठी तज्ञ सल्लागार नेमणूक करणेसाठी मागविणेत आलेल्या दरपत्रकांना बराचसा कालावधी झालेला असल्याने ती रद्द करणेत यावी व सदरहू कामासाठी उपरोक्त निविदाधारकांकडून फेर दरपत्रके बोलविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.३७ बेनमेरी (हॉटपॉट) खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात दररोज सरासरी ४० हजार साईभक्त प्रसाद भोजन घेतात. गर्दीचे वेळेस प्रसाद भोजन घेणाऱ्या साईभक्तांची संख्या ७० ते ८० हजारापर्यंत जाते. दरारोज प्रसाद भोजन साईप्रसादालयातील मुख्य डायनिंग हॉल, व्हि.आय. पी. डायनिंग हॉल (ए व बी), नविन भक्त निवास येथील भोजन कक्ष आणि साईनाथ हॉस्पीटल येथील भोजन कक्ष येथे देणेत येतो.

वरील सर्व ठिकाणाचे प्रसाद भोजन प्रसादालयातील मुख्य किचन मध्ये बनविले जाते व आवश्यकतेनुसार प्रसाद भोजनाची वाहतुक केली जाते. श्री साईप्रसादालयातील अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नविन भक्त निवास व साईनाथ हॉस्पीटल येथील भोजन कक्ष हे स्वयं: सेवी आहे. त्यामुळे कर्मचारी कमी लागतात. प्रसादालयातील मुख्य डायनिंग हॉलमध्ये दररोज ३० हजार पेक्षा जास्त साईभक्त प्रसाद भोजन घेत असलेमुळे स्वय:सेवी (सेल्फ सर्व्हिस) सेवा शक्य नाही.

साईभक्तांना भाजी गरम देणेकरीता बेनमेरीची आवश्यकता आहे. साईभक्तांना देणेत येणारे प्रसाद भोजनातील दोन भाजी, दाळ व भात बेनमेरीत ठेऊन साईभक्तांना गरम गरम पदार्थ वाटप करता येईल. सध्या प्रसादालयातील व्हि. आय. पी. कक्षात बेनमेरीचा वापर करण्यात येतो. परंतु व्हि. आय. पी. कक्षासाठी असणाऱ्या ४ नग बेनमेरी कमी पडत असल्याने नविन भक्त निवास व साईनाथ रुग्णालय येथील कॅन्टिन मध्ये बेनमेरीचा वापर करता येत नाही. त्याकरीता आणखी सहा भाडयांच्या २० लि. क्षमतेच्या सहा बेनमेरी खरेदी करणे आवश्यक आहे. यापुर्वी सन २००८ मध्ये एक बेनमेरी रु.२७५००/- रक्कमेस खरेदी करणेत आलेली होती. आजमितीस सहा बेनमेरी खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे

तरी श्री साईप्रसादालयातील आवश्यकतेनुसार ६ नग बेनमेरी (हॉट पॉट) उत्पादक व पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागावून विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) पर्यतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयासाठी आवश्यक असलेले ६ नग बेनमेरी (हॉट पॉट) खरेदीकामी उत्पादक/ पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागवून विहीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.३८ स्टे.स्टील जॅकेटेड स्टीम कुकर्सचे दुरुस्ती खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात प्रतीदिन सरासरी ४० हजार साईभक्तांचे प्रसाद भोजन बनविण्यात येते. प्रसाद भोजन वेळेवर बनविणेसाठी किचनमध्ये अनेक स्वरुपाचे ऑटोमायझेशन केलेले आहे. भात, दाळ शिजविणे, भाजीकरीता गरम पाणी व बटाटे उकडणे यासाठी १५० लिटर क्षमतेच्या स्टे. स्टील जॅकेटेड १० नग स्टीम कुकर्सचा वापर करणेत येतो.

दैनंदिन वापराने व सतत गरम असलेमुळे स्टीम कुकर्सचे स्टे.स्टील शॉफ्ट बेन्ड झालेले असून जॅकेटेड भागातून स्टीम लिकेज होत असल्यामुळे प्रसादालयाकडील दिनांक ३०.१.२०१३ रोजीचे मंजूर टिपणीने ४ नग स्टीम कुकर्स पुरवठादार व उत्पादक मे. मेटल फॅब्रीकेटर्स ऑफ इंडीया, मुंबई यांचेकडे पाठविणेत आलेले आहे.

दुरुस्ती साठी पाठविलेले ४ नग कुकर्स उत्पादक मेटल फॅब्रीकेटर ऑफ इंडीया, मुंबई यांनी दुरुस्ती साठी खोलले असता खालील कामे करावे लागणार असल्याचे त्यांनी कळविलेले आहे.

1. To cut and remove the insulation covers with insulation material.
2. To cut and remove the steam jackets.
3. To clean and smoothen the welded joints.
4. To provide new steam jackets to the vessels of 3mm thick 304 quality SS.
5. To provide axel shafts to all jackets by using 6mm thick 304 quality SS flanges.
6. To provide all new fittings such as steam pressure trap, steam pressure guage, safety valve, pressure release valve etc.
7. To test the vessels for 15 psi.
8. To clad steam jackets with thick layer of glass wools and cover up insulation by using 21 SWG thick SS sheets of 304 quality.
9. To provide the vessels bright new look by polishing.
10. To position repaired vessels on existing stands made for their installation

त्याकामी प्रत्येक कुकर्ससाठी रक्कम रु. ८५,०००/- खर्च कळविलेला आहे. ४ कुकर्स दुरुस्तीसाठी ३,४०,०००/- + टॅक्स + जकात एवढा खर्च येणार आहे. श्रीसाई प्रसादालयातील प्रसाद भोजनातील भात, दाळ व भाजीसाठी गरम पाणी बनविणेकामी स्टीम कुकर्सची अत्यंत आवश्यकता असल्याने दुरुस्त करणे आवश्यक आहे. एप्रिल पासून शाळेंना सुट्टी लागणार असल्याने प्रसादालयात प्रसाद भोजन घेणाऱ्या साईभक्तांची गर्दी वाढत असते. त्यामुळे सर्व कुकर्स कार्यान्वित राहणे आवश्यक आहे.

तरी स्टीम कुकर्सचे उत्पादक व पुरवठादार यांचेकडून ४ नग स्टीम कुकर्स दुरुस्ती करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,४०,०००/- + टॅक्स चे खर्चास मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.२९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन बनविणेकामी आवश्यक असलेले ४ नग स्टीम कुकर्स, उत्पादक/ पुरवठादार यांचेकडून दुरुस्त करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ३,४०,०००/- + टॅक्स + जकात मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.३९ चपाती मशिन CST ची रक्कम पुरवठादार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांना आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि. १८.४.२०१० चे सभेतील निर्णय क्रं. ३५७(९) अन्वये श्री साईप्रसादालयासाठी सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांचेकडुन २ मशिन्स दिनांक १५.१.२०११ रोजी रु. २१,५६,५००/- रक्कमे प्रमाणे खरेदी करण्यात आलेले आहे. त्याच दरम्यान १ मशिन श्री अशोक जयस्वाल, कलकत्ता यांनी देणगी दिलेले आहे. तसेच दिनांक ६.९.२०११ रोजी रितेश राजन सिंग पटना यांनी चौथे सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांचे चपाती मशिन देणगी दिलेले आहे.

मा. व्यवस्थापन समिती दिनांक १९.११.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ८४० चे मान्यतेने युनियन बॅक ऑफ इंडीया यांचेकडून एक चपाती मशिन देणगी स्विकारणेस मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार चपाती मशिनकरीता युनियन बॅकेने चेक नं. ०३५११८ दि. १०.१२.२०११ द्वारे रक्कम रु. १९,००,०००/- लेखाशाखेत जमा केलेली होती. सदर रक्कमेची बॅकेस लेखाशाखेमार्फत दिनांक १२.१२.२०११ रोजी पावती नं.CHDD १२०८६ ने देणगी पावती देणेत आलेली आहे.

युनियन बँक आफ इंडीया यानी चपाती मशिन करीता दिलेल्या रक्कम रु. १९ लाख चे चपाती मशिन पुरवठादार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांना संस्थान मार्फत आदा करण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांनी चपाती मशिनचा पुररवठा केलेले असून दिनांक २८.४.२०१२ रोजी सदरचे चपाती मशिन कार्यन्वित करुन दिलेले आहे. व दिनांक ५.५.२०१२ रोजी युनियन बॅक ऑफ इंडीया यांचे अंचलीय कार्यालय पुणे येथील अधिकारी यांनी सदर चपाती मशिनचे उद्‌घाटन केलेले आहे.

चपाती मशिनचे पुरवठादार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांनी एकुण टॅक्स रक्कम सह रु. २१,५६,५००/- चे बिल दिलेले आहे. पुरवठादार यांना बिलाची फक्त रक्कम रु.१९ लाख आदा करणेत आलेली असल्यामुळे त्यांना CST ची रक्कम रु. २,५६,५००/- आदा करणे बाकी आहे. युनियन बॅंकेस चपाती मशिनची उर्वरीत रक्कम रु. २,५६,५००/- देणगी देणेस लेखी दिनांक १३.७.२०१२ व दि. ३१.८.२०१२ रोजीचे पत्राने कळविले होते. परंतु त्यांचे बॅंकेस जास्तीत जास्त १९ लाखापर्यंतच देणगी देता येत असल्याने उर्वरीत चपाती मशिनची रक्कम देता येणार नसल्याचे दिनांक ३०.८.२०१२ रोजी युनियन बॅंकेच्या शिर्डी शाखेने कळविलेले होते.

त्यानंतर मा. चेअरमन, मुख्य ऑफीस, युनियन बॅंक ऑफ इंडीया, मुंबई यांना दिनांक ५.१२.२०१२ रोजी उर्वरीत टॅक्सची रक्कम देणेबाबत लेखी पत्राने कळविण्यात आलेले होते. परंतु त्यांचेकडुन कोणताही खुलासा न आल्याने दिनांक ४.२.२०१३ रोजी स्मरण पत्र देणेत आलेले होते. त्यानुसार युनियन बॅंक ऑफ इंडीया, शिर्डी शाखा यांनी दिनांक ६.३.२०१३ रोजी खुलासा पत्र दिलेले आहे. पत्रात त्यांनी शासनाचे बंधनामुळे प्रत्येक बॅंकेस १९ लाखापेक्षा जास्त रक्कम देणगी देता येत नाही. त्यामुळे उर्वरीत CST ची रक्कम चपाती मशिन पुरवठादार यांना संस्थानने आदा करावी असे कळविलेले आहे.

मशिनचे पुरवठादार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांना उर्वरीत टॅक्सची रक्कम माफ करणेबाबत तोंडी विनंती केली असता त्यांनी प्रस्तुत मशिनच्या CST ची रक्कम रु. २,५६,५००/- शासनास भरलेली असल्याने माफ करता येत नसल्याचे सांगितलेले आहे. त्यामुळे चपाती मशिनचे पुरवठादार सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांना चपाती मशिनची १९ लाख देणगी व्यतीरीक्त उर्वरीत CST ची रक्कम रु. २,५६,५००/- संस्थानला आदा करावी लागणार आहे.

तरी सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांनी पुरवठा केलेल्या पाचवे चपाती मशिन CST ची रक्कम रु. २,५६,५००/- आदा करणेकामी सदरचा विषय मा. त्रिसदस्यीय समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४०** **स्टे.स्टील डायनिंग टेबल बैठक सिटाचे स्टे.स्टील टॉप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयातील साईभक्तांना विना विलंब प्रसाद भोजन घेणेसाठी ३५०० बैठक क्षमता असलेला मोठा डायनिंग हॉल बनविण्यात आलेला आहे. स्टेनलेस स्टीलचे ७७० नग डायनिंग टेबल बसविण्यात आलेले आहे. एक टेबलवर चार व्यक्ती प्रसाद भोजन घेतात. बसण्यासाठी कास्टींग रिंगवर स्टे. स्टील टॉप मोल्ड करुन बसविण्यात आलेले आहे व कास्टींगची रींग नट बोल्टने बसविण्यात आलेली आहे. डायनिंग टेबल स्वच्छता करतांना दररोज हालचाल होत असते.

दैनंदिन हालचालीमुळे अंदाजे १५०० नग स्टे. स्टील टॉप साईडने चिरलेले आहे. स्टे. स्टील टॉप चिरलेले असल्याने भक्तं प्रसाद भोजन घेतांना टेबलचे स्टे. स्टील टॉप बसले असता त्यांचे कपडे चिरलेले भागात अडकतात. त्यामुळे सदर ठिकाणी नविन स्टे. स्टील टॉप बसविणे अत्यंत आवश्यक आहे. स्टे. स्टील डायनिंग टेबल उत्पादक व पुरवठादार यांचे कडून नविन स्टे. स्टील टॉप व टॉप मोल्डींग करुन बसविण्याच्या मजूरीसह विहीत पद्धतीने दरपत्रक मागावून मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा व वाटाघाटीद्वारे न्युनत्तम दरपत्रक धारकास कार्यादेश आदा करता येईल. याकामी स्टे. स्टील नविन ताट व मोल्डींग कामाचे मजूरीसह प्रती नगाचा अंदाजे खर्च रक्कम रु. २००/- अपेक्षित आहे. त्यामुळे १५०० नग स्टे. स्टील टॉप खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईप्रसादालयातील स्टे.स्टील डायानिंग टेबलच्या स्टे. स्टील सिटचे टॉपचे दरपत्रक मागावून विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) पर्यंतच्या खर्चास मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामधील स्टे.स्टील डायानिंग टेबलच्या, स्टे. स्टील सिटचे टॉप विहीत पद्धतीने दरपत्रक मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४१** **मोतीचूर लाडू व बर्फी, अन्नपाकिटे ठेकेदार यांना पुढील निर्णय होईपावेतो मुदतवाढ देणेबाबत व चपाती/ पुरी ठेकेदाराचे कामाची मुदत संपलेनंतर पर्यायी व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोईसाठी भव्य दिव्य श्री साई प्रसादालय सुरु करणेत आलेले आहे. श्री साई प्रसादालयामध्ये दैनंदीन सरासरी ४०,००० ते ५०,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत आहेत. साईभक्तांना प्रसादभोजनामध्ये चपाती/पुरी, दोन भाज्या, डाळ, भात, बर्फी व चटणी इत्यादी पदार्थ देण्यात येतात. तसेच सकाळी ६.०० ते ९.०० या वेळेत अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटाची विक्री करण्यात येते. व साईंचे दर्शन इ

ाल्यानंतर भक्तांना प्रसाद म्हणून घरी नेण्यासाठी शुध्द तुपातील मोतीचूर लाडूची निर्मिती करुन विक्री करण्यात येते.

श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये देण्यात येणारी स्वामी नारायण चपाती/पुरी, अन्नपाकीटे, मोतीचूर लाडू बनविणेचे काम उक्ते आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेण्यात येत असून मा.व्यवस्थापन समिती दिनांक १९/०२/२०१२ चे सभेतील निर्णय क्रं.१८६ नूसार सन २०१२-२०१३ करीता चपाती/पुरी, मोतीचूर लाडू व अन्नपाकीटे तयार करणेकामी खालील ठेकेदारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

१) मोतीचूर लाडू बनविणेकामी श्री दिपक माधव नाईकवाडी, साकुरी व शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिरडी या दोन ठेकेदारांना अनुक्रमे १) जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/६६५१/२०१२ दि.३१/०३/२०१२. २) जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/६६५२/२०१२ दि.३१/३/१२ अन्वये लाडू प्रति हजारी रु.२४०/- (सर्व करासहीत) व बर्फी प्रति क्विंटल साखरेस रु.२००/- (सर्व करासहीत) असा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

२) चपाती/पुरी बनविणेकामी कनाका फुडस् मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे यांना जा.नं.एसएसएस वशी/प्रसादा/ ६६४९/२०१२ दि.३१/०३/२०१२ अन्वये स्वामी नारायण चपाती करणेसाठी प्रति क्विंटल रु.१०००/- (सर्व करासहीत) व पुरी तयार करणेसाठी रु.९००/- (सर्व करासहीत) असा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

३) अन्नपाकीटे बनविणेचे काम साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी यांना जा.नं.एसएसएस-वशी/ प्रसादा/ ६६५०/२०१२ दि.३१/०३/२०१२ अन्वये प्रति अन्नपाकीटास मजुरी रु.१.७५ पैसे (सर्व करासहीत) असा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

परंतू सदर कामाचा कालावधी दिनांक ३१/०३/२०१३ रोजी संपणार असल्यामुळे पुढील कालावधी दि.०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४ करीता श्री साई प्रसादालयातील चपाती/पुरी, मोतीचूर लाडू व अन्नपाकीटे आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करणेकामी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन जाहीर निविदा मागविणेबाबत मा.व्यवस्थापन त्रिदस्य समिती दिनांक ०७/०२/२०१३ रोजीचे सभेमध्ये निर्णय झालेला आहे. त्याकामी दिनांक १६/०२/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत वृत्तपत्रात व आय.टी विभागामार्फत संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानूसार दिनांक २६/०२/२०१३ रोजीचे वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली असून जाहीरातीतील दिनांक ०९/०३/२०१३ या निर्धारीत मुदतीत निविदाधारकांनी निवीदा (दरपत्रक) सादर केलेले आहेत. परंतु पुढील निर्णय होणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

मा.त्रिसदस्यीय समिती सभा दिनांक ०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.८१ नूसार श्री साई प्रसादालयातील मोतीचूर लाडू व अन्नपाकीटे आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेणेकामी दिनांक ३१/०३/२०१३ नंतर दि.०१/०४/२०१३ पासून पुढील निर्णय होईपर्यंत सन २०१२-२०१३ करीता मंजूर असलेल्या सध्याचेच दरामध्ये मुदतवाढ मिळणेबाबत मोतीचूर लाडू व बर्फी बनविणेकामी श्री दिपक माधव नाईकवाडी, साकुरी यांनी इकडील विभागास आवक नं.१९३५८ दि.१६/०३/२०१३ रोजी व शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिरडी यांनी आवक नं.१९३६० दि.१६/०३/२०१३ रोजी पत्र दिलेले आहे. तसेच अन्नपाकीटे बनविणेकामी साई सिध्दी महिला बचत गट,शिरडी यांनी आवक नं.१९४२३ दि.१८/०३/२०१३ रोजी पत्र दिलेले आहे.

त्यानूसार चपाती/पुरी, मोतीचूर लाडू व बर्फी, अन्नपाकीटे टेंडरबाबत पुढील निर्णय होईपर्यंत दिनांक ०१/०४/२०१३ पासून मोतीचूर लाडू व बर्फी बनविणेकामी श्री दिपक माधव नाईकवाडी, लाडू ठेकदार व शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिरडी, लाडू ठेकेदार या दोन्ही ठेकेदारांकडून तसेच अन्नपाकीटे बनविणेकामी साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी यांचेकडून सन २०१२-२०१३ करीता मंजूर असलेल्या दरामध्ये काम करुन घेता येईल.

परंतू कनाका फुड मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे, चपाती /पुरी ठेकेदार यांनी त्यांचे पत्रात म्हटले आहे की, "आमच्या कामाची मुदत आपल्या करारानूसार दिनांक ३१ मार्च २०१३ रोजी संपत आहे. तरी या तारखेनंतर आपल्या करारानूसार देय केलेल्या कामाची जबाबदारी आमची राहत नाही. पुढील कामाला अडथळा येऊ नये म्हणून या पत्राव्दारे कळवित आहे. त्यामुळे दि.०१/०४/२०१३ पासून साईभक्तांची चपाती/पुरी अभावी गैरसोय होऊ नये याकरीता सध्या अन्नपाकीटे तयार करणेकामी असलेले ठेकेदार साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी यांनी सन २०१२-२०१३ करीता सध्याचे मंजूर असलेल्या दरामध्ये चपाती/पुरी बनविणेचे काम मिळणेबाबत इकडील विभागास आवक नं.१९४२२ अन्वये प्राप्त झालेल्या पत्रानूसार विनंती केलेली आहे. त्यानूसार चपाती/पुरी, टेंडरबाबत पुढील निर्णय होईपर्यंत दिनांक ०१/०४/२०१३ पासून साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी यांना चपाती/पुरी साठी सध्याचेच सन २०१२-२०१३ करीता मंजूर असलेल्या दरामध्ये काम देण्यास हरकत नाही असे वाटते.

चपाती/पुरी, मोतीचूर लाडू/बर्फी ,अन्नपाकीटे टेंडरबाबत पुढील निर्णय होईपर्यंत मोतीचूर लाडू/बर्फी तयार करणेकामी श्री दिपक माधव नाईकवाडी व शिवसाई केटरर्स या दोन्ही लाडू/बर्फी

ठेकेदारांना सन २०१२-२०१३ करीता सध्याचेच मंजूर (१००० लाडू नगास मजुरी रु.२४०/- सर्व्हीस टॅक्ससह व खोबरा बर्फी बनविणेसाठी प्रति क्विंटल साखरेस मजुरी रु.२००/- सर्व्हीस टॅक्ससह) असलेल्या दरामध्ये मुदतवाढ देणेबाबत व अन्नपाकीटे तयार करणेकामी साई सिध्दी महिला बचत गट,शिरडी यांना प्रति अन्नपाकीटास रु.१.७५ पैसे मात्र सर्व्हीस टॅक्ससह मुदतवाढ देणेस तसेच कनाका फुडस् मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि., ठाणे, चपाती/पुरी ठेकेदार यांचे कामाची मुदत दि.३१/०३/२०१३ रोजी संपत असल्याने पुढील कालावधीसाठी दि.०१/०४/२०१३ पासून त्यांनी काम करणेची जबाबदारी आमची राहत नसल्याचे संदर्भिय अं.नं.३ चे पत्रान्वये कळविलेनूसार साईभक्तांची प्रसादभोजनातील चपाती/पुरी अभावी गैरसोय होऊ नये म्हणून दि.०१/०४/२०१३ पासून चपाती/पुरी बनविणेचे काम साई सिध्दी महिला बचत गट, अन्नपाकीटे ठेकेदार यांना सन २०१२-२०१३ करीता सध्याचेच मंजूर (चपाती बनविणेसाठी प्रति क्वि.आटा+मैद्यास रु.१०००/- सर्व करासहीत, व पुरी बनविणेसाठी प्रति क्वि. आटा+मैद्यास रु.९००/- सर्व करासहीत) असलेल्या दरामध्ये द्यावे असे वाटते.

तरी सन २०१३-१४ करीता जाहीरात प्रसिध्द करुन मागविण्यात आलेल्या चपाती/पुरी, मोतीचूर लाडू/ बर्फी, अन्नपाकीटे टेंडरबाबत पुढील निर्णय होईपर्यंत दि.०१/०४/२०१३ पासून पुढील कालावधीसाठी मोतीचूर लाडू/ बर्फी बनविणेकामी श्री दिपक माधव नाईकवाडी, व शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर्स, लाडू ठेकेदार यांचेकडून तसेच अन्नपाकीटे व चपाती/पुरी बनविणेचे काम साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी, यांचेकडून पुर्वीचेच मा.व्यवस्थापन समिती दिनांक १९/०२/२०१२ चे सभेतील निर्णय क्रं.१८६ नूसार मंजूर असलेल्या दरात काम करुन घेणेसाठी प्रशासकीय मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४२ थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेकरीता थर्मिया बी थर्मिक फ्ल्युड खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात मोतीचुर लाडु प्रसादाची बुंदी तळणेसाठी दि. २३.८.२००९ पासुन थरमॅक्स कंपनीचे प्रती तास २ लाख किलो कॅलरी क्षमतेचे थर्मिक फ्ल्युड हिटर वापरणेत येत आहे. सदर यंत्रणेमुळे दैनंदिन इंधन खर्चात कपात झालेली असुन कर्मचाऱ्यांना काम करताना उष्णतेचा त्रास होत नाही. त्यामुळे सदर यंत्रणा बुंदी तळणेसाठी अतिशय फायदेशीर ठरलेली आहे. साईभक्तांच्या गर्दीनुसार थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणा अविरत चालु असते.

थरमॅक्स कंपनीने उत्पादीत केलेल्या थर्मिक फ्ल्युड हिटर करीता कंपनीने शिफारस केलेप्रमाणे फक्त सेल थर्मिया- बी ऑईल वापरावे लागते. सध्या यंत्रणेमध्ये ६०० लिटर थर्मिया-बी थर्मिक ऑईल वापरणेत आलेले आहे. पुर्ण सिस्टीम्समध्ये ऑईल सर्क्युलेट होत असते. दोन तीन महिण्यानंतर ऑईलचे पॅरामीटर (फ्लॅशपॉईंट, व्हिसकॉसिटी, ॲसिडीटी,फायर पॉईंट इनसोल्युबल्स घटक इ.) चेक करुन यंत्रणेची ऑईल लेव्हल करावी लागते. त्यासाठी २०० लि. ऑईलचा साठा असणे गरजेचे आहे. यापुर्वी १९.९.२०१२ रोजी खरेदी केलेल्या ऑईलचा साठा संपत आलेला आहे. थर्मिक फ्ल्युड यंत्रणेची ऑईल लेव्हल करणेसाठी साठयामध्ये ऑईल शिल्लक असणे आवश्यक आहे. थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेस ऑईल लेव्हल करणेकरीता थर्मिया बी ऑईल साठयामध्ये शिल्लक नसल्यास सदरची यंत्रणा बंद ठेवावी लागेल. थर्मिया बी थर्मिक ऑईल हे २०९ लिटरचे बॅरलमध्ये उपलब्ध आहे. यापुर्वी २०९ लिटर ऑईल साठी रु.३२,४४७/- (अक्षरी रुपये बत्तीस हजार चारशे सत्तेचाळीस मात्र) एवढा खर्च आलेला आहे. परंतु आजमितीस पेट्रोलियम उत्पादनांच्या किमंती वाढलेल्या असल्याने याकामी एका बॅरलकरीता अंदाजे ४५,०००/- पर्यंत तर दोन बॅरलकरीता रक्कम रु.९०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. दोन बॅरल थर्मिया-बी ऑईल खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने कोटेशन मागविता येतील.

तरी थर्मिया बी थर्मिक ऑईल खरेदी करणेकामी पुरवठादारांकडुन विहीत पद्धतीने दरपत्रक मागविणेस व येणाऱ्या रु. ९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार मात्र) पर्यंतच्या खर्चास मान्यता घेणेकामी विषयाची टिपणी मा. व्यवस्थापन (त्रिसदस्यीय) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेकरीता थर्मिया बी थर्मिक ऑईल खरेदी करणेसाठी पुरवठादारांकडुन विहीत पद्धतीने दरपत्रक मागविणेस व याकामी येणाऱ्या रु. ९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**विषय नं.४३ मयत अनुकंपा तत्वावर कंत्रादारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती मनिषा कैलास शेजवळ, रा.शिर्डी यांनी त्यांचे पती कै.कैलास गंगाधर शेजवळ यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.०२/०३/२०१३ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला

आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) दिवंगत कैलास गंगाधर शेजवळ यांचे मृत्यू प्रमाणपत्र

२) श्रीमती मनिषा कैलास शेजवळ यांचा शाळा सोडल्याचा दाखला सदर दाखल्यानुसार जन्मतारीख ०१/०६/१९७५अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय २७ वर्ष ०९ म.आहे.

३) श्रीमती मनिषा शेजवळ यांचे इ.०८ वी उतीर्ण असलेचा शाळा सोडल्याचा दाखला सादर केलेला आहे.

४) मनिषा भिकचंद गरुड व मनिषा कैलास शेजवळ या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असलेबाबत मा.तहसिलदार यांचेकडील प्रतिज्ञापत्र

६) श्रीमती मनिषा शेजवळ यांनी दि.२८/०२/२०१३ रोजी मा.तहसिलदार यांचेकडील सादर केलेले प्रतिज्ञापत्र कैलास गंगाधर शेजवळ हे संस्थानचे लेखाशाखा विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे **दि.३१/०१/२०१३** रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- कैलास गंगाधर शेजवळ

०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- वर्ग ४ कर्मचारी, लेखाशाखा

०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि. ०६/०३/१९८९ ते दि.३०/०१/२०१३ एकूण सेवा २३ वर्षे

०४) मृत्यु दिनांक :- ३१/०१/२०१३

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याची पत्नीचे वय ४५ वर्षे असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (१) of Rule ६ - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

दिवंगत शेजवळ हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि.१५/०७/१९९१ नॉमीनेशन पत्रात श्रीमती अनुसयाबाई गंगाधर शेजवळ (दिवंगत शेजवळ यांची आई) यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे. तथापी अनुसयाबाई शेजवळ यांचे दि.१६/०६/२००७ रोजी निधन झालेले आहे. सोबत त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

दिवंगत शेजवळ यांनी भविष्य निर्वाह निधीचे नामनिर्देशन पत्रात वारसदार म्हणून त्यांची पत्नी नामे मनिषा कैलास शेजवळ यांची नेमणूक केलेली आहे.

श्रीमती मनिषा शेजवळ यांनी सादर केलेल्या दि.२८/०२/२०१३ रोजीचे प्रतिज्ञापत्रात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

"श्री आकाश कैलास शेजवळ, कु.प्रियंका कैलास शेजवळ, चि.विकास कैलास शेजवळ यांनी दिवंगत कैलास शेजवळ हे संस्थानकडे कायम सेवेत होते त्यांचे निधनानंतर आमची आई नामे श्रीमती मनिषा शेजवळ यांना आमचे वडिलांचे जागी अनुकंपा तत्वावर नोकरीस घेण्यात आमची पूर्ण संमती आहे. आम्ही स्वतः राजीखुशीने समजून उमजून कुणाच्याही दडपणाला बळी न पडता लिहून देत आहे."

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान

सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांची पत्नी नामे श्रीमती मनिषा कैलास शेजवळ हे उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची **१२३९** स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर **१३३९** इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे ९९ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

" सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे. "

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत शेजवळ यांची पत्नी नामे श्रीमती मनिषा कैलास शेजवळ यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत शेजवळ यांचे जागेवर त्यांची पत्नी नामे श्रीमती मनिषा कैलास शेजवळ यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामास घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**विषय नं.४४ शासनाकडून सेवानियमांस मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहुन आकृतीबंधानुसार स्थायी मंजुर रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती / पदस्थापना देणेबाबत.**

**प्रस्ताव-** शासनाकडून सेवानियमांस मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून आकृतीबंधानुसार स्थायी मंजूर विविध पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेसाठी तत्वतः मान्यता मिळणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीच्या सभेत सादर करण्यात आलेला होता. सदरचे विषयावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

शासनाकडून सेवाप्रवेश नियमास मिळणाऱ्या मान्यतेच्या अधीन राहून मंजूर कर्मचारी आकृतीबंधानुसार विविध हुद्देवरील रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास तत्वता मान्यता देण्यात आली. विविध रिक्त पदांवर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना, पदोन्नती द्यावयाचे पद व त्या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र असलेला संवर्ग, पदोन्नती पदाची शैक्षणिक पात्रता पदोन्नती द्यावयाच्या कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल व पदोन्नतीच्या पदावर काम करण्याची त्यांची कुवत इत्यादी बाबी विचारात घेण्यात याव्यात.

श्री साईबाबा संस्थान हे जागतीक किर्तीचे देवस्थान असून देशविदेशातून साईभक्त शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येतात. शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांना दैनंदिन आवश्यक त्या सर्व पायाभूत सेवा सुविधा योग्य पध्दतीने देणे हा संस्थान प्रशासनाचा उद्देश आहे. त्या दृष्टीने सध्या विविध योजना कार्यान्वीत करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून संस्थानमध्ये जागतीक दर्जाचा आय.टी.प्रोजेक्ट राबविण्यात येत असून, संस्थानचे सर्व विभागांचे संगणीकरण करण्यात येत आहे या आधीची टाईपरायटरची जागा आता संगणकाने घेतली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक झाले असुन प्राप्त परिस्थितीत ही काळाची गरज आहे. त्यामुळे पदोन्नती द्यावयाचे पदावर, पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधित पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी प्रात्यक्षिक संगणकीय चाचणी व लेखी परिक्षा घेण्यात यावी व परिक्षामध्ये मिळणाऱ्या गुणानुसार त्यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन पदोन्नती देण्यात यावी. या परिक्षेत पदोन्नतीस अपात्र ठरणाऱ्या अथवा गुणवत्ता प्राप्त न होणाऱ्या कर्मचाऱ्यांना संधी देण्याचे दृष्टीने त्यांना सहा महिन्याची मुदत देऊन त्यांची पुन्हा समिती समोर फेर परिक्षा घेण्यात यावी.

या परिक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री.प्रशांत खंबसवाडकर, नाशिक यांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच पदनिहाय रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर या पाच सदस्यांची समिती गठीत करण्यात येत असून या समितीसमोर परिक्षेची कार्यवाही करण्यात येऊन कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी.

कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पदांवर पदोन्नती द्यावयाची कार्यवाही ही विभागांतर्गत परिक्षा घेऊन करावयाची असल्याने जात-प्रवर्ग आरक्षणाबाबत विचार करण्यात येऊ नये अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

तद्नंतर सदर समितीचे समोर विहीत पात्रता धारण केलेल्या वर्ग-४ पदावरील कर्मचाऱ्यांच्या दि.२६/०२/२०१२ रोजी १२५ कर्मचाऱ्यांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेऊन सदरचे सिलबंध लखोटे मा.त्रीसदस्य समितीचे समोर उघडून परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त लिपीक-टंकलेखक, कुपन विक्रेता, तारतंत्री, वेल्डर, फिल्टर ऑपरेटर, प्लंबर, सुतार, कातारी, वाहन चालक पदांवर पदस्थापना देण्यात आलेली आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार प्रशासकीय अधिकारी, अधिक्षक, उपअधिक्षक, वरिष्ठ लिपीक, कनिष्ठ पर्यवेक्षक, मुकादम, शिफ्ट सुपरवायझर, पुजारी, वरिष्ठ लेखापाल, लेखाधिकारी, प्रशितन व वातानुकूल पर्यवेक्षक, वर्कशॉप फोरमन, विद्युत पर्यवेक्षक, सहाय्यक अभियंता (विद्युत), कनिष्ठ अभियंता (विद्युत) वगैरे रिक्त पदांवर पदोन्नतीने कार्यवाही करणे बाकी आहे.

वरीलप्रमाणे रिक्त पदांवर कार्यवाही करणेकामी सदरचा विषय मा.त्रीसदस्य समिती दि.१८/०७/२०१२ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करण्यात आलेला होता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता सध्या रिक्त असणाऱ्या प्रशासकीय अधिकारी या पदांच्या ५०% पदांवर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार संवर्गातील व अन्य

संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व उर्वरीत ५०% पदे संस्थान सेवेतील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने घेणेत यावे आणि एक प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक दृष्टया संस्थानचे कामाचे स्वरुप पहाता संस्थानने ठरविलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असलेल्या संवर्गातील घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा.

तसेच अधिक्षक व इतर पदांवर पदोन्नती देणेबाबत यापूर्वी झालेल्या व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ (०३) अन्वये करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

मे.उच्च यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडील सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ IN PIL NO.१८/२०११ मध्ये दि.१६ ऑक्टोबर २०१२ च्या आदेशात पॅरा (६) (d) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

(d) Shall not take steps to recruit staff, employees in regular vacancies.

उपरोक्तप्रमाणे संदर्भ क्र.०२ व ०३ मधील मा.व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करावयाची झाल्यास खालीलप्रमाणे बदल करावे लागतील.

१) विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे कलम ५ मधील पोट-कलम (१), (२) तरतुदीस अनुसरून दि.२७ मार्च २०१२ रोजीचे अधिसूचने अन्वये १५ सदस्सीय व्यवस्थापन समितीचे गठन करणेत आले होते. तथापि, मा.मुंबई उच्चन्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने सदरचे अधिसूचनेस तात्पुरती स्थगिती दिलेली आहे.

त्यानंतर मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार दि.३०/०३/२०१२ पासून श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे कामकाज पहाणेसाठी त्रिसदस्य समितीचे गठन करणेत आलेले आहे.

२) त्यामुळे यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१९/११/२०११ निर्णय क्र.७६५ (३) अन्वये पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची संबंधीत पदावर काम करण्याची कुवत व गुणवत्ता तपासण्यासाठी घ्यावयाचे प्रात्यक्षिक, संगणकीय चाचणी व लेखी परिक्षा घेणेकामी व सदर परीक्षेचे आयोजन करण्यासाठी सल्लागार म्हणून श्री.प्रशांत खंबसवाडकर, नासिक यांची नियुक्ती करणेत आली होती. तसेच पदनिहाय रिक्त पदांवर पदोन्नती देणेकामी मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर या पाच सदस्यांची सिमती गठीत करण्यात आली होती व समितीसमोर परिक्षेची कार्यवाही करणेत येवून कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी असे म्हटले होते. तथापि, मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मा.त्रिसदस्य समितीचे गठन दि.३०/०३/२०१२ पासून करणेत आलेले असल्यामुळे उपरोक्त पाच सदस्यांची समिती आपोआप बरखास्त झालेली आहे. त्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या संबंधीत कर्मचाऱ्यांची प्रात्यक्षिक व लेखी परिक्षा घेणे अडचणीचे झाले आहे.

३) म्हणून मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ (३) व मा.त्रिसदस्य समितीचे दि.१८/०७/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३३ नुसार पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेसाठी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची प्रात्यक्षिक व लेखी परीक्षा घेणेसाठी नवीन सदस्यांची/अधिकाऱ्यांची समिती गठीत करावी लागेल. तसेच सदर परिक्षेचे आयोजन करण्यासाठी मा.श्री.प्रशांत खंबसवाडकर, नासिक यांची सल्लागार म्हणून पुन्हा नियुक्ती करुन त्यांचे मानधन ठरवावे लागेल. व त्यानंतर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेसाठी प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेचे आयोजन करावे लागेल.

४) मंजुर आकृतीबंधानुसार शासनाकडे मान्यता मिळणेकामी प्रस्तावीत केलेल्या भरती नियमात सरळसेवा व पदोन्नतीने पदे भरण्याचे प्रमाण ५०:५० दर्शविले आहे. सरळसेवा तसेच पदोन्नतीने भरावयाच्या पदांपैकी श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलकडील डॉक्टर्स व पॅरामेडीकल स्टाफ तसेच शैक्षणिक संकुलाकडील शिक्षकीय पदे वगळता संस्थानचे इतर विभागाकडील सरळसेवा तसेच पदोन्नतीने भरावयाच्या पदांपैकी रिक्त असलेल्या पदांचा माहिती दर्शविणारा तक्ता यासोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. सरळसेवा तसेच पदोन्नतीने भरावयाच्या पदांपैकी रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नतीने भरती करणेकामी परीक्षेच्या तारखा व वेळ निश्चित करुन परीक्षा कार्यक्रमाबाबत परिपत्रक पारीत करावे लागेल. त्याकामी (a) प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेची पदनिहाय प्रश्नपत्रिका तयार करणे. (b) परिक्षार्थी कर्मचाऱ्यांची बैठक व्यवस्था करणे. (c) पेपरची तपासणी करुन गुणपत्रकांच्या अंतिम याद्या तयार करणे व त्याबाबतचा अहवाल मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करणे. याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल असे मत आहे.

तरी सरळसेवा तसेच पदोन्नतीने भरावयाच्या पदांपैकी रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नतीने भरती करणेकामी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची प्रात्यक्षिक व लेखी परिक्षा घेणेकामी नविन सदस्यांची/ अधिकाऱ्यांची समिती गठण करणे, परिक्षा कार्यक्रम निश्चित करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये सरळसेवा तसेच पदोन्नतीने भरावयाच्या पदांपैकी रिक्त असलेल्या पदांवर पदोन्नतीने भरती करणेकामी पात्र असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांची प्रात्यक्षिक व**

**लेखी परिक्षा घेणेसंबंधीची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग यांनी करावी व संस्थानच्या कामकाजासंबंधी परिक्षांव्दारे कुशल व चांगले कर्मचारी उपलब्ध करावेत, पदोन्नती संदर्भात पात्र कर्मचाऱ्यांच्या याद्या तयार करुन व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवाव्यात. सध्याची समिती मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये गठीत असल्याने सध्या व्यवस्थापन समितीचे मार्गदर्शनाखाली सर्व प्रक्रिया पुर्ण करावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**विषय नं.४५** **साईआश्रम १ व २ चे अंतर्गत इमारतीमधील फायबर केबलच्या कार्यादेशाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ]** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ एप्रिल, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३५० नुसार, साई आश्रम १ व २ या इमारतीमध्ये अंतर्गत दळणवळणासाठी लागणारी फायबर केबल टाकुन व ती जोडण्यासाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी अंदाजे रक्कम रुपये २३,१०,०००/- खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन, साई आश्रम १ व २ या इमारतीमध्ये अंतर्गत दळणवळणासाठी लागणारी फायबर केबल व ती जोडण्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करुन व ते टाकुन मिळणेसाठी विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा दिनांक ०८/१२/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडून चर्चा/वाटाघाटीसाठी सादर केल्या असता, निविदाधारकांनी वाटाघाटी अंती खालीलप्रमाणे दर सादर केलेले होते.

| **अ.नं.** | **कोटेशन सादरकर्त्यांचे नांव / पत्ता** | **कोटेशनमधील दर रु.** | **चर्चा/ वाटाघाटी नंतर देऊ केलेले दर रु.** |
|---|---|---|---|
| ०१ | Manibhadra Electrical Pvt. Ltd., Mumbai | अपूर्ण | अनुपस्थित |
| ०२ | Sai Infonet, Thane | ११,७७,९०४/- | ११,३०,७८७/- |
| ०३ | Minitek System (I) Pvt. Ltd., Nashik | १२,११,००१/- | ११,८६,८७९/- |
| ०४ | Sai Infonet, Thane | ११,७७,९०४/- | ११,३०,७८७/- |
| ०५ | Hindustan Enermax, Nashik | १२,००,०००/- | अनुपस्थित |
| ०६ | Raj Infotech Pvt. Ltd., Nashik | ६,३५,३७४/- | **६,३५,३७४/-** |
| ०७ | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik | ९,७२,०००/- | **७,५०,०००/-** |
| ०८ | Micronova Impex Pvt. Ltd., Bangalore | १५,५७,२८८/- | १३,२३,६४४/- |

उपरोक्त निविदांमध्ये मे. राज इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांची निविदा रक्कम रुपये ६,३५,३७४/- या न्युनत्तम दराची होती. परंतु त्यांनी निविदेत नमूद केलेले साहित्य संस्थानचे मागणीप्रमाणे नव्हते (संस्थानने निविदेत AMP Tyco कंपनीचे साहित्य नमूद केलेले होते. परंतु में राज इन्फोटेक यांनी Dlink कंपनीचे साहित्य नमूद केलेले होते). चर्चेच्यावेळी मे. राज इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांनी सादर केलेल्या दरातच संस्थानचे मागणीनुसार AMP Tyco कंपनीचे साहित्याचा पुरवठा करणेबाबत अनुमती दर्शविलेली होती. त्यामुळे त्यांची निविदा स्विकारण्यात येऊन पुरवठा होणारे साहित्य टेंडरमधील अटी / शर्तीनुसार आहे, याची खात्री करुन घेण्यात यावे, असे ठरले आहे.

**ब]** दिनांक ०८/१२/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. १००६ नुसार, साई आश्रम १ व २ येथे अंतर्गत इमारतीमध्ये फायबर केबल व अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी मे. राज इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांना संदर्भ क्र. ०४ ने कार्यादेश रजिस्टर पोस्टाने तसेच कार्यादेशाची स्कॅन केलेली प्रत ई-मेलव्दारे पाठविण्यात आलेली होती. परंतु रजिस्टर पोस्टाने पाठविलेला कार्यादेश पुन्हा इकडील विभागास (Left Add असा पोस्टाचा शेरा आहे.) परत आलेला आहे.

मे. राज इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांनी कार्यादेशात नमूद केलेल्या AMP कंपनीचे साहित्या ऐवजी Dlink या कंपनीचे साहित्य देण्यास तयार आहे. अथवा AMP कंपनीचेच साहित्य आवश्यक असल्यास सदर कार्यादेश पूर्ण करणेसाठी रक्कम रुपये १,५०,०००/- ची अतिरिक्त मागणी दिनांक १६/०२/२०१३ रोजीचे ई-मेलव्दारे केलेली आहे.

मे. राज इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांचे नंतरचे न्युन्नत्तम कोटेशनधारक मे राक्का इन्फोटेक यांनी वाटाघाटीचे वेळी रक्कम रुपये ७,५०,०००/- इतके दर सादर केलेले असून संस्थानचे मागणी नुसार साहित्य पुरविणेस ते तयार होते. में राज इन्फोटेक प्रा. लि. नाशिक यांना त्यांचे दि. १६/०२/२०१३ रोजीचे ई-मेलनुसार रक्कम रुपये १,५०,०००/- अतिरिक्त रक्कम दिल्यास त्यांचे दर ७,८५,३७४/- होतात, सदरची रक्कम मे राक्का इन्फोटेक यांनी सादर केलेल्या रक्कम रुपये ७,५०,०००/- या दरापेक्षा जास्त आहे.

मे राक्का इन्फोटेक प्रा.लि. नाशिक यांचेशी संपर्क केला असता, रक्कम रुपये ७,५०,०००/- निविदेमध्ये नमुद केलेनुसार साई आश्रम १ व २ या इमारतीमध्ये अंतर्गत दळणवळणासाठी लागणारी फायबर केबल तसेच सदर केबल जोडण्यासाठी आवश्यक साहित्याचा पुरवठा करुन तसेच टाकुन देणेस तयार असून, सदर कार्यादेशासाठी त्यांनी ६० दिवसांची वैधता देत असलेबाबत दि. २१/०२/२०१३ रोजीचे ई-मेलव्दारे इकडील विभागास कळविलेले आहे.

त्यानुसार साई आश्रम १ व २ येथे अंतर्गत इमारतीमध्ये फायबर केबल व अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी मे. राज इन्फोटेक प्रा. लि. नाशिक यांचा कार्यादेश रद्द करुन त्यांना तसे ई-मेलव्दारे कळवावे लागणार आहे. तसेच मे राक्का इन्फोटेक प्रा.लि. नाशिक यांनी वाटाघाटी नंतरचे सादर केलेले दर रक्कम रुपये ७,५०,०००/- ला त्यांना कार्यादेश देता येईल, असे नम्र मत आहे.

**क]** मे. राज इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांनी कार्यादेशानुसार साहित्य पुरविण्याची कार्यपूर्तता त्यांचेकडून झालेले नाही. यामध्ये त्यांनी संस्थानचा वेळ वाया घातलेला आहे. त्यामुळे मे राज इन्फोटेक प्रा. लि., नाशिक यांचे नांव संस्थानचे BLACK LIST यादीमध्ये समाविष्ठ करण्यात यावे, असे नम्र मत आहे.

उपरोक्त ब मध्ये नमूद केलेप्रमाण मे. राज इन्फोटेक प्रा. लि. नाशिक यांचा कार्यादेश रद्द करुन त्यांना तसे ई-मेलव्दारे कळविणेस व नंबर दोनचे न्युनत्तम कोटेशनधारक मे राक्का इन्फोटेक प्रा.लि. नाशिक यांनी वाटाघाटी नंतरचे सादर केलेले दर रक्कम रुपये ७,५०,०००/- ला त्यांना कार्यादेश देणेच्या निर्णयास्तव तसेच क मध्ये नमूद केलेप्रमाणे मे राज इन्फोटेक प्रा. लि., नाशिक यांचे नांव संस्थानचे BLACK LIST यादीमध्ये समाविष्ठ करण्याचे मान्यतेस्तव सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम १ व २ चे इमारतीमध्ये अंतर्गत दळणवळणासाठी लागणारी फायबर केबल व ती जोडण्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करणेसाठी चर्चा/ वाटाघाटीमधील निम्नतम दरधारक मे. राज इन्फोटेक प्रा. लि. नाशिक यांनी पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली असल्याने त्यांना दिलेला कार्यादेश रद्द करणेत येऊन त्यांचे नाव संस्थानचे काळया यादीमध्ये समाविष्ट करणेत यावे.**

**तसेच, द्वितीय निम्नतम दरधारक मे.राक्का इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांचे रु.७,५०,०००/- हे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४६** **साईटेक प्रकल्पाचे वाढीव खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयांनुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मा. श्री. के. व्ही. रमणी सो. यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी यांना प्रकल्प उभारणी साठीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्प एकुण ६ टप्प्यामध्ये कार्यान्वीत करण्यात येणार आहे. करारनाम्यानुसार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्विकारल्यापासून १८ महिन्याच्या कालावधीत साईटेक प्रकल्प उभारणीचे काम पुर्ण करावयाचे आहे.

करारनाम्यानुसार प्रकल्प उभारणीचे काम जानेवारी २०१० ला सुरु होऊन जुन २०११ ला पुर्ण होणे अपेक्षित होते. साईटेक प्रकल्प उभारणीच्या सुरवातीच्या काळात सर्व्हर रुम व नेटवर्क उभारणीचे काम हाती घेण्यात आले होते. सर्व्हर रुम उभारणीचे ठिकाण सुरवातीला मंदिर परिसरातील जुने आयटी विभागात ठरले होते, परंतु श्री साईबाबांच्या समाधीचा शतक महोत्सवास होणारी संभाव्य गर्दि लक्षात घेता मंदिर परिसरातील कार्यालय भविष्यकाळात हलविण्यात आले तर सर्व्हर रुम ही हालवावी लागेल हे लक्षात घेऊन सर्व्हर रुमची जागा बदलविण्यात आलेली आहे. तसेच शिर्डीत नेहमी असणारी साईभक्तांची गर्दी तसेच रस्त्याच्या दुतार्फा असलेली दुकानांची गर्दी यामुळे संस्थानचे विविध विभागांना नेटवर्कद्वारे जोडण्यासाठी आवश्यक असलेली फायबर केबल टाकणेसाठी अनेक अडचणी आल्या. उपरोक्तप्रमाणे प्रकल्प उभारणीचे कामात आलेल्या अडचणींमुळे प्रकल्प ठरविलेल्या वेळेत कार्यान्वीत करण्यास विलंब झालेला आहे.

प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील कार्यप्रणाली या दि. १४/०७/२०११ रोजी कार्यान्वीत करण्यात ओलेल्या आहेत. या कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे आहेत :-

१. ऑनलाईन सर्व्हिसेस २. दर्शन पास

३. प्रसादालय कुपन विक्री ४. रुम रिझर्वेशन

कॉग्नीझंट कंपनीबरोबर झालेल्या करारनाम्यानुसार प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेली पहिली कार्यप्रणाली स्वीकारल्यापासून १८ महीन्याच्या कालावधीत उर्वरीत कार्यवाही पुर्ण होणे अपेक्षीत होते. परंतु प्रकल्प उभारण्याच्या कामात आलेल्या विविध अडचणींमुळे प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण करणे अशक्य झालेले होते. प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट कंपनी व श्री साईबाबा संस्थान यांना सहमतीने निर्धारीत वेळेत बदल करण्याचा अधिकार (SOW Clause No.४.१) आहे.

सदर करारनाम्यानुसार कॉग्नीझंट कंपनीचे साईटेक प्रकल्प उभारणीसाठी Revised Deployment Plan ला दिनांक १८/०७/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.६२६ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

**Revised SaiTech Development Plan**

1.Infrastructure Milestones :

| Sr. No. | Infra Projects | Old Date of Completion | New Date of Completion |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | Reliance - Airtel - Internet Auto fail over | 09.04.2010 | 30.06.2012 |
| 02. | Reliance RF implementation | 09.04.2010 | 30.04.2012 |
| 03. | Remote Infocenter set up | 09.04.2010 | 31.07.2012 |
| 04. | Backup links for remote Infocenters | 09.04.2010 | 30.09.2012 |
| 05. | DR implementation | 09.04.2010 | 30.07.2012 |

2. Application Milestones :

| Sr. No. | Milestone | Old Date of Completion | New Date of Completion (Go-Live) |
|---|---|---|---|
| 1 | Release 1 A (Online System, Prasadalay - I, Accommodation, Darshan Pass PI) | 31.05.2010 | 14.07.2011 |
| 2 | Release 1 B (Finance System, Inventory System, Prasadalay - II) | 31.05.2010 | 14.07.2011 |
| 3 | Release 2 (Donation, Cheque DD, Postal MO)) | 31.08.2010 | 03.09.2012 |
| 4 | Release 3 - A (Life Membership, Saileela Membership, Book Store and Book Shop, Canteen, Telephone Billing,) | 30.11.2010 | 10.09.2012 |
| 5 | Release 3 - B (Cloth Store and Cloth Shop, Laddu Prasad (ERP)) | 30.11.2010 | 17.09.2012 |
| 6 | Release 4-A (Legal Department, Guest Information, Water Supply, Inward/Outward Tracking, Kiosk) | 28.02.2011 | 03.12.2012 |
| 7 | Release 4-B (Meeting Section , Medical Aid, Construction, Electrical Dept.) | 28.02.2011 | 04.01.2013 |
| 8 | Release 5 (Vehicle Dept, HR & Payroll, Labour, Education Complex , Information systems for Sr. officers(RTI Incl), Security Dept.) | 31.05.2011 | 16.02.2013 |
| 9 | Release 6 (Festival Budgeting & Mgmt., Record Maintenance, Q-mgmt. phase-2, Integration with HMS system, MIS) | 30.06.2011 | 28.03.2013 |
| 10 | Release 7 (Proxy & Email integration/ setup Old Data Migration | -- | 28.03.2013 |
| 11 | Final Integration: Review, monitoring and tuning of all 37 SaiTech implemented systems for features, performance and user feedback. | -- | 31.03.2013 |

सदर Revsied Plan नुसार सर्व संगणक प्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी राबविणे बंधंनकारक होते. परंतु Release-IV मधील लाडूप्रसाद ते Release-VII पर्यंत (दिनांक १६/०२/२०१३ पर्यंत) कोणतीही संगणक प्रणाली राबविलेली नाही. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन होत आहे. याबाबत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना विचारणा केली असता, त्यांनी दिनांक २२/११/२०१२ रोजीचे पत्राव्दारे सदर प्रकल्पासाठी येणारा खर्च त्यांना देऊ असलेल्या रक्कमेपेक्षा जास्त होत आहे. सबब त्यांनी खालील दोन पर्याय कळविलेले आहे.

पर्याय क्र. १) प्रकल्प पूर्ण करणेसाठी रक्कम रुपये २३.७० कोटीची अधिक मागणी केलेली आहे.

पर्याय क्र. २) करारनाम्यानुसार मान्य झालेल्या रक्कमेत (२१.८७ कोटी) सद्यस्थितीत चालू असलेल्या १५ संगणक प्रणालींसाठी माहे एप्रिल, २०१७ पर्यंत दुरुस्ती-तथा-देखभालीचे कामे करण्यात येईल, असे कळविलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे साईटेक प्रकल्पाचे वाढीव खर्चाबाबतचा सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाचे वाढीव खर्चाबाबत चर्चा करणेसाठी साईटेक प्रकल्पाचे अध्यक्ष मा.श्री.के.व्ही.रमणी व सदरहू प्रकल्पाचे काम करणारे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना पुढील सभेसमोर समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.४७** **श्री साईबाबा औ.प्र.संस्थेसाठी (अ) प्रात्यक्षिकासाठी कच्चा माल, (ब) प्रशिक्षणार्थ्यासाठी स्टेशनरी, (क) प्रशिक्षणार्थ्यासाठी कार्यशाळा गणवेश व नियमित गणवेश (ड) माहितीपुस्तिका व प्रवेशअर्ज छपाई (इ) प्रशिक्षणार्थाचे खर्चाने गणवेश, सेप्टी शुज-सॉक्स व केद्रशासनाच्या NIMI संस्थेची पुस्तके खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे नविन शैक्षणिक वर्ष ऑगष्ट २०१३ पासून सुरु होत आहे,या सत्रामध्ये प्रवेश घेणा-या प्रशिक्षणार्थी संख्या खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र | व्यवसायाचे नांव | युनीट | प्रथम वर्षव्यवसाय तुकडया |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | टुल ॲण्ड डायमेकर | ०२ | २१ |
| ०२ | इलेक्ट्रीशियन | ०२ | २१ |
| ०३ | मोटर मेकॅनीक | ०२ | २१ |
| ०४ | फिटर | ०२ | २१ + २१ प्रस्तावीत |
| ०५ | मेकॅनीक आर.ए.सी. | ०२ | २१ |
| ०६ | मशिनीष्ट ग्राईंडर | ०२ | १६ |
| ०७ | टर्नर | ०२ | १६ |
| ०८ | आय.टी.ॲण्ड ई.एस.एम. | ०२ | २१ |
| ०९ | कॉम्पुटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामींग असिस्टंट | ०२ | ५२ |
| १० | वेल्डर (गॅस ॲण्ड इलेक्ट्रीक) | ०२ | ३२ |
| ११ | ट्रॅक्टर मेकॅनीक | ०२ | ४२ |
| १२ | क्राफ्टसमन फुड प्रॉडक्शन | ०१ | २१ |
| | | | ३०५ +२१ = ३२६ |

संस्थेमार्फत प्रात्यक्षिकासाठी कच्चा माल, प्रशिक्षणार्थ्यांसाठी स्टेशनरी, कार्यशाळा गणवेष व नियमीत गणवेष, प्रवेश प्रकियेसाठी माहितीपुस्तिका-प्रवेशअर्ज तसेच प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने गणवेष,सेप्टी शुज-सॉक्स व केंद्रशासनाच्या NIMI संस्थेची पुस्तके यांची दरवर्षी खरेदी केली जाते. या सत्रासाठीही खरेदी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. याबाबत अंदाजे खर्च व तपशिल खालीलप्रमाणे.

**अ) प्रात्यक्षिक प्रशिक्षणासाठी कच्चा माल खरेदी :-**

२०१३-१४ शैक्षणिक वर्षासाठी लागणारा प्रात्यक्षिक कच्चा माल व भांडारमध्ये शिल्लक असलेला कच्चा माल यांची पडताळणी करुन खरेदीकरीता आवश्यक असलेल्या कच्चा माल खरेदीकामी अंदाजे रु.५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**ब) प्रशिक्षणार्थ्यांसाठी स्टेशनरी खरेदी:-**

| अ. क्र. | स्टेशनरी तपशिल | खरेदी आवश्यक | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | जॉबशिट वही ५० पानी मॅपलिथो कागद ८०जीएसएम दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ३४X२१ से.मि.११.७ कि .ग्रॅम (छपाई नमुन्या प्रमाणे) | २०० नग | ५०/- | १०,०००.०० |
| ०२ | थेअरी पेपर्स (१०० नगाचा ०१ पॅड) मॅपलिथो कागद ८०जीएसएम,११.७ कि .ग्रॅम ३४X२१ से.मि. (नमुन्या प्रमाणे) | ५०० पॅड | ६०/- | ३०,०००.०० |
| ०३ | दैनंदिनी छापील ७० पेजेस (नमुन्याप्रमाणे) जे.के.बॉण्ड पेपर | ५०० नग | ७०/- | ३५,०००.०० |
| ०४ | २ क्वायर रजिष्टर ३४X२१ से.मि.(नमुन्या प्रमाणे) | ४५० नग | ४०/- | १८०००.०० |
| ०५ | ड्रॉईंग १/४ इंपेरीयल रजिष्टर ५० शिटचे एक रजिष्टर सन शाईन कागद ५६X३६ से.मि.(कागद व छपाई नमुन्या प्रमाणे) | २०० नग | ८०/- | १६,०००.०० |
| ०६ | सेट स्क्वेअर ओमेगा कंपनी ४५ व ६० अंश | २०० नग | ५०/- | १०,०००.०० |
| | | | एकुण... | १,१९,०००.०० |

**क) प्रशिक्षणार्थ्यांसाठी कार्यशाळा गणवेष-**

| अ. नं. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष (डांगरी) | २२३ | २२३ | ६००/- | १,३३,८००.०० |
| ०२ | CFP प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | २१ | २१ | ६००/- | १२,६००.०० |
| ०३ | COPA प्रशिक्षणार्थी कार्यशाळा गणवेष | ५२ | ५२ | २००/- | १०,४००.०० |
| ०४ | मुलींसाठी ॲप्रान | ३० | ३० | २००/- | ६,०००.०० |
| | | | | एकुण... | १,६२,८००.०० |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होउ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.

**ड) माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज छपाई बाबत. :-**

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची सत्र ऑगष्ट २०१३ मधील प्रवेश प्रक्रिया एस.एस.सी.चा निकाल घोषीत झालेच्या दुस-या दिवसापासुन सुरु होत असते. प्रवेशाबाबतची माहिती उमेदवारांना देणेकामी संस्थेची माहिती पुस्तिका छपाई करुन घ्यावी लागते. त्यामध्ये संस्थेमध्ये चालविले जाणारे

व्यवसाय, प्रवेश पध्दती, संस्थेची नियमावली व इतर माहिती उमेदवारांना माहिती पुस्तिकेतुन दिली जाते.या दृष्टीने या सर्व उपक्रमांची माहिती माहिती पुस्तिकेतुन उमेदवार व समाजापर्यंत पोहचविली जाते.

यांकरीता यावर्षीच्या माहिती पुस्तिकेमध्ये वरील सर्व उपक्रमांची माहिती तसेच वेळोवेळी संकलीत केलेले फोटोग्राफ्स समाविष्ठ करुन माहिती पुस्तिका चांगल्या दर्जाची छपाई करुन घ्यावी असे मत आहे.

ऑगष्ट २०११-१२ या वर्षात ३००० माहिती पुस्तिका,प्रवेश अर्ज व प्रवेश कार्यक्रम पत्रिका हे रु.१०.९० प्रती नग या दराने छपाई करुन रु.१५/- या दराने वितरीत केली. माहिती पुस्तिका छपाई करुन घेतलेस अंदाजे रु.१५/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार रु.१५/- या दराने ती वितरीत करता येईल. या प्रमाणे माहिती पुस्तिका व नियमावली ५००० नग पर्यंत छपाईसाठी रु.७५०००/- खर्च अपेक्षित आहे.

**इ) पुस्तके,गणवेष व शुज विद्यार्थ्यांच्या खर्चाने :-**

| अ.क्र. | तपशिल | संख्या | आवश्यक नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्रशिक्षणार्थी नियमीत गणवेष (प्रत्येकी दोन गणवेष) | ५९२ | ५९२ | ६००/- | ३,५५,२००.०० |
| ०२ | मुलींसाठी सलवार कुर्ता (प्रत्येकी दोन गणवेष ) | ६० | ६० | ६००/- | ३६,०००.०० |
| ०३ | प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षणार्थीनी शुज,मोजे | ३२६ | ३२६ | ७००/- | २,२८,२००.०० |
| ०४ | केंद्र शासनाच्या नॅशनल इन्स्ट्रक्शनल मेडीया इन्स्टीटयूटने (NIMI) प्रकाशित केलेली पुस्तके | ३०५ | ३०५ | ६००/- | १,८३,०००.०० |
| | | | | **एकुण..** | **८,०२,४००.००** |

यामध्ये मुलींची सख्या कमी-जास्त होऊ शकते त्यामुळे वरील मुलांच्या संख्येमधुन आवश्यकतेनुसार कमी-जास्त करता येईल.अशी वरील अ, ब, क, व ड नुसार एकुण रु.८,५६,८००/-ची खरेदी ही खरेदी विभागामार्फत प्रचलित पध्दतीने खरेदी करता येईल. तसेच वरील छ इ छ बाबत मागील वर्षी पर्यंत प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने नियमित गणवेष,शुज व NIMI पुस्तकांसाठी प्रवेशाचे वेळी अनामत रक्कम घेउन ती लेखाशाखेत अनामत खाती ठेऊन एकत्रित खरेदी प्रक्रिया करुन पुरविण्यात येत असत व त्यांची उर्वरित रक्कम परत देणे किंवा अधिकची रक्कम लागल्यास त्यांचेकडून जमा घेणेस अशी पध्दती अवलंबीलेली आहे. चालू वर्षी याकामी प्रशिक्षणार्थ्याकडून प्रत्येकी रु.२५००/-जमा घेता येतील. तसेच सदर रक्कम लेखाशाखेत कपडे,पुस्तके व शुज अनामत खाती ठेऊन खरेदी व वितरण प्रक्रिया पुर्ण करता येईल.

वरीलप्रमाणे खरेदी ही खरेदी विभागामार्फत प्रचलित पध्दतीने न्यूनतम दरानुसार खरेदी करणेस व कार्यवाहीस मान्यतेसाठी सदरचा विषय हा मा.व्यवस्थापन समिती पुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३०८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.४८ ४९ वी राज्य स्तरीय कौशल्य स्पर्धेमधील श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या यशाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण हे केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालया अंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिग (D.G.E.&T) यांचे व्दारा राज्य शासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनायाचे नियंत्रणाखाली चालते. यामध्ये निरनिराळया १०० हुन अधिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यापैकी फक्त १५ व्यवसायांची राष्ट्रीय पातळीवर कौशल्य स्पर्धा घेण्यात येते. त्या त्या व्यवसायसातुन देशात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला त्या वर्षाचा सर्वोत्कृष्ट कारागीर (Best Craftsman Of The Year) घोषित करण्यात येते. त्यास प्रमाणपत्र, व रोख रु.५०,०००/- पारितोषिक केंद्र शासनाकडून देण्यात येते. या स्पर्धेसाठी प्रत्येक राज्यातुन प्रत्येक ट्रेडसाठी फक्त एक सर्वोत्तम विद्यार्थी पाठविण्यात येतो. महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी विद्यार्थी निवडण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे दोन टप्प्यात होते.

टप्पा १- विभागीयस्तर कौशल्य स्पर्धाः- महाराष्ट्र राज्याच्या ६ महसुल विभागातुन विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा घेण्यात येते. प्रत्येक परिक्षा केंद्रावरील वार्षिक अखिल भारतीय व्यवसाय परिक्षेमधील त्या त्या ट्रेड मधील प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे प्रशिक्षणार्थी त्यात सहभागी होतात. यातून पात्र ठरणाऱ्या फक्त प्रथम व व्दितीय क्रमांकाचे प्रशिक्षणार्थी राज्यस्तरावर पोचतात.

त्यानुसार नाशिक येथे पार पडलेल्या ४९ व्या विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा परिक्षेमध्ये आपल्या संस्थेचे ०७ ट्रेडचे १९ प्रशिक्षणार्थी बसले. स्पर्धेत त्या विभागातून जास्तीत जास्त १४ प्रशिक्षणार्थी राज्यस्तर कौशल्य स्पर्धेसाठी पात्र ठरु शकतात. यात आपल्या संस्थेचे ६ ट्रेडचे ८ प्रशिक्षणार्थी पात्र ठरले.

टप्पा-०२ राज्यस्तर कौशल्य स्पर्धा:- विभागीय स्तरावरुन प्रत्येक विभागातुन फक्त प्रथम व व्दितीय क्रमांक प्राप्त केलेले प्रशिक्षणार्थी राज्यस्तर स्पर्धेसाठी पात्र ठरतात.

यानुसार औरंगाबाद,सातारा,अंबरनाथ व नाशिक येथे पार पडलेल्या ४९ व्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धा परिक्षेमधुन आपल्या संस्थेचे ०४ प्रशिक्षणार्थी राज्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होवून ४९ व्या अखिल भारतीय कौशल्य स्पर्धेसाठी पात्र ठरले.

सदर परिक्षा दि.८/०१/२०१३ ते १२/०१/२०१३ या कालावधीत खालील परिक्षा केंद्रावर झाल्या असुन राज्यात प्रथम आलेल्या प्रत्येक विद्यार्थ्या सोबत शासनांनी संरक्षक (Escort) अधिकारी नियुक्ती केले. पात्र ठरलेले प्रशिक्षणार्थी, परिक्षा केंद्र व शासनानी नियुक्त केलेले संरक्षक अधिकारी याचा तपशिल खालील प्रमाणे -

| अ.नं | प्रशिक्षणार्थ्यांचे नांव | व्यवसाय | राज्य शासनाने नियुक्त केलेले संरक्षक अधिकारी | ४७ व्या राष्ट्रीय कौशल्य स्पर्धा परिक्षेचे केंद असलेले केंद्र शासनाची संस्था |
|---|---|---|---|---|
| ०१ | शेख अर्शद उस्मान | टर्नर | श्री बी.व्ही.फडतरे, उपप्राचार्य,शासकीय औ. प्र.सं, अंबरनाथ श्री एस.टी.थोपटे, उपप्राचार्य,शासकिय औ. प्र.सं, मुलुंड | ॲडव्हान्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट, सायन,चुनाभट्टी,व्ही.एन.पुरव मार्ग,मुंबई-४०००२ |
| ०२ | देवरे नानासाहेब विठ्ठल | यांत्रिक प्रशितन व वातानुकुलीकरण | श्री शिवलिंग पटणे, प्राचार्य, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी. | ॲडव्हान्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट, हावडा-७१११०५ कोलकाता. |
| ०३ | उपाध्ये सागर बाबासाहेब | मेकॅ.मोटर व्हेईकल | श्री अनिल शिंदे उपप्राचार्य, शासकिय औ. प्र.सं,सांगली. | ॲडव्हान्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट,विधानगर, हैद्राबाद. |
| ०४ | कु.शेख नर्गिस अयमोद्दीन | कोपा | | |

यावर्षी राज्य शासनानी कोलकत्ता केंद्रावर राष्ट्रीय स्पर्धा परीक्षेला जाणा-या आपल्या संस्थेच्या प्रशिक्षाणार्थ्या बरोबर पुणे,मुंबई व भंडारा येथिल चार प्रशिक्षणार्थ्यांचे संरक्षक म्हणून आपल्या संस्थेचे प्राचार्य यांची नियुक्ती केली होती.

सदर कार्यक्रम प्रभावीपणे पार पाडणेसाठी विभागीय व राज्यस्तर स्पर्धेसाठी निवासी मार्गदर्शन शिबीर आयोजित केले. जानेवारी २००९ मध्ये प्राचार्य यांच्या अध्यक्षेतेखाली स्थापीत कौशल्य स्पर्धा पुर्व तयारी समिती मधिल सर्वश्री ए.एस.दुनाखे, बी.के.मुठे , जी.व्ही राणे, पी. व्ही सोनवणे, पी.व्ही.शिवशरण व एल.एम.सुर्यवंशी यांनी यासाठी विशेष मेहनत घेतली. स्पर्धेपुर्वी संस्थेमध्ये सर्वश्री वाय.पी.एंडाईत, ए.एस.पवार, जी.एच.शिंदे, एल.ए.चोळके, पी.एस.बनसोडे, टी.बी.रहाणे व कु.पी.डी.वैद्य यांनी आवश्यकतेनुसार प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ज्या राज्याचे सर्वाधिक प्रशिक्षणार्थी अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षेत प्रथम येतील किंवा पात्र ठरतील. ते राज्य 'सर्वोत्कृष्ट राज्य' हा बहुमान व त्यासाठी मानाची फिरती ढाल जिंकु शकते.

पुरस्काराच्या या स्पर्धेमध्ये ज्या संस्थेचा प्रशिक्षणार्थी देशात सर्वप्रथम येतो. ती संस्था 'सर्वोत्कृष्ट संस्था' हा पुरस्कार जिंकु शकते. आता आपल्या संस्थेचे एकाच वेळी चार प्रशिक्षणार्थी अखिल भारतीय स्तरावर उतरवण्या पर्यंतचे मोठे यश आपल्या संस्थेने मिळविलेले आहे.

या यशासाठी संस्थान प्रशासन व मा. त्रिसदस्य समितीचा पार्ठींबा अत्यंत महत्वाचा ठरला.

सदरील यशाची माहीती मा.त्रिसदस्य समिती सभेसमोर अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.३०९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.४९ श्री साईसत्चरित्र देशभरातील व जगभरातील साईभक्तांना उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

उपरोक्त तरतूदीनुसार प.पु. श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत वेगवेगळया भाषेत साईचरित्र, आरत्या वगैरे पुस्तकांची फोटोची छपाई, तसेच सी.डी., व्हीसीडीची निर्मीती करुन विक्री केली जाते. दिवसेंदिवस

साईभक्तांची वाढणारी लक्षणीय संख्या विचारात घेता संस्थान प्रकाशनास मोठ्या प्रमाणात मागणी निर्माण झाली आहे. साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून वेळोवेळी पुस्तक, फोटो छपाई व सीडी - व्हीसीडी निर्मीती करावी लागते, सध्या उपरोक्त कामाची कार्यालयीन पद्धती खालील प्रमाणे आहे.

१) याकामी मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने वार्षीक बजेट तरतूद करण्यात येते.

२) गरजेनुसार छपाईकामी मा. व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता घेण्यात येते.

३) मा.उच्च न्यायालयाचे हुकूमनाम्याप्रमाणे छपाईकामी जाहिरात देवून दरपत्रके मागविणे, आलेली दरपत्रके मा. व्यवस्थापन समितीसमोर उघडण्यात येतात. विक्री किंमती निश्चित करतांना छपाईची किंमत आधिक कर्मचा-यांचा पगार, स्टेशनरी, विद्युत आकार वगैरे खर्च विचारात घेता साधारणपणे छपाई किंमतीच्या २०% अधिक भक्तांना देण्यात येणारा डिस्कांउट २०% याप्रमाणे विक्री किंमत मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने ठरविण्यात येते.

४) देशातील विविध राज्यातील विविध भाषिक साईभक्त साई चरित्रांची मागणी करत असतात. त्यांची माहिती खालीलप्रमाणे

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | भाषा | अंदाजे वार्षिक खप |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित | मराठी | ५०,००० |
| ०२ | श्री साई सत्‌चरित्र | हिंदी | १,५०,००० |
| ०३ | श्री साई सत्‌चरित्र | इंग्रजी | ७०,००० |
| ०४ | श्री साई सत्‌चरित्र | तेलगु | १,५०,००० |
| ०५ | श्री साई सत्‌चरित्र | कन्नड | ४०,००० |
| ०६ | श्री साई सत्‌चरित्र | तामिळ | ४०,००० |
| ०७ | श्री साई सत्‌चरित्र | मल्याळम | ७,००० |
| ०८ | श्री साई सत्‌चरित्र | बंगाली | ३,००० |
| ९ | श्री साई सतचरित्र | ओडीया | २५,००० |
| १० | श्री साई सच्चरित | कोकणी | ५०० |
| ११ | श्री साई सत्‌चरित्र | उर्दू | ५०० |
| १२ | श्री साई सत्‌चरित्र | पंजाबी | ५०० |
| १३ | श्री साई सत्‌चरित्र | नेपाळी | ५०० |
| १४ | श्री साई सत्‌चरित्र | गुजराथी | ३०,००० |
| १५ | श्री साई सत्‌चरित्र | सिंधी | ५०० |
| १६ | श्री साई सतचरित्र | आसामी | ५०० |

५) मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर निम्नतम दर असणा-या प्रेसला छपाई कामाचे कार्यादेश देण्यात येतात.

सध्या देशातील व परदेशातील साई मंदिरांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने साईचरित्रासाठीही मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे. मात्र या सर्व ठिकाणी वेळेवर साईचरित्राचा पुरवठा करणे शक्य होत नाही. याकरीता साईभक्तांची गैरसोय होऊ नये, वेळीच प्रकाशने उपलब्ध व्हावीत यासाठी खालील प्रमाणे उपाय योजना कराव्या असे मत आहे.

**अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) द्वारे साईचरित्र छपाईसाठी जे न्यूनतम दर निश्चित केलेले आहे त्याच दराने मुंबई, चेन्नई,बेंगलोर व सिकंदराबाद या ठिकाणच्या प्रिंटर्सकडून छपाई करुन घेणे व त्याचा पुरवठा येथील माहिती केंद्रास करणे. या केंद्राव्दारे याबाबतचा हिशोब व लेखाजोखा ठेवता येईल. त्यामुळे शिर्डीहून उपरोक्त ठिकाणी साईचरित्र पाठविणेकामी जो वाहतूक खर्च येतो व कालावधी लागतो त्यात बचत होऊन वेळेचा अपव्यय होणार नाही. तसेच स्थानिक भाषेतील प्रिंटर्सकडून छपाई झाल्याने छपाईमध्येही चुका होणार नाही.

**ब)** देशाच्या कानाकोपऱ्यात साईबाबांची मंदिरे वाढत आहेत. या प्रत्येक मंदिरात दर्शनासाठी आलेले साईभक्त साईचरित्राची मागणी करतात. त्यामुळे ही मंदिरे तसेच दानशूर साईभक्त हे मोठया प्रमाणात त्या त्या प्रादेशिक भाषेतील साईचरित्राची मागणी करत असतात. यामध्ये वेळेचा अपव्यव होवून वाहतूक व पोस्टेज खर्चही वाढतो. सध्या संस्थान स्थानिक प्रिंटर्सकडून न्युनतम दराने छपाई करून सदर प्रिटींगचा माल शिर्डी येथे मागवतो व मग संबंधितांना पाठविला जातो. याकरीता उपरोक्त ४ शहरांव्यतिरिक्त इतर मोठ्या शहरांमध्ये तेथील भाषेतील साईचरित्रे त्याच ठिकाणच्या प्रिंटर्सकडून संस्थानच्या न्युनतम दराने छपाई करुन घेऊन, छपाईकामी आलेल्या खर्चाची रक्कम तेथील साईचरित्रांची मागणी केलेल्या साईमंदिराने अथवा

दानशूर साईभक्ताने संबंधित प्रिंटर्सला आदा करावी व त्यांचेकडून साईचरित्रे घ्यावीत. यामुळे संस्थानमार्फत विविध मोठ्या शहरांमध्ये पोस्ट,कुरीयर व ट्रान्सपोर्ट याद्वारे पाठविण्यात येणारे साईचरित्रे तेथील भक्तांना त्या ठिकाणी मिळतील व वेळेचा अपव्यय होणार नाही. संस्थानवर याचा कुठलाही आर्थिक भार पडणार नाही. मात्र सदर मंदिरांना/देणगीदार भक्तास साईचरित्राची विक्री करता येणार नाही. त्याचे वितरण मोफत करावे लागेल. तसेच संस्थानचे मुळ चरित्र सीडीत कोणत्याही स्वरुपाचा बदल करता येणार नाही. उदा.दिल्ली, चंदीगढ, सिमला, पाटना, भुवनेश्वर, लखनौ, इंदोर, भोपाळ, अहमदाबाद, बडोदा, कोलकाता आदि शहरांमध्ये मोठया प्रमाणात त्या- त्या प्रादेशिक भाषेतील साईचरित्राची मागणी असते. अशा शहरातील साईभक्तांना, मंदिरांना व दानशूर साईभक्तांना साईचरित्र मिळणे सहजसुलभ होईल व साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार होणेस मदत होईल.

**क)** साईबाबांची महती सातासमुद्रापार पोहचल्याने आता परदेशात अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, मलेशिया या देशांमध्येही साईबाबांची मंदिरे झालेली आहेत. या मंदिरात दर्शनासाठी आलेले साईभक्त साईचरित्राची मागणी करतात. याकरीता परदेशात ज्या ज्या ठिकाणी साईमंदिरे आहेत त्या त्या ठिकाणच्या साईमंदिरांना संस्थानच्या इंग्रजी साईचरित्राची सी.डी.देवून सदर मंदिरांनी संस्थानच्या न्युनतम दराने त्याच ठिकाणच्या प्रिंटर्सकडून साईचरित्रे छपाई करुन घेऊन, छपाईकामी आलेल्या खर्चाची रक्कम संबंधित प्रिंटर्सला आदा करावी व त्यांचेकडून साईचरित्रे घ्यावीत. संस्थानवर याचा कुठलाही आर्थिक भार पडणार नाही. संस्थानचे मुळ चरित्र सीडीत कोणत्याही स्वरुपाचा बदल करता येणार नाही. यामुळे परदेशातील साईभक्तांना साईचरित्र मिळणे सहजसुलभ होईल व साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार होणेस मदत होईल.

श्रीसाईचरित्र हा ग्रंथ साईबाबा यांचे संबंधीच्या वाड्मयात सर्वश्रेष्ठ ग्रंथ म्हणून साईभक्तांना परिचित आहे. श्रीसाईबाबांच्या अद्‌भुत लीलांचा व उपदेशांचा संग्रह या ग्रंथात आहे. हा ग्रंथ म्हणजे साईभक्तांची गीता ज्ञानेश्वरीच आहे. तेव्हा उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केल्यास हा ग्रंथ सर्व साईभक्तांना सहजसुलभ प्राप्त होईल व साईबाबांच्या कार्याचा प्रचार व प्रसार होणेस मदत होईल असे वाटते.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसत्‌चरित्र ग्रंथ देशभरातील व जगभरातील साईभक्तांना उपलब्ध करुन देणेकामी शिर्डी कार्यालयाकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेत येऊन मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चा/वाटाघाटी करणेत याव्यात व वाटाघाटीअंती निम्नतम दर देणाऱ्या प्रेसधारकास छपाईचा कार्यादेश देण्यात यावा. मात्र प्रेसधारकांकडून छपाई कामाचे दर मागविताना प्रस्तावित छपाईपैकी ७०% छपाईचा पुरवठा संबंधीत भाषा असलेल्या राज्यांमध्ये संस्थानचे माहिती केंद्रावर व ३०% छपाईचा पुरवठा शिर्डी येथे पोहोच करणेचे अटीसह निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५०** **सन २०१४ ची एक्झ्युक्युटीव्ह श्री साई दैनंदिनी छपाई करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान द्वारा प्रतिवर्षी ६'x९' साईजची श्री साई दैनंदिनी प्रकाशित करुन विक्री केल्या जातात सन २०१३ च्या २,५०,०००/- दैनंदिनी, प्रती नग रु.५०/- दराने छपाई करुन, प्रती नग रु.५५/- दराने विक्री केल्या आहेत.

तथापि ब-याच भक्तांकडून संस्थानने डिलक्स (Executive Diary) विक्रीस ठेवाव्यात अशी मागणी होत आहे. त्यांचे मागणीचा विचार करुन प्रायोगिक तत्त्वावर इंग्रजी भाषेतील सन २०१४ च्या ५००० नग डिलक्स दैनंदिनी छपाई कराव्यात असे नम्र मत आहे.

छपाई मा.उच्च न्यायालयाचे हुकूमनाम्यानुसार वृत्तपत्रात जाहिरात देऊन,निविदा प्रपत्रे विक्री करुन, प्राप्त निम्नतम दरधारकांकडून करुन घेता येईल.

प्रस्तावित छपाईकामी प्रती नग अंदाजे रु.१५०/- दराने रु.७,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. दैनंदिनी विक्रीस चांगला प्रतिसाद मिळाल्यास मंजूर दराने आवश्यक जादा प्रतींची छपाई करुन घेता येईल. प्रकाशने विभाग दैनंदिनी/दिनदर्शिका/पुस्तके/फोटो छपाईकामी सन २०१३-१४ आर्थिक वर्षासाठी रु.११,८७,५०,०००/- ची अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आली असून, त्यातून सदर खर्च करता येईल.

१) प्रस्तावित छपाई करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.७,५०,०००/- खर्चास मान्यता असावी.

२) प्रस्तावित छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणे, प्रपत्र विक्री करणेकामी येणा-या तद्‌नुषंगिक खर्चास मंजूरी असावी.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१४ ची एक्झ्युक्युटीव्ह श्री साई दैनंदिनी छपाई करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेत याव्यात. असे ठरले.**

**तसेच, सदर छपाईसाठी येणारा अंदाजे रु.७,५०,०००/- मात्र व जाहिरातीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५१ श्री साईलीला व्दैमासिक मराठी, हिंदी-इंग्रजी अंक व वर्गणीदारांना अंक पाठविणेकामी पाकिटे छपाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करीलछ

श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी चे वतीने श्री साईलीला द्वैमासिक अंक छपाई करुन वर्गणीदारांना पाठविले जातात.

सन २०१२-२०१३ चे साईलीला अंक छपाईकामी मा.व्य.समितीचे निर्णयानुसार प्रकाशने विभागाकडील अधिकृत यादीतील प्रेसधारकांना दरमागणी पत्रे पाठवून दरपत्रके मागवून न्यूनतम दरधारकांकडून छपाई करुन घेण्यात येत आहेत. मे.टॅको व्हीजन्स्, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/ वशी/ प्रकाशने/ २३५२/२०१२ दि.२५.०८.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आला असून, त्याची मुदत जुलै-ऑगस्ट २०१३ अखेर आहे.

श्री साईलीला द्वैमासिक अंक छपाई

| अ.नं. | तपशिल | प्रति महा छपाई संख्या | मंजूर दर रुपये पैसे | वार्षिक वर्गणी | किरकोळ विक्री |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी (५अंक) ३२ + ४ पाने =३६ पाने | १५,००० नग | १२.६३ | ५०/- | ८/- |
| ०२ | दसरा विशेषांक मराठी (१ अंक) ६४ +४ = ६८ पाने | १५,००० नग | २०.८८ | | १५/- |
| ०३ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (५अंक) ३२ +४ =३६ पाने | १७,००० नग | १२.४८ | ५०/- | ८/- |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी (१ अंक) ६४ +४ =६८ पाने | १७,००० नग | २०.८२ | | १५/- |

वर्गणीदारांना अंक पाठविणेकामी पाकीटे छपाई

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | मंजर दर |
|---|---|---|---|
| ०१ | 'श्री साईलीला द्वैमासिके- मराठी ' पोष्टाने पाठविण्यास आवश्यक छापील पाकीटे साईज ११.५ "X ८.५"+ १.७" फ्लॅप, छपाईसाठी ८० जी.एस.एम. क्राफ्ट ब्राऊन पेपर. | १,००,००० | ०.८४ पैसे |
| ०२ | श्री साईलीला हिंदी-इंग्रजी पाकीटे | १,१०,००० | ०.८२ पैसे |

सन २०१३-१४ (माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१३ ते जुलै-ऑगष्ट २०१४) या कालावधीसाठी प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

**अ) श्री साईलीला द्वैमासिक अंक छपाई**

| अ.नं. | तपशिल | द्वैमासिक अंदाजे छपाई संख्या | एकूण छपाई संख्या | अंदाजे दर रुपये पैसे | अंदाजे दराने अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी (५अंक) ३२ + ४ पाने =३६ पाने | १५,००० नग | ७५००० | १५.०० | ११२५०००.०० |
| ०२ | दसरा विशेषांक मराठी (१ अंक) ६४ +४ = ६८ पाने | १५,००० नग | १५००० | २५.०० | ३७५०००.०० |
| ०३ | साईलीला अंक हिंदी-इंग्रजी (५अंक) ३२ +४ =३६ पाने | १७,००० नग | ८५००० | १५.०० | १२७५०००.०० |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी (१ अंक) ६४ +४ =६८ पाने | १७,००० नग | १७००० | २५.०० | ४२५०००.०० |
| | | | एकूण खर्च रु. | | ३२,००,०००.०० |

**ब) वर्गणीदारांना अंक पाठविणेकामी पाकीटे छपाई**

| अ.नं. | तपशिल | अंदाजे छपाई संख्या | अंदाजे दर | अंदाजे दराने एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | ' श्री साईलीला द्वैमासिके - मराठी ' पोष्टाने पाठविणेस आवश्यक छापील पाकीटे साईज ११.५ "X ८.५"+ १.७" फ्लॅप, छपाईसाठी ८० जी.एस.एम. क्राफ्ट ब्राऊन पेपर. | १,००,००० | १.०० | १०००००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | श्री साईलीला हिंदी-इंग्रजी पाकीटे | १,१०,००० | १.०० | ११००००.०० |
| | | | एकूण खर्च रु. | २१००००.०० |

अ + ब एकूण खर्च रु.३४,१०,०००/-

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने संदर्भीय हुकूमनाम्यान्वये दि.२१.१२.२०१२ पासून पुढे प्रकाशनांची छपाई करुन घेतांना वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन, निविदा मागवून प्रकाशनांची छपाई करुन घेणेबाबत आदेश आहेत. त्यानुसार प्रकाशने छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी कराव्या लागतील छपाईकामी अंदाजे रु.३४,१०,०००/- खर्च अपेक्षीत आहे. छपाई खर्च १० लाखापेक्षा जास्त असल्याने व्यवस्थापन समितीचे सभेची खर्चास मान्यता मिळालेनंतर मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

सन २०१३-१४ चे अंदाज पत्रकात साईलीला अंक छपाई खर्च खाते रु.७५,००,०००/- ची तरतूद करणेत आली असून, त्यातून सदर खर्च करता येईल. प्रकाशनांची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब खालील बाबींवर निर्णय होणेस सादर.

१) साईलीला द्वैमासिके व पाकीटांचे प्रस्तावीत छपाईस व त्याकामी येणारे अंदाजे रु.३४,१०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

२) प्रस्तावित छपाई खर्च रु.१०,००,०००/- पेक्षा जास्त असल्याने मा.उच्च न्यायालयाचे मंजूरीसाठी प्रस्ताव दाखल करणेस मान्यता असावी.

३) प्रस्तावित छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणे, प्रपत्र विक्री करणेकामी येणा-या तद्नुषंगिक खर्चास मंजूरी असावी.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वर्गणीदारांना श्री साईलीला व्दैमासिक मराठी, हिंदी-इंग्रजी अंक व अंक पाठविणेसाठी आवश्यक असलेल्या पाकिटांकरिता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विहीत पध्दतीने छपाई करुन घेणेत यावी. प्रस्तावित छपाईकामी येणाऱ्या अंदाजे रु.३४,१०,०००/- मात्रचे खर्चास, तसेच जाहिरातीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**प्रस्तावित छपाईकामी व येणाऱ्या खर्चासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन त्यांचे मान्यतेनंतर सदरची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५२** **दरवर्षाप्रमाणे सन २०१४ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी तसेच श्री साई दिनदर्शिका छपाई करुन किफायतशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

सन २०१३ चे श्री साई दैनंदिनी तसेच श्री साई दिनदर्शिकांचे छपाईकामी मा.व्य.समितीचे निर्णयानुसार प्रकाशने विभागाकडील अधिकृत यादीतील प्रेसधारकांना दरमागणी पत्रे पाठवून दरपत्रके मागवून न्यूनतम दरधारकांकडून छपाई करुन घेण्यात आली होती.

| अ.नं. | तपशिल | मंजूर दर | विक्री दर | आदेशीत संख्या | जमा संख्या | विक्री संख्या | शिल्लक साठा दि.२२.२.१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी - २०१३ | ५०.०० | ५५/- | २,५०,००० | २५००५१ | २५००५१ | ० |
| ०२ | श्री साई दिनदर्शिका २०१३ चे १ पानी मोठी (१९" x २९") | १४.०० | २०/- | ३,००,००० | ३००००० | ३००००० | ० |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०१३ चे १ पानी लहान (१७" x २२") | ८.७७ | १०/- | ३,००,००० | ३००००० | ३००००० | ० |
| ०४ | श्री साई दिनदर्शिका २०१३ चे ६ पानी मोठी (१९" x२९") | २१.७५ | २५/- | ५०,००० | ५०००० | २२००० | २८००० |

अ.नं. १ ते ३ ची विक्री पूर्ण झाली आहे. तथापि क्र.४ चे दिनदर्शिकांची मार्च २०१३ अखेर विक्री पूर्ण होणार नाही. उपरोक्त तक्त्यातील प्रकाशनांचा विक्रीचा प्रतिसाद लक्षात घेता, सन.२०१४ करीता प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | प्रस्तावित छपाई संख्या | अंदाजे दर | अंदाजे दराने अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २०१४ | २,८०,००० | ७०.०० | १९६०००००.०० |
| ०२ | श्री साई दिनदर्शिका २०१४ चे १ पानी मोठी (१९" x २९") | ३,००,००० | २०.०० | ६००००००.०० |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका २०१४ चे १ पानी लहान (१७" x २२") | ३,००,००० | १५.०० | ४५०००००.०० |
| ०४ | श्री साई दिनदर्शिका २०१४ चे १२ पेजेस मोठी (१९छ x२९छ) | २५,००० | २५.०० | ६२५०००.०० |
| | | | **एकूण रु.** | **३०७२५०००.००** |

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने संदर्भीय हुकूमनाम्यान्वये दि.२१.१२.२०१२ पासून पुढे प्रकाशनांची छपाई करुन घेतांना वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन, निविदा मागवून प्रकाशनांची छपाई करुन घेणेबाबत आदेश आहेत. त्यानुसार प्रकाशने छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी कराव्या लागतील छपाईकामी अंदाजे रु.३,०७,२५,०००/- खर्च अपेक्षीत आहे. छपाई खर्च १० लाखापेक्षा जास्त असल्याने व्यवस्थापन समितीचे सभेची खर्चास मान्यता मिळालेनंतर मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

सन २०१३-१४ चे अंदाज पत्रकात पुस्तके/फोटो/दैनंदिनी /दिनदर्शिका छपाई खर्च खाते रु.११,८७,५०,०००/- ची तरतूद करणेत आली असून, त्यातून सदर खर्च करता येईल. प्रकाशनांची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब खालील बाबींवर निर्णय होणेस सादर.

**१)** दैनंदिनी/दिनदर्शिका २०१४ चे प्रस्तावीत छपाईस व त्याकामी येणारे अंदाजे रु.३,०७,२५,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**२)** प्रस्तावित छपाई खर्च रु.१०,००,०००/- पेक्षा जास्त असल्याने मा.उच्च न्यायालयाचे मंजूरीसाठी प्रस्ताव दाखल करणेस मान्यता असावी.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन २०१४ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिकांची छपाई करणेसाठी त्यांची संख्या निश्चित करणेत यावी. त्यानंतर वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेत याव्यात. सदरहू छपाईकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,०७,२५,०००/- मात्रचे खर्चास, तसेच जाहिरातीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**सन २०१४ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई व सदरहू कामी येणाऱ्या खर्चासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन त्यांचे मान्यतेनंतर सदरची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५३** **दरवर्षीप्रमाणे सन २०१४ चे श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतूद आहे.

श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने खालीलप्रमाणे डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन किफायतशिर किंमतीला विक्री केल्या जातात.

सन २०१३ चे छपाईकामी मा.व्य.समितीचे निर्णयानुसार प्रकाशने विभागाकडील अधिकृत यादीतील प्रेसधारकांना दरमागणी पत्रे पाठवून,दरपत्रके मागवून, न्यूनतम दरधारकांकडून छपाई करुन घेणेत आली होती. आदेशीत छपाई संख्या, प्राप्त संख्या, जमा संख्या व शिल्लक साठा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | छपाईचा तपशिल | आदेशीत संख्या | छपाई दर | विक्री दर | जमा संख्या | विक्री संख्या | शिल्लक साठा दि.२२.२.१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर २०१३ (८ पेजेस) आकार २२"X ३५" | २५,००० | १७८/- | २००/- | २२८२६ | १९३८१ | ३४४५ |
| ०२ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स २०१३ (७ पेजेस) आकार १९.२५" x २७.२५" | ८००० | २३२/- | २५०/- | ७,५०० | ६११० | १३९० |
| ०३ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर २०१३ (सिंगल पेज) आकार १९" X २७" | १०,००० | २४०/ | २५०/- | ५७६० | २९९० | २७७० |
| ०४ | श्री साईबाबा थ्रीडी- ७ शिटर डेस्क कॅलेंडर २०१३ आकार ९.७५" X ०७" | २०,००० | १६६/- | १८०/- | १६८५९ | ९८३३ | ७०२६ |

सन-२०१४ करीता प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | प्रस्तावित छपाई संख्या | अंदाजे दर | अंदाजे दराने अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर २०१४ (८ पेजेस) आकार २२"X ३५" | २५००० | २००/- | ५००००००.०० |
| ०२ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स २०१४ (७ पेजेस) आकार १९.२५" x २७.२५" | ७५०० | २५०/- | १८७५०००.०० |
| ०३ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर २०१४ (सिंगल पेज) आकार १९" X २७" | ५,००० | २५०/- | १२५००००.०० |
| ०४ | श्री साईबाबा थ्रीडी - ७ शिटर डेस्क कॅलेंडर २०१४ आकार ९.७५" X ०७" | १५००० | २००/- | ३००००००.०० |
| | | | एकूण रु. | १,११,२५,०००.०० |

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने संदर्भीय हुकूमनाम्यान्वये दि.२१.१२.२०१२ पासून पुढे प्रकाशनांची छपाई करुन घेतांना वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन, निविदा मागवून प्रकाशनांची छपाई करुन घेणेबाबत आदेश आहेत. त्यानुसार प्रकाशने छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी कराव्या लागतील छपाईकामी अंदाजे रु.१,११,२५,०००/- खर्च अपेक्षीत आहे. छपाई खर्च १० लाखापेक्षा जास्त असल्याने व्यवस्थापन समितीचे सभेची खर्चास मान्यता मिळालेनंतर मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करता येईल.

सन २०१३-१४ चे अंदाज पत्रकात पुस्तके/ फोटो/ दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाई खर्च खाते रु.११,८७,५०,०००/- ची तरतूद करणेत आली असून, त्यातून सदर खर्च करता येईल. प्रकाशनांची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब याकामी खालील बाबींवर निर्णय होणेस सादर.

१) श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१४ चे प्रस्तावीत छपाईस व त्याकामी येणारे अंदाजे रु.१,११,२५,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

२) प्रस्तावित छपाई खर्च रु.१०,००,०००/- पेक्षा जास्त असल्याने मा.उच्च न्यायालयाचे मंजूरीसाठी प्रस्ताव दाखल करणेस मान्यता असावी.

३) प्रस्तावित छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणे, निविदा प्रपत्र विक्री करणेकामी येणा-या तदनुषंगिक खर्चास मान्यता असावी.

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३१४** **सदरहू चर्चेच्या वेळी मुंबई कार्यालयाने सन- २०१३ चे छपाईमध्ये, प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं.०१ चे ९९० नग, अ.नं.३ चे १०० नग व अ.नं.४ चे ३२० नग दिनदर्शिका स्विकारुन त्यांची विक्रीही केलेली आहे, अशी सभेस माहिती देण्यात आली. याची नोंद घेण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका- २०१४ ची प्रस्तावित छपाई करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेत**

**याव्यात. सदरहू छपाईकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,११,२५,०००/- मात्रचे खर्चास, तसेच जाहिरातीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका- २०१४ छपाईस व या कामी येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन त्यांचे मान्यतेनंतर सदरची कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.५४** **श्री साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय स्वागत अंकाचे विनामुल्य वितरणाबाबत.**

**प्रस्ताव-** विदेशात श्री साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा म्हणून मा.व्य.समितीचे दि.२४.०९.११ सभेतील निर्णय क्र.७५५ अन्वये आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी द्वैमासिक चालू करण्याचे ठरले असून, सदर मासिकाच्या संपादनासाठी श्री. रघुनाथ रेड्डी, तिरुपती यांची मानद संपादक म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. श्री रेड्डी यांनी संपादीत केलेल्या स्वागत अंकाची २०,००० प्रतींची छपाई मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९.०२.२०१२ निर्णय क्र.२३८ नुसार मे.टॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांचेकडून प्रती नग रु.१०८/- दराने करणेत आली असून, छपाई खर्च रु.२१,६०,०००/- झालेला आहे. श्री रेड्डी यांनी दिलेल्या यादीप्रमाणे विदेशात ज्या शहरांमध्ये अंक पाठवायचे आहेत, त्यांचे पत्ते टाकूण ५० नगाचे २९२ बंडल तयार करुन मुंबई कार्यालयात जमा आहेत. संस्थान आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी द्वैमासिक नव्यानेच सुरु करीत आहे हे विदेशातील सर्व साईभक्तांना विदीत व्हावे, तसेच विदेशातील साईभक्तांनी अधिकाधिक संख्येने सदर मासिकाचे सभासदत्व (Subscription) घ्यावे असे आवाहन स्वागत अंकात केले असून, पुढील नियमीत द्वैमासिक अंकांची वार्षिक वर्गणी वगैरेबाबत माहिती त्यात देणेत आली आहे. सदर स्वागत अंक विदेशात विनामूल्य वितरीत करणेकामी करावयाच्या तदनुषंगीक कार्यवाहीसाठी येणा-या अंदाजे रु.३०,००,०००/- चे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.३९२ नुसार मान्यता आहे. या कार्यवाहीचा भाग म्हणून, वितरणाचा खर्च रु.५/- लाखापेक्षा जास्त असल्याने, अधिनियामान्वये प्रचलीत तरतूदीनुसार दि.१९.०९.२०१२ चे मंजूर टिपणीनुसार एक्सपोर्ट कंपन्याद्वारा सागरी व हवाई मार्गाने अंक पाठविणेकामी दि.१४.०७.२०१२ अखेर दरपत्रके सादर करणेकामी दि.०३.०७.२०१२ च्या दोपहरका सामना मुंबई आवृत्तीत जाहीरात देणेत आली होती. याकामी जाहीरातीचा खर्च रु.२६,४००/- झालेला आहे. उपरोक्तकामी एकही निविदा प्राप्त झालेली नाही. मे.बाबा क्लिअरींग ॲन्ड फॉरवर्डींग प्रा.लि., मुंबई व वालीया एक्सपोर्ट कं., मुंबई यांचेची दूरध्वनीवरुन संपर्क साधून सदरकामी दरपत्रक भरणेबाबत कळविले होते. तथापि त्यांनी सांगीतले की, ज्या शहरात अंक पाठवायचे आहेत तेथील पार्टीने त्या देशातील विमानतळावरुन पार्सल ताब्यात घेणे आवश्यक आहे. आम्ही फक्त मुंबई ते विदेशातील विमानतळापर्यंत पार्सल पोहच करु. डोअर डिलीव्हरी देणार नाही. या कारणामुळे कोणीही दरपत्रक भरले नसावेत.

सदर विषय मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे निदर्शनास आणून दिला असता, सदर अंक पोष्टाने पाठविणेकामी कार्यवाही केलेस किती खर्च येईल याबाबत मुंबई येथून माहिती घ्यावी असे निर्देश दिले होते.

कार्यालय अधीक्षक,मुंबई कार्यालय यांनी त्याबाबतची माहिती सादर केली आहे.

१) विदेशातील शहरात बुक पोष्टाने कोणतेही पार्सल पाठविले जात नाही. त्यामुळे स्पीड पोष्टाने अथवा रजिष्टर पोष्ट पार्सलने अंक पाठवावे लागतील.

२) स्पीड पोष्टाने पार्सल पाठवायचे असल्यास ३५ किलो पावेतो पार्सल जाऊ शकते प्रेसकडून ५० नगांचे प्रती २१-२५४ कि.ग्रॅमचे २९२ पार्सल बंडल जमा आहेत. त्यास खालीलप्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | देशाचे नांव | प्रती बंडल खर्च | बंडल | अंदाजे एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | ऑस्ट्रेलिया | १५,०११.०० | ५६ | ८४०६१६.०० |
| ०२ | युनायटेड किंगडम | १०,५२३.०० | ४० | ४२०९२०.०० |
| ०३ | न्युझीलंड | १४,८८८.०० | २२ | ३२७५३६.०० |
| ०४ | मलेशिया | ५,७४२.०० | ६० | ३४४५२०.०० |
| ०५ | कॅनडा | १५,२१९.०० | ४६ | ७०००७४.०० |
| ०६ | बहारीन | ५,५११.०० | ०१ | ५५११.०० |
| ०७ | युएसए | १४,९३६.०० | ६८ | १०१५६४८.०० |
| | | एकूण | २९३ | ३६५४८२५.०० |

रजिष्टर्ड पोष्ट पार्सलने अंक पाठवायचे असल्यास एका बंडलचे वजन २० किलोपेक्षा जास्त नसावे. प्रेसकडून जमा झालेली २९२ बंडल्स २१.२५४ कि.ग्रॅमची असल्याने सर्व बंडल्स खोलून प्रत्येकी २० किलोची करुन परत पॅकींग करावी लागतील रजिष्टर्ड पोष्ट पार्सलसाठी खालीलप्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | देशाचे नांव | प्रती बंडल खर्च | बंडल | अंदाजे एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | ऑस्ट्रेलिया | ५,५३० | ६० | ३३१८००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | युनायटेड किंगडम | ५,६०८ | ४३ | २४११४४.०० |
| ०३ | न्युझीलंड | ५,५३० | २४ | १३२७२०.०० |
| ०४ | मलेशिया | ३,९८० | ६४ | २५४७२०.०० |
| ०५ | कॅनडा | ७,५०५ | ४९ | ३६७७४५.०० |
| ०६ | बहारीन | ३,९५० | ०१ | ३९५०.०० |
| ०७ | युएसए | ३,९५० | ७३ | २८८३५०.०० |
| | | एकुण | ३१४ | १६,२०,४२९.०० |
| | रिपॅकींग, वाहतुक व हमाली करणेकामी येणारा अंदाजे खर्च रु. | | | ३०००००.०० |
| | | | एकूण रु | १९२०४२९.०० |

रजिष्टर्ड पार्सलने अंक पाठविल्यास, तुलनेने खर्च खूपच कमी लागतो.तथापि २९३ बंडल खोलून २१.२५४ ऐवजी २० किलोचे करावे लागतील त्यासाठी लागणारा खर्च गृहीत धरला तरीही तुलनेने खर्च कमी येईल.

उपरोक्त सविस्तर अहवालाचा विचार करता, त्यासंबंधी खालील प्रमाणे निर्णय होणेकामी टिपणी मा.व्य.समितीचे सभेपुढे ठेवणेत आली होती.

१) विदेशात रजिष्टर्ड पोष्ट पार्सलने अंक पाठविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१९,२०,४२९/- चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०७.२०१२ च्या सभेतील निर्णय क्र.४८२ नुसार पुढील नियमित साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय द्वैमासिक अंक छपाईबाबतचा विषय स्थगीत ठेवणेत आलेला आहे. सबब त्यावर अंतीम निर्णय होणे आवश्यक आहे. अंक छपाई न करता वेबसाईटवर प्रकाशित करता येईल असे नम्र मत आहे.

३) विदेशात अंक न पाठविता , विदेशातील जे साईभक्त शिरडीस दर्शनास येतील त्यांना तसेच विदेशातील सर्व मंदिरांचे व्यवस्थापकांना त्यांचे मागणीनुसार जनसंपर्क कार्यालयामार्फत विनामूल्य देणेबाबत विचार होणेस विनंती.

४) आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी स्वागत अंक छपाईकामी झालेला खर्च व मोफत वितरणकामी होणारा खर्च Publication Expenses खाते नावे टाकता येईल.

दि.०८.१२.२०१२ चे सभेत निर्णय क्र.८३६ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले आहे.

तथापि सदर अंक एक वर्षापासून मुंबई कार्यालयात पडून असल्याने मोठ्या प्रमाणात जागा अडकून पडली आहे. तसेच अंकाचे संपादन जाने-२०१२ मध्ये झाल्याने अंक कालबाह्य झाले आहेत. लेखा परिक्षणाचे दृष्टीने दि.३१.०३.२०१२ चे आत सदर छपाई खर्च रु.२१,६०,०००/- मात्र Publication Expenses खाते नावे टाकावा लागेल.

सबब या विषयी पुनर्विचार होऊन खालील बाबींवर निर्णय होणेकामी सादर.

१) विदेशात अंक न पाठविता, विदेशातील शिरडीस श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना जनसंपर्क कार्यालयामार्फत सदर अंकांचे विनामूल्य वितरण करणेस मान्यता असावी.

२) लेखा परिक्षणाचे दृष्टीने आंतरराष्ट्रीय साईलीला इंग्रजी स्वागत अंक छपाईकामी आलेला खर्च रु.२१,६०,०००/- मात्र Publication Expenses खाते नांवे टाकणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विदेशामधून श्रींचे दर्शनासाठी शिरडी येथे येणाऱ्या विदेशी साईभक्तांना जनसंपर्क कार्यालयामार्फत श्री साईलीला इंग्रजी आंतरराष्ट्रीय स्वागत अंकांचे विनामूल्य वितरण करणेस व सदर अंक छपाईसाठी आलेला रु.२१,६०,०००/- मात्र खर्च Publication Expenses खाते नांवे टाकणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.५५** **श्री साईबाबा संस्थानमध्ये श्री गजानन महाराज देवस्थान, शेगांव यांच्या धर्तीवर सेवेकरी/ सेवाधारी उपक्रम सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष साहेब यांचे आदेशानुसार गुरुवार दि.३१.०१.२०१३ ते ०२.०२.२०१३ पर्यंत श्री गजानन महाराज देवस्थान, शेगांव यांच्या विविध उपक्रमांची माहिती घेणेसाठी मा.डॉ.यशवंतराव माने, उपकार्यकारी अधिकारी यांचे समवेत खालील प्रमाणे अधिकारी, कार्यालय अधिक्षक व प्रतिनिधी हजर होते.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | विभाग | हुद्दा |
|---|---|---|---|
| १. | श्री बी.डी.साबळे | प्रशासन शाखा | प्रशासकिय अधिकारी |
| २. | डॉ. एम.के.पठारे | साईनाथ रुग्णालय | प्र.वैद्यकीय अधिक्षक |
| ३ | श्री एम.जे. यादव | जनसंपर्क कार्यालय | जनसंपर्क अधिकारी |
| ४ | श्री यु.पी.गोंदकर | श्री साई प्रसादालय विभाग | कार्यालय अधिक्षक |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्री एस.एम. जोरी | बांधकाम विभाग | शाखा अभियंता |
| ६ | श्री व्ही.एम. शिवगजे | कनिष्ठ महाविद्यालय | प्र.प्राचार्य |
| ७ | श्री एस.एम. पाटणी | संरक्षण विभाग | सुरक्षा निरिक्षक |
| ८ | श्री एन.पी. निकम | आरोग्य विभाग | वरिष्ठ लिपीक |
| ९ | श्री पी.के.कोते | कामगार विभाग | वरिष्ठ लिपीक |
| १० | श्री के.पी.सदाफळ | साईबाबा भक्तनिवासस्थान | लिपिक-टंकलेखक |
| ११ | श्री टी.आर पवार | ध्वनिक्षेपण विभाग | मदतनीस |

श्रीक्षेत्र गजानन महाराज देवस्थान, शेगांव येथे दर्शन घेऊन दिनांक ०१.०२.२०१३ ते दिनांक ०२.०२.२०१३ या कालावधीत देवस्थानाच्या कामकाजाच्या पध्दतीची माहिती घेतली. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**सेवेकरी/ सेवाधारी**

श्री गजानन महाराज देवस्थान शेगांव या ठिकाणी संस्थानचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी पगारी अधिकारी, कर्मचारी नियुक्त केलेले नाहीत. त्याऐवजी श्रध्दा, भक्ती व सेवेच्या माध्यमातून सेवेकरी / सेवाधारी यांचेव्दारे संस्थानचे दैनंदिन कामकाज पाहिले जाते. महाराज असल्यापासून ही सेवेकरी /सेवाधारी परंपरा अखंडपणे चालू आहे. ही परंपरा हेच या संस्थानचे मुख्य वैशिष्ठ्य आहे. हे सेवेकरी भक्तांना दैवत मानतात व त्यांना विनम्र सेवा देतात.

सेवेकरी - निवड पध्दती

बुलडाणा व अकोला जिल्ह्यातील व शेगांव जवळच्या १०० किलो मीटरच्या आतील तीनशे खेड्यातील शेतक-यांच्या मुलांची याकामी निवड केली जाते. निवड करतांना एका खेड्यातून साधारणपणे २५ व्यक्तींना घेतले जाते. त्यांचा रहिवासी दाखला व वर्तणुकीबाबत पोलीस पाटील याचा दाखला घेण्यात येतो.

| अ.नं. | सेवा | तपशिल |
|---|---|---|
| १ | सेवेकरी संख्या | ७५०० |
| २ | सेवेचा कालावधी | महिन्यातून फक्त ५ दिवस |
| ३ | जादा गर्दी झाल्यास सेवेकरी कसे घेतात. | आवश्यकतेनुसार सेवेकरी दूरध्वनीव्दारे बोलाविले जातात. |
| ४ | सेवेकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा | सेवेला येताना सेवेकरी स्वखर्चाने येतात व आल्यानंतर त्यांना येणेचे एस.टी.भाडे दिले जाते. जातांना देवस्थानचे गाडीने सेवेक-यांना त्यांचे गांवी पोहोच केले जाते. दोन ड्रेस, दोन वेळेचा चहा, एक वेळेचा नाष्टा, राहण्याची हॉलमध्ये सुविधा. |
| ५ | मदत | वैद्यकीय मदत. |
| | | शैक्षणिक मदत. |
| | | वार्षिक अन्नधान्य रुपाने मदतः- दोन पोते गहू, २५ किलो तांदूळ, २५ किलो तुरडाळ, २५ किलो हरबरा डाळ हे साहित्य प्रसादरुपाने संस्थेच्या गाडीने प्रत्येक सेवेक-याच्या घरपोहोच केले जाते. |
| ६ | कामाचा कालावधी वेळ | ८ ते १० तास सेवा. |
| ७ | सुट्टया | आवश्यकतेनुसार सुट्टया दिल्या जातात. |
| ८ | वैद्यकीय तपासणी | ६ महिन्यातून एकदा वैद्यकीय तपासणी केली जाते. |
| ९ | वयोमर्यादा | २५ ते ५० वर्षे |
| १० | शिक्षण | कुठलीही अट नाही. |
| ११ | व्यसन | विडी, तबांखू, पान, सुपारी, गुटखा, दारु आदी कोणतेही व्यसन नको. |

**सेवाधारी -निवड पध्दती**

| अ.न. | सेवा | तपशिल |
|---|---|---|
| १ | सेवेकरी संख्या | ३००० |
| २ | सेवेचा कालावधी | पूर्ण महिन्याचा |
| ३ | सेवेकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा | सेवेला येताना सेवाधारी स्वखर्चाने येतात व आल्यानंतर त्यांना येणेचे एस.टी.भाडे दिले जाते. जातांना देवस्थानचे गाडीने सेवेक-यांना त्यांचे गांवी पोहोच केले जाते. दोन ड्रेस, दोन वेळेचा चहा, एक वेळेचा नाष्टा, देवस्थानचे रुममध्ये राहण्याची सुविधा |
| ४ | मदत | वैद्यकीय मदत. |
| | | शैक्षणिक मदत. |

| | | |
|---|---|---|
| ५ | कामाचा कालावधी | ८ ते १० तास व कामाचे स्वरुप बघून |
| ६ | सुट्टया | आवश्यकतेनुसार सुट्टया दिल्या जातात. |
| ७ | वैद्यकीय तपासणी | ६ महिन्यातून एकदा वैद्यकीय तपासणी केली जाते. |
| ८ | मानधन | सेवाधारी यांचा सेवेचा कालावधी व कामाचे स्वरुप बघून रुपये ३०००/-, ४०००/-, ५०००/-, ६०००/-, ७०००/- प्रती महिना मानधनरुपी प्रसाद दिला जातो. |

सदरचा उपक्रम हा अतिशय चांगला वाटला. सेवेकरी/सेवाधारी हाच या संस्थानचा मुख्य पाया आहे. अशा प्रकारचा उपक्रम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) येथे राबविणेसाठी मा.त्रिसदस्यीय समितीचे बैठकीत सांगोपाग चर्चा होऊन या बाबत स्वंतत्र नियमावली तयार करुन पुढील कार्यवाही करता येईल.

या संदर्भातील वरील अहवाल मा.अध्यक्ष महोदय यांचे सुचनेनुसार तातडीने फॅक्सव्दारे त्यांचे अवलोकनार्थ सादर केला असता त्यांनी या बाबत ८ दिवसाचे आत स्किम तयार करुन व्यवस्थापन समितीसमोर सादर करावी असे निर्देश दिलेले आहेत.

रविवार दिनांक ०३.०३.२०१३ रोजी मा.अध्यक्ष सो. यांनी सदर विषय त्रिसदस्यीय समितीचे विचारार्थ ठेवणेबाबत कळविलेले असून आजतागायत जनसंपर्क विभागात एकुण प्राप्त १०३ अर्ज/पत्रा मधून योग्य त्या सेवेकऱ्यांची निवड करता येईल. तसेच निवड झालेल्या सेवेकऱ्यांची राहणेची व्यवस्था आईआश्रम ०२ मधील डॉरमेंटरी हॉलमध्ये सदरचा प्रकल्प कार्यान्वीत झालेनंतर करता येईल.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) येथे सदरचा उपक्रम सुरु करतांना खालील अटी व शर्ती असाव्यात असे वाटते.

०१. सेवेक-याने मा.तहसीलदार यांचेकडून रहिवासी दाखला आणणे आवश्यक आहे.
०२. गावचे सरपंच/पोलीस पाटील यांचा वर्तणुकीबाबत दाखला आणणे आवश्यक आहे.
०३. सेवेक-यांला त्यांचे शैक्षणिक पात्रतेनुसार संस्थानच्या विविध विभागात प्रायोगीक तत्वावर काम दिले जाईल.
०४. सेवेक-यांची राहाण्याची, भोजन प्रसादाची, चहा इ.व्यवस्था संस्थानचेवतीने करण्यात येईल.
०५. सेवेक-याचा एक गणवेष निश्चित करुन संस्थानचे वतीने दोन गणवेष देण्यात येतील.
०६. सेवेकरी-यांची आरोग्य तपासणी संस्थानच्या रुग्णालयात करुन मगच त्यांचा प्रवेश निश्चित करावा.
०७. सेवेक-यांचा ड्युटीचा कालावधी ८ तासांचा असेल.
०८. सेवेक-यांना कोणत्याही प्रकारचे मानधन दिले जाणार नाही.
०९. सेवेक-यांना त्यांचे मागणीनुसार सुट्टया देण्यात येतील.
१०. सेवेक-यांना संस्थानतर्फे ओळखपत्र देण्यात येईल.
११. सेवेक-यास कोणत्याही प्रकारचे व्यसन नसावे.
१२. सेवेकरी यांचेकडून काही गैरवर्तन झाल्यास त्यास सेवेतून कमी करण्यात येईल.
१३.प्रायोगिक तत्वावर प्रथमतः सदर उपक्रम सुरु करुन उत्तम प्रतिसाद मिळाल्यावर अधिक सुविधा देण्याचा पयत्न करता येईल.

उपरोक्त नमुद केलेल्या अटी शर्तीस अनुसरुन सदरच्या विषयावर मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत चर्चा करुन निर्णय घेणेस व पुढील कार्यवाही कोणत्या विभागामार्फत करावी याबाबत निर्णय होणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.३१६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- जनंसपर्क विभागप्रमुख)

---

**विषय नं.५६ घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी शहरातील साफसफाईकरिता येणारा मासिक खर्च (अनुदान) मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांनी त्यांचे पत्रात "श्री साईबाबांच्या पद्स्पर्शाने पावन झालेले शिर्डी शहर जगप्रसिध्द झाले आहे. त्यामुळे शिर्डीला दररोज सुमारे १ लक्ष भाविक साईदर्शनासाठी भेट देत आहेत. तसेच महत्वाच्या वार्षिक सण व उत्सवाच्या कालावधीत भाविकांची संख्या सुमारे २ ते ३ लक्ष एवढी प्रचंड वाढत असते.

शिर्डी नगर पंचायत ही 'क' वर्ग नगरपंचायत असून शहरांची लोकसंख्या सुमारे ३६,००० एवढी आहे. नगरपंचायतीचे स्वत:चे उत्पन्न रहीवाशी नागरीकांकडमन वसूल घेणाऱ्या घरपट्टी पाणीपट्टी व दुकानभाडे व विविघ फी व्दारे जमा होत असून सदर उत्पन्न वार्षिक सरासरी २.५ कोटी एवढेच आहे.

साईदर्शनासाठी शहरात येणारे भाविक दर्शन झालेनंतर शिर्डी शहरात सार्वजनिक ठिकाणी व मंदिराचे सभोवतीच्या परिसरांमधे फिरत असतात त्यामुळे शिर्डीतील नागरिकांसाठी उभारणी केलेल्या पायाभूत सुविधावर अतिरिक्त ताण निर्माण होतो व नागरिकांच्या नाराजीस तोंड द्यावे लागत आहे. त्यासाठी

शिर्डी नगरपंचायत हद्दीत घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी विल्हेवाट पार पाडणे ही शिर्डी नगर पंचायत व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या दोन्हीच्या दृष्टीने अत्यंत निकडीचे आहे.

या कार्यालयाने आपले कार्यालयाशी चर्चा करुन साफसफाई करिता वार्षीक निविदा मागविल्या होत्या. त्यानुसार बी.व्ही. जी. इ. लि. या कंपनीची दि.४/१०/२०११ रोजी प्रतीमाह रु. १६,७७,११८/- इतक्या रकमेची निवीदा प्राप्त झाली सदर खर्च नगरपंचायतीस करणे शक्य नाही. नगरपंचायतीचे उत्पन्नामधुन आपल्या रहीवाशी नागरिकांना नगरपरिषद कायदा १९६५ कलम ४९ मध्ये नमूद सुमारे ६२ प्रकारची कामे पार पाडणेसाठी तुटपंजे उत्पन्न व शासनाच्या विविध योजनामधून अनुदान मिळवून प्रयत्न करित आहे.

तरी शिर्डी शहरात साफसफाई करिता आज रोजी दरमहा रु. २५ लक्ष इतकी रक्कम (अनुदान) शिर्डी नगर पंचायतीस मिळावी ही विनंती." अशा प्रकारची मागणी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने संस्थानमार्फत दिनांक १ एप्रिल २००६ पासून शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर- मनमाड रोड हा राज्य महामार्ग व मनोजकुमार पथ या ठिकाणांची साफसफाई करणेसाठी दररोज दोन शिफ्टमध्ये ४० कर्मचारी देण्यात येत आहेत. त्यांचा वेतनावरील मासिक खर्च अंदाजे रुपये ३,३१,१०५/- आहे. त्यासाठी वार्षिक खर्च रु. ३९,७३,२६०/- (अक्षरी रुपये एकोणचाळीस लाख त्र्याहत्तर हजार दोनशे साठ) मात्र संस्थानकडून आदा केले जातात.

संदर्भित पत्रात नमुद केलेप्रमाणे शिर्डी नगरपंचायत यांनी यापुर्वीही शिर्डी शहर संपुर्ण साफसफाई बाबत मागणी केलेली आहे त्यावर खालील प्रमाणे व्यवस्थापन समितीचे निर्णय झालेले आहेत

**अ)** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०८.२०११ आयत्या वेळेचा विषय नं. १२ निर्णय क्र. ६७ (०८) झालेला निर्णय- या सभेत शिर्डी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. अलका बाळू शेजवळ, उप नगराध्यक्ष श्री. विजय तुळशीराम कोते तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी श्री.बरिंद्र गावित यांनी सभेपुढे समक्ष सांगितले की, संस्थान मार्फत शिर्डी नगरपंचायतीस विशेष स्वच्छता कर/आरोग्य कर (नाके) अनुदान देण्यात येते. त्याऐवजी सदरचे अनुदान नगरपंचायतीस न देता शिर्डी शहरातील स्वच्छता संस्थान मार्फत करण्यात यावी, अशी त्यांनी मागणी केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील मुख्य गावठाणातील संपूर्ण स्वच्छता करणे, कचरा उचलणे, डेपोपर्यंत वाहतूक करणे या पध्दतीने स्वच्छतेबाबतची अनुषंगिक सर्व कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी ठेकेदार नेमणेत यावा त्यासाठी निविदा तयार करणे, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्याचे काम शिर्डी नगरपंचायतीने करावे. त्यानुसार प्राप्त होणाऱ्या निविदा संस्थान व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडून, निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा. निवड करण्यात आलेल्या ठेकेदारास कार्यादेश शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी द्यावा. या कामावर शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी पुर्णपणे पर्यवेक्षण व नियंत्रण करावे. मात्र शिर्डी मुख्य गावठाणाव्यतिरिक्त वाड्या व वस्त्यांवरील स्वच्छतेची कामे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी करावीत. सदरची कार्यवाही सुरु होईल त्या तारखेपासून संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस दिला जाणारा विशेष स्वच्छता कर / आरोग्य कर (नाके) हे अनुदान बंद करण्यात यावे असे ठरले.

असे ठरले असताना शिर्डी नगर पंचायत यांनी दि. १४/०११/२०११ रोजीचे पत्राने शिर्डी नगर पंचायत शिर्डी यांनी बी.व्ही. जी. इ. लि. या कंपनीची दि.४/१०/२०११ रोजी प्रतीमाह रु. १६,७७,११८/- इतक्या रकमेची निवीदा मंजुर केली व वर्क ऑर्डर देणेकामी संस्थानकडे अनुदान मंजुरीबाबत मागणी केली.

त्यास अनुसरुन इकडील दि.१७/१/२०१२ रोजीचे टिपणीने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे पुढे ठेवणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी ठेवणेत आला होता. त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी मुख्याधिकारीसाहेब, शिर्डी नगरपंचायत यांना शिर्डी शहर संपुर्ण साफसफाई साठी फेरकोटेशन मागविणे बाबत समक्ष सांगितले आहे. सदरचे विषयाबाबत शिर्डी नगरपंचातीकडून आपलेकडे आजपर्यंत कोणताही पत्रव्यवहार झालेला नाही.

**ब)** शिर्डी ग्रामस्थांनी दि.१९/०७/२०१२ रोजीचे पत्रान्वये "शिर्डी शहरातील सार्वजनिक स्वच्छतेसाठी श्री साईबाबा संस्थान यांचेकडुन कर्मचारी मिळणे बाबत - शिर्डी शहरामधील विविध रस्ते, मोकळ्या जागा व मंदिरासभोवतीच्या परीसराची साफसफाई करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीला दररोज किमान १५० सफाई कामगारांची गरज आहे. आज रोजी शिर्डी नगरपंचायतीमार्फत नियुक्त केलेल्या ठेकेदाराकडुन दररोज फक्त ७० सफाई कर्मचारी नेमण्यात येत आहे. त्यासाठी दरमहा रुपये ८.१५ लक्ष इतका खर्च येत आहे. नगरपंचायतीस इतका खर्च परवडत नाही. तसेच दैनंदिन सफाईचे काम सुध्दा समाधानकारकपणे पार पडत नाही. तरी श्री साईबाबा संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीला सफाई कामांसाठी दररोज १५० सफाई कर्मचारी दोन शिफ्टमध्ये मिळणेस विनंती आहे." अशा प्रकारची मागणी मा.उपनगराध्यक्ष, शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक व शिर्डी ग्रामस्थ यांनी केली होती.

त्यासअनुसरुन मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०८.२०१२ विषय नं.१२ निर्णय क्र. ६९७

सदरहु विषय स्थगित ठेवणेत यावा असा पारित झाला आहे

शिर्डी नगरपंचायत शिर्डीचे संदर्भिय दि. ०६/०२/२०१३ चे पत्रास अनुसरुन त्यांना दरमहा रु. २५ लाख द्यावयाचे असल्यास एक वर्षाचे कालावधी करीता अंदाजे रु. ३,००,००,०००/- (रु. तिन कोटी ) मात्र पर्यंत खर्च येईल.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३१७ सदरहू विषयावर सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीच्या मा.नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांना पुढील सभेपुढे समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- आरोग्य विभागप्रमुख)

---

**विषय नं.५७ शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना साफसफाईचे कामांसाठी ४० कंत्राटी सफाई कामगार देणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर- मनमाड रोड हा राज्य महामार्ग व साईबाबा मंदिरा बाहेरील परिसरातील रस्ते साफसफाई करणेसाठी शिर्डी नगर पंचायतीचे आरोग्य विभागाकडील कर्मचारी कमी पडतात.त्यामुळे नगर मनमाड रोड,(लक्ष्मीनगर ते ५०० रुम) मनोज कुमार पथ, या रस्त्यांची साफ सफाई करणे करीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी नगरपंचायतला दिलेले ४० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांची मुदत दि.३१ मार्च २०१३ अखेर संपुष्टात येत आहे.

दि.१ एप्रिल २०१३ ते दि.३१ मार्च २०१४ पुढील वर्षाच्या कालावधी साठी मुदत वाढ मिळणे कामी तसेच २० कर्मचारी वाढीव मिळणे कामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी दि. १३/०३/२०१३ चे पत्राव्दारे विनंती केलेली आहे.

यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि.०६/०४/२०१२ रोजीचे सभेपुढील विषय नं. ८८ निर्णय क्र. ३४९ ने ०१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी सफाईकरिता ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी देण्याचे मंजुर करण्यात आले आहेत.

नगरपंचायतीचे दि. १३/०३/२०१३ चे विनंती पत्रानुसार उपरोक्त कामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना पुढील एक वर्षासाठी ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमल्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

४० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चः-

| अ.क्र. | तपशील | होणारा खर्च |
|---|---|---|
| १ | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | २१५=९६ |
| २ | प्रॉ.फंड १३.६१% | २९=३९ |
| ३ | सर्व्हिस चार्ज ०.७५% | ०=२१ |
| | एकूण- | २४५=५६ |
| ४ | सर्व्हिस टॅक्स १०.३०% | ३०=३५ |
| ५ | प्रति दिन प्रति कर्मचारी रु. | २७५=९१ |
| ६ | प्रति दिन ४० कर्मचारी रु. | ११०३६=४० |
| ७ | प्रति दिन ४० कर्मचारी ३६५ दिवसांकरीता | ४०२८२८६=०० |
| ८ | +१०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ | ४०२८२८=६० |
| | एकुण रुपये - | ४४३१११४=६० |

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी पुरवावयाचे असल्यास या कर्मचा-यांचे वेतना पोटी एक वर्षाचे कालावधी करीता अंदाजे रुपये ४४,३१,११५/- (अक्षरी रुपये चव्वेचाळीस लाख एकतीस हजार एकशे पंधरा ) मात्र पर्यंत खर्च येईल.

या करीता सन २०१३-२०१४ चे आरोग्य विभागाचे अंदाजपत्रकात बजेट तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- आरोग्य विभागप्रमुख)

---

**विषय नं.५८ कापड खरेदी तथा पडदे शिवून घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत संस्थानचे दोन्हीही साईनिवास अतिथीगृहांमध्ये रुम मधील खिडक्यांना व काही दारांना पडदे बसविण्यात आलेले आहेत. तेथे निवासा करिता अथवा काही वेळ थांबण्या करिता मा. अध्यक्ष महोदय, विश्वस्त, पाहुणे तसेच मा. मंत्री महोदय व इतर मान्यवर वेळोवेळी येत असतात.

त्या अनुषंगाने संस्थानचे दोन्हीही अतिथीगृहांमध्ये तसेच साईनिवास अतिथीगृहातील सर्व खोल्यांमधील पडदे जुने झाल्यामुळे (सन- २००५ पासून सतत वापरात असल्यामुळे) खराब झालेले आहेत. वारंवार धुतल्यामुळे सदर पडदे जीर्ण झालेले असून त्यांचा रंग ही गेलेला आहे.

त्यामुळे दोन्ही अतिथीगृहांसाठी खालील प्रमाणे पडदयांची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशील | एका नगासाठी लागणारे कापड | एकूण नग | एकूण कापड |
|---|---|---|---|---|
| ०१ | अतिथीगृह (A/C रुम) मधील खिडकी पडदे | १.५० मीटर | ८२ | १२३ मीटर |
| ०२ | अतिथीगृह (A/C रुम) मधील रुम नं. ० खिडकी पडदे | २.५० मीटर | ०२ | ०५ मीटर |
| ०३ | साईनिवास बैठक कक्ष येथील मिटींग हॉल दरवाजा पडदे | २.२५ मीटर | ०५ | ११.२५ मीटर |
| ०४ | साईनिवास बैठक कक्ष येथील मिटींग हॉल खिडकी पडदे | १.५० मीटर | ०६ | ०९ मीटर |
| | | एकूण कापड | ------ | १४८.२५ मी. |

उपरोक्त प्रमाणे दोन्ही अतिथीगृहांचे दरवाजे व खिडक्यांसाठी एकूण १४८.२५ मीटर्स कापड एका सेट करिता आवश्यक आहे. त्यानुसार दोन सेट करिता एकूण २९७ मीटर्स कापडाची आवश्यकता भासणार आहे.

उपरोक्त कापड खरेदी करते वेळी दोन वेगवेगळया रंगाचे कापड खरेदी करुन दोन सेट शिवून तयार करुन घ्यावे लागतील. एक मीटर कापडासाठी अंदाजे ५०० रुपये खर्च (शिलाईसह) अपेक्षित असल्याने याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये १,५०, ०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळून खरेदी विभागामार्फत विहीत पद्धतीने कापड खरेदी करुन तथा शिवून मिळणेकामीचे सदर प्रस्तावावर मा.त्रिसदसीय समिती सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.३१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील साईनिवास अतिथीगृहांच्या रुम मधील खिडक्या व दारांना पडदे बसविणेकामी विहीत पध्दतीने कापड खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.५९ संगणक खोली पावत्या छपाई बाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांना देण्यात येणा-या खोल्यांचा सेवाकार संगणीकृत पावत्या देवून वसुल करण्यात येतो विभागवार वार्षिक छपाई खरेदी विभागामार्फत करण्यात येते.सन २०१२-२०१३ या साला करीता करण्यात आलेल्या संगणकीय खोली वाटप पावत्याचा साठा सुमारे २० दिवस पुरेल एवढाच शिल्लक असल्याने वार्षिक छपाई प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता तथापी सदर प्रक्रिया पुर्ण होऊन माल हाती येण्यास किमान ६ ते ७ महिने लागणार असल्याने पुढील चार ते पाच महिने गर्दीचे असल्याने खास बाब म्हणुन तातडीचे कारणाने सुमारे २,५०,००० पावत्या (अक्षरी दोन लाख पन्नास हजार पावत्या) छापुन घेणे गरजेचे असल्याने सन २०१२/२०१३ या सालाकारीता साईआश्रमसाठी आवश्यक असणारी खोली वाटप पावती छपाई मे.साई राकेश पेपर टेक,नासिक यांचे कडुन ४१२/- प्रति हजार या दराने करुन घेतले आहेत त्यांना आदेश क्र.एसएसएस/वशी-खरेदी/१९८८/२०१२ दि.३१/०७/२०१२ अन्वये पारीत करण्यात आलेला आहे. सदरकामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०७/२०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विषय नं.१४ निर्णय क्र.४६० अन्वये मान्यता देण्यात देण्यात आली होती या बाबत दि.२२/०२/२०१३ रोजी संबंधित ठेकेदार यांना कार्यालयाचे भ्रमणध्वनी संचावरुन संपर्क साधला असता आपणास आवश्यक उपरोक्तप्रमाणे संगणक छापील स्टेशनरी मागील दरात छपाई करुन देण्यास तयार आहेत तसे त्यांनी दि.०६/०३/२०१३ रोजी पाठविलेल्या ई-मेल मध्ये मागील दि.३१/७/२०१२ चे मंजुर दराने आपणास आवश्यक असणारी संगणक स्टेशनरीची छपाई तातडीने करुन देण्याचे मान्य केले आहे.आवश्यक संगणक छापील स्टेशनरीचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं | तपशिल | आवश्यक नग | अंदाजे दर रु. (प्रति हजार) | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | संगणक खोलीवाटप पावत्या | २,५०,००० | ४१२/- (०५ % व्हॅटसह ) | १,०३,०००/- |

उपरोक्तकामी अक्षरी रुपये एक लाख तीन हजार मात्र इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाची तरतुद सन २०१३/२०१४ चे मंजुर अर्थसंकल्पीय रकमेतुन करता येईल तरी आपणास आवश्यक असणारी छापील संगणक स्टेशनरी तातडीने साईप्रकाश पेपट टेक,नाशिक यांचेकडुन दि.३१/०७/२०१२ चे मंजुर दराने संस्थानचे खरेदी विभागाकडुन खरेदी करण्यास मान्यतेकामी त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.६०** **सन २०१३-१४ करीता स्टीम बॉयलरचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीतील कॅलेंडर मशिनला व ड्रायर मशिनला लागणरी स्टिम तयार करणेकरीता २०० किलो क्षमतेचा (RXA-२) स्टीम बॉयलर कार्यान्वित केलेला आहे.सदरचा बॉयलर थर्मेक्स कंपनी, पुणे यांचेकडुन खरेदी करण्यात आलेला आहे. थर्मेक्स कंपनीची अधिकृत सर्व्हिस ब्रँच - मे. मॅक्झीथ्रेम वर्क्स, औरंगाबाद यांना मागील ०९ वर्षापासुन (दि.१४/१०/२००३ ते दि.३१/०३/२०१३ अखेर) स्टीम बॉयलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे.

मे.मॅक्झीथ्रेम वर्क्स, औरंगाबाद यांचे सन २०१२ / २०१३ या वर्षाचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे ३१ मार्च २०१३ अखेर संपुष्टात येणार आहे. त्यांनी आतापर्यत प्रति दोन महिन्यास एक याप्रमाणे सर्व्हिसींग करुन दिलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| सर्व्हिसींग | तारीख | बील अदा रक्कम रुपये सर्व्हिस टॅक्स (१२.३६%) |
|---|---|---|
| पहिली | १५/०६/२०१२ | ३७५० + सर्व्हिस टॅक्स ४६३.५० = ४२१४ |
| दुसरी | ११/०८/२०१२ | ३७५० + सर्व्हिस टॅक्स ४६३.५० = ४२१४ |
| तिसरी | ११/११/२०१२ | ३७५० + सर्व्हिस टॅक्स ४६३.५० = ४२१४ |
| चौथी | २२/०१/२०१३ | ३७५० + सर्व्हिस टॅक्स ४६३.५० = ४२१४ |
| पाचवी | होणे बाकी आहे. | ----- |
| सहावी | होणे बाकी आहे. | ----- |

सन २०१२/२०१३ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट रुपये २२,५०० + १२.३६% लागु असलेला सर्व्हिस टॅक्स एवढी रक्कम निश्चित करण्यात आलेली होती.सन २०१३ / २०१४ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मे.मॅक्झीथ्रेम वर्क्स,औरंगाबाद यांचेकडुन दि.३०/०१/२०१३ रोजीचे पत्राद्वारे दरपत्रक मागविण्यात आलेले होते.

सन २०१३/२०१४ करीता साईबाबा भक्तनिवासस्थानकडील स्टीम बॉयलरकरीता त्यांचे ई-मेलद्वारे आलेले दरपत्रक इकडील कार्यालयास दि.२७/०२/२०१३ रोजी प्राप्त झाले आहे.त्यामध्ये त्यांनी एका स्टिम बॉयलरसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट रु.२५,५०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स याप्रमाणे दर कळविले आहे.याप्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्री स्टीम बॉयलरकरीता रु.२५,५०० + लागु असलेला सर्व्हिस टॅक्स असा एकुण सन २०१३/२०१४ करीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट खर्च आहे.

एका आर्थिक वर्षामध्ये (०१/०४/२०१२ ते दि.३१/०३/२०१३ अखेर) एकुण सहा सर्व्हिसिंग करणे अपेक्षित आहे परंतु सन २०१२/२०१३ मध्ये दि.०७/०३/२०१३ अखेर फक्त चारच सर्व्हिसिंग झाल्या आहेत व तेवढयाच सर्व्हिसिंगचे बिल मे.मॅक्झीथ्रेम वर्क्स, औरंगाबाद यांना आदा करण्यात आलेले आहे.(मंजुर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची रक्कम सहा समान हप्त्यात प्रत्येक सर्व्हिसिंग नंतर आदा करण्यात येत असते.) त्याप्रमाणे यावेळीही प्रती सर्व्हिसींग नंतर सहा सर्व्हिसींग पर्यंत प्रत्येक वेळी रु. ४२५०/- + नियमानुसार लागु असलेला सर्व्हिस टॅक्स प्रमाणे त्यांना आदा करता येईल.

तरी सन २०१३/२०१४ या वर्षाकरीता (दि.०१/०४/२०१३ ते दि.३१/०३/२०१४ अखेर) उपरोक्तचे खर्चास मान्यता मिळणेस व स्टिम बॉयलरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट थर्मेक्स कंपनीची अधिकृत सर्व्हिस ब्रँच मे.मॅक्झीथ्रेम वर्क्स,औरंगाबाद यांना देणेकामी त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.६१** **सन २०१२-१३ ऐवजी सन २०१३-१४ या वर्षाकरीता साईआश्रम भाग ०१-०२ विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत प्लंबींग इ. मेन्टनेन्स् /स्वच्छता कामाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती दि.१९/०२/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.२४४ नुसार, सन २०१२ - १३ या वर्षाकरीता साईआश्रम- १ व साईआश्रम- २ विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स् कामाबाबत दैनिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन को-या निविदा विक्री करुन निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आल्याने, दि. ०९/०३/२०१२ रोजी महाराष्ट्र टाईम्स या दैनिक वृत्तपत्रात "हाऊसकिपींग सेवेकरीता निविदा सूचना" अशी जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

तदनंतर टेंडरबाबतची संपुर्ण प्रक्रिया ( प्री.बीड मिटींग, सादरीकरण, कॅग रिपोर्टनुसार दिलेले गुण व समक्ष चर्चा वाटाघाटी ) पुर्ण झाल्यावर, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.८०० (०३) नुसार, सन २०१२-१३ करीता साईआश्रम -१ व साईआश्रम -२ विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स् / स्वच्छता कामाबाबतचे Successful Bidder ( SB-१) मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे. यांना कार्यादेश देण्यात यावा, असा निर्णय झालेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१२ रोजीचे सभेत झालेला निर्णय क्रं.८८४ नुसार, निर्णय क्रं. ८०० (०३) मध्ये, साईआश्रम - १ व २ विभागासाठी प्रशासकीय इमारती, रुम बुकींग कांऊटर व पार्कीग परिसरासाठी आवश्यक लागणारे दररोजचे मनुष्यबळ व मशिनरी संख्या तसेच इमारतीनुसार मनुष्यबळ व मशिनरी संख्या पुरविणेबाबत अट घालण्यात यावी, त्यानुसार दरमहा देय रक्कमेची विभागणी करुन आकारण्यात यावी, असे चर्चेअंती ठरले.

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हील ॲप्लीकेशन १२६९४ /२०१२ व १२६९५ /२०१२ पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दि.२१/११/२०१२ रोजी केलेल्या हुकूमानुसार साईआश्रम भाग - १व २ कडील सर्व कामे टेक्नीकल एक्सपर्ट यांचेकडून पडताळणी करुन घ्यावयाची असल्यामुळे टेक्नीकल एक्सपर्ट यांची नेमणुक झाल्यानंतर सदरचा प्रस्ताव त्यांचेकडुन पडताळणी करुन घेण्यात यावे असे ठरले.

प्रस्तुत प्रकरण मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात न्यायप्रविष्ठ होते. आता मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२०/०२ /२०१३ रोजी केलेल्या ऑर्डरनुसार परवानगी मिळालेली आहे. सदरचे ऑर्डरमध्ये पा.नं ०८ वर अ.नं. ११ मध्ये Both the civil applications are allowed. The permission as sought, is granted. व अ.नं. १२ मध्ये To make it further clear, we hereby permit the Trust to spend amount as per Exhibit - C to Civil Application No. १२६९५ of २०१२. असे नमुद केले आहे.

साईआश्रम - १ व साईआश्रम - २ विभागातील यांत्रिकीकरणासह, हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनेन्स् / स्वच्छता कामाबाबत. मे.बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे. यांना कार्यादेश देणेबाबतचा कालावधी / वर्ष सन २०१२ - १३ हे संपुष्टात येत असुन, आता नव्याने सन २०१३ - १४ करीता (दि.०१/४/२०१३ ते दि.३१/०३/२०१४) या १ वर्षाचे कालावधीसाठी साईआश्रम भाग - १ साठी वर्कऑर्डर जा.न. एसएसएस / वशी - साईआश्रम - १ /५६९१/२०१३ दि.१४/०३/२०१३ अन्वये देण्यात आली आहे.

याकामी मा. व्यवस्थापन समितीचे कार्योत्तर मंजुरीसाठी निर्णयास्तव सादर,

**निर्णय क्र.३२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, साईआश्रम भाग ०१ व ०२)

---

**विषय नं.६२ प्रसाद लाडू वाहतुकीकरीता प्लॅस्टिक क्रेट खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांना प्रसादरुपाने मोतिचूर लाडू सहज उपलब्ध व्हावेत याकरीता कॅन्टीन_विभागाचे देखरेखी खाली साईप्रसाद नं.२ इमारतीच्या उत्तर बाजूस ८ प्रसाद लाडू विक्री काउंटर,व्दारावती भक्तनिवास १ विक्री काउंटर तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) १ विक्री काउंटर याप्रमाणे प्रसाद लाडू वितरण व्यवस्था केलेली आहे.

कॅन्टीन विभागाचे डेडस्टॉकला २३२ प्लॅस्टिक क्रेटची नोंद आहे.परंतु त्यापैकी ४० क्रेट अवजड असल्याने वाहतुकीस उपयुक्त नाहीत.सध्या वापरात असलेले १९२ क्रेट श्रींचे रामनवमी उत्सव,गुरुपौर्णिमा उत्सव व पुण्यतिथी उत्सव तसेच गर्दीचे काळात कमी पडतात.

यापुर्वी कॅन्टीन विभागाकडे लाडू वाहतुकी करीता निलकमल या कंपनीचे प्लॅस्टिक क्रेट दैनंदिन वापरात असून ते टिकाऊ स्वरुपाचे आहेत.

नविन १०० क्रेट ख्ररेदी करतांना निलकमल प्लॅस्टिक या नामांकित कंपनीचे J.B.C. ५४'X३६'X४००' या साईजचे क्रेट खरेदी करण्यासाठी अंदाजे प्रति नग रु.११२५/- या प्रमाणे १००X११२५.०० = १,१२,५००.०० (अक्षरी रुपये एक लाख बारा हजार पाचशे मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी कॅन्टीन विभागाकरिता संस्थानचे नावासह निलकमल प्लॅस्टिक क्रेट खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करणेचे सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागामध्ये लाडू प्रसाद वाहतुकीकरीता आवश्यक असलेले निलकमल कंपनीचे प्लॅस्टिक क्रेट (संस्थानचे नावासह) विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,१२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.६३ शिर्डी नगरपंचायत सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पातील शुध्द पाणी संस्थानने घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संस्थानला दि.२४/१२/२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे की, शिर्डी नगरपंचायत शिर्डी UIDSSMT योजने अंतर्गत सुमारे ४० ते ५० दक्षलक्ष लिटर सांडपाणी शुध्द केले जाते. सदरचे पाणी शेतीसाठी/ बगीचासाठी संस्थानने वापरावे. त्या बदल्यात संस्थानने नगरपंचायतीस ठरावीक रक्कम दिल्यास सदरचा प्रकल्प चालविणे नगरपंचायतीस शक्य होईल. सांडपाणी शुध्द प्रक्रिया केंद्रामुळे आपल्या संस्थेच्या मालकीच्या इमारती मधून निधणाऱ्या संपूर्ण सांडपाण्याची विल्हेवाट व

शुध्दीकरण करणेस येत असून त्यासाठी नगरपंचायतीस लाखो रुपये खर्च करावे लागत आहे. सदरचा खर्च करणेची नंगरपंचायतीची अर्थिक कुवत नाही. तरी सदरचा प्रस्तावाचा विशेष बाब म्हणुन विचार व्हावा अशी नगरपंचायत शिर्डी यांनी विनंती केलेली आहे.

संस्थानने मंदिर परिसर, व्दारावती इमारत परिसर व नविन भक्त निवास परिसर, साई आश्रम १ व २ या ठिकाणी बाग तयार करण्यात आलेली आहे. सदरची बाग एका ठिकाणी नसून वेगवगेळया ठिकाणी आहे, त्यांचे क्षेत्र विभागालेले आहे. मंदिर परिसर ते नविन भक्त निवास परिसर ०१ कि.मी. व्दारावती ते मंदिर परिसर अंदाजे ५०० मी व्दारावती ते नविन भक्त निवास अंतर अंदाजे ५०० मी व्दारावती ते साई आश्रम अंदाजे ७०० मी असे आहे.

मंदिर परिसर, व्दारावती, न. भक्त निवास, साई आश्रम, साईनगर या ठिकाणी तयार करण्यात आलेल्या बागेसाठी सांडपाणी देणेसाठी नगरपालीका सांडपाणी प्रकल्पा पासून संस्थान परिसरातील बागेपर्यत पाईप लाईन टाकावी लागेल. वेगवेगळया ठिकाणी ही पाईप लाईन टाकावी लागेल. पाईप लाईन टाकण्यासाठी मोठया प्रमाणात खर्च येईल.

संस्थानकडे असलेले सांडपाणी प्रकल्पातील निघणारे शुध्द पाणी व्दारावती समोरील लॉनसाठी/ बागेसाठी वापरण्यात येत होते. या पाण्यापासून निघणाऱ्या वासामुळे या बागेत फिरणारे ग्रामस्थ/ साईभक्त या बाबत नाराजगी व्यक्त करतात. संस्थान परिसरात लावण्यात आालेली मोठी, सावलीची झाडे हे परिसरात वेगवेगळया ठिकाणी विशिष्ठ अंतर सोडून लावण्यात आलेली आहेत. ही झाडे मोठी झाल्याने त्यांना रोजचे रोज पाण्याची आवश्यकता भासत नाही.

संस्थान परिसरातील झाडांना पाणी देणेसाठी उपलब्ध असलेल्या विहीरीचे पाणी, बोअरवेलचे पाणी वापरण्यात येते. जेथे झाडांची संख्या कमी आहे. तेथे पाण्याचे इतर स्त्रोत नसल्याने या ठिकाणी टॅंकरच्या साहयाने झाडांना पाणी देण्यात येते. संस्थान परिसरातील झाडांना पाणी देणेसाठी दरमहा अंदाजे रु.६,००० ते रु.७,०००/- मात्र खर्च येतो. संस्थान परिसरातील झाडांना फक्त उन्हाळयातच टॅंकरने पाणी देण्यात येते.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२४ सदरहू विषयावर सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांना पुढील सभेपुढे समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.६४ श्री.दिपक एकनाथ कुलकर्णी, लिपीक टंकलेखक, लेखाशाखा विभाग यांचे सतत, सलग व दिर्घकाळ गैरहजेरीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.दिपक एकनाथ कुलकर्णी हे संस्थानचे लेखाशाखा विभाग येथे लिपीक टंकलेखक म्हणून सेवेत आहेत. श्री.कुलकर्णी यांनी दि.२५-१०-२०११ ते दि.०५-१२-२०११ अखेर =४२ दिवस, दि.१५-१२-२०११ ते दि.२०-१२-२०११ अखेर =०६ दिवस,दि.०२-०१-२०१२ ते दि.३१-०३-२०१२ अखेर =९० दिवस असे एकूण-१३८ दिवस विनावेतन रजा मुख्य लेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचेकडून वेळोवेळी मंजूर करून घेऊन, दीर्घकाळ सलग विनावेतन रजेवर राहिले. संस्थान सेवा नियमानुसार एका कॅलेंडर वर्षामध्ये कमाल ३० दिवसच जास्तीत जास्त विनावेतन रजा घेता येते असे असतांनाही, श्री.कुलकर्णी यांनी वरील कालावधीत वेळोवेळी एकूण-१३८ दिवस विनावेतन रजा उपभोगलेली आहे.त्यांचे सदरचे कृत्ये हे गैरशिस्त वर्तनात मोडते. त्यांचे दीर्घकाळ व सततचे विनावेतन रजेमुळे लेखाशाखा विभागातील दैनंदिन कामामध्ये गैरसोय होवून, अडचणी निर्माण झालेल्या आहेत. श्री.कुलकर्णी यांचे सलग व दीर्घकाळ विनावेतन रजेवर जाण्यामुळे लेखाशाखा विभागातील कामकाजावर विपरीत परिणाम झालेला आहे असे त्यांचे विरुध्द मुख्य लेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांचे दि.१७-०४-२०१२, दि.०३-०५-२०१२ व दि.१०-०७-२०१२ रोजीचे निवेदने आलेले आहेत.

असे असतांनाही श्री.कुलकर्णी यांनी पुन्हा दि.०३-०४-२०१२ व दि.२३-०४-२०१२ रोजीचे रजा अर्जावर "आय.एस.ऑडीट कोर्स" असे कारण नमुद केलेले असुन, दि.०१-०४-२०१२ ते दि.३१-१२-२०१२ अशी २७५ दिवस अर्जित रजा मंजूर करणेची मागणी केलेली आहे.तथापि, त्यांची अर्जित रजा शिल्लक नसल्यामुळे श्री.कुलकर्णी यांनी मागणी केलेली दि.०१-०४-२०१२ ते दि.३१-१२-२०१२ अखेर या कालावधीतील अर्जित रजा नामंजूर करणेत येत आहे.तरी त्यांना हे नोटीस पत्र मिळताच ०४ दिवसाचे आंत तात्काळ कामावर हजर/रुजू व्हावे. त्यांनी विहीत मुदतीत कामावर हजर/रुजू न झाल्यास त्यांना संस्थान सेवेची/नोकरीची आवश्यकता व गरज नाही तसेच त्यांना संस्थानचे सेवेमध्ये स्वारस्य नाही असे समजून त्यांना संस्थान सेवेतून कायमस्वरुपी "बडतर्फ"(डिसमीस) करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करुन पुढील कार्यवाही करणेत येईल.असे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४४०/२०१२ दि.०२-०५-२०१२,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१४८४/२०१२ दि.०६-०७-२०१२ व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ १९१४/ २०१२ दि.३०-०७-२०१२, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५१३९/२०१३ दि.११-०२-२०१३ रोजीचे कारणे दाखवा नोटीसा अन्वये लेखी कळविणेत आले होते.तथापी त्यांना सदर कारणे दाखवा नोटीसा

रजिष्टर ए.डी.द्वारा पाठविणेत येवून सुध्दा सदरच्या नोटीसा त्यांनी स्विकारलेल्या नाहीत. सदर कारणे दाखवा नोटीसावर "Not Claimed", "Left Adderss", "Left" व "Left Adderss" असे पोष्टाचे शेरे नोंदवून इकडील कार्यालयास परत आलेल्या आहेत.त्यांनी सदर कारणे दाखवा नोटीसा स्विकारण्यास नकार देवून,वरिष्ठांचे आदेशाचा अवमान केलेला आहे.त्याचप्रमाणे त्यांची रजा नामंजूर केलेनंतर देखील ते दि.०१-०४-२०१२ पासून कामावर हजर न होता कामावरुन विनापरवानगी परस्पर गैरहजर राहीले आहे.असे लेखाशाखा विभागाचे दि.१७-०४-२०१२,दि.०३-०५-२०१२, दि.१०-०७-२०१२,दि.०२-०२-२०१३ रोजीचे निवेदने आलेले आहेत.त्यांचे सदरचे कृत्य हे अतिशय गंभीर स्वरुपाचे असुन ते गैरशिस्त वर्तनात मोडते.

सबब, श्री.दिपक एकनाथ कुलकर्णी, लिपीक टंकलेखक, लेखाशाखा विभाग हे दि.०१-०४-२०१२ पासून सतत, सलग, दिर्घकाळ विनापरवानगी रजा अर्ज मंजूर करुन न घेता कामावरुन गैरहजर राहिलेले आहे.म्हणून त्यांना एक महिन्याचे नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे अदा करून, संस्थान सेवेतून कायम स्वरूपी सेवामुक्त (टर्मिनेट) करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.दिपक एकनाथ कुलकर्णी, लिपीक टंकलेखक, लेखाशाखा विभाग हे दि.०१.०४.२०१२ पासुन सलग, दिर्घकाळ विनापरवानगी कामावरुन गैरहजर असल्याने त्यांना एक महिन्याचे नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे अदा करून, संस्थान सेवेतून कायम स्वरूपी सेवामुक्त (टर्मिनेट) करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.६५** **श्री पुण्यतिथी उत्सव- २०१२ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री पुण्यतिथी उत्सव २०१२ मधील खर्चाकरीता मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१५/०९/२०१२ चे सभेतील निर्णय क्र. ७९६ अन्वये एकुण रुपये ७३,४०,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. प्रत्यक्षात खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ. नं. | तपशील | अंदाजपत्रकातील मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदी पेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप कमानी स्टेज | २७,८५,०००-०० | १४,२८,४६३-०० | | १३५६५३७-०० |
| २ | कलाकार बिदागी कीर्तनकारासह | २,९५,०००-०० | ४,६२,६८५-०० | १,६७६८५-०० | |
| ३ | मिष्टान्न खर्च -मजूरीसह | १५,९४,९५९-०० | १०,२६,५५७-०० | | ५,६८,४०२-०० |
| ४ | विद्युत रोषणाई ,जनसेट भाडे , इंधन खर्च इ. | ८,५०,०००-०० | ६,३८,६००-०० | | २११४००-०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी- प्रसादासह | १३,००,०००-०० | १०,८६,०६७-०० | | २१३९३३-०० |
| ६ | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक(विद्यार्थी) मानधन | २,९०,०००-०० | २,७२,१३९-०० | | १७८६१-०० |
| ७ | इतर खर्च - प्रसाद,प्रसादाल्य फर्निचरभाडे, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, फोटोग्राफी,पेंटर बीले ,फलेक्स बोर्ड - स्टेज बॅनर -१५०००/-इत्यादी | ५०,०४१-०० | २३,२८२-०० | | २६७५९-०० |
| ८ | पालख्यांचे पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च व पिण्याचे पाण्याची व्यवस्था | १,७५,०००-०० | ०-०० | | १,७५,०००-०० |
| | | **७३,४०,०००-००** | **४९३७७९३-००** | **१६७६८५-००** | **२५६९८९२-००** |

उपरोक्त तपशील पाहता श्री पुण्यतिथी उत्सव २०१२ करीता एकुण रुपये ७३,४०,००० /- (अक्षरी रुपये त्र्याहत्तर लाख चाळीस हजार मात्र) अंदाजपत्रक तरतुद करण्यात आलेली होती. या उत्सवाकरीता प्रत्यक्षात एकुण रुपये ४९,३७,७९३/- (अक्षरी रुपये एकुणपन्नास लाख सदवतीस हजार सातशे त्र्यान्नव मात्र) खर्च झालेला आहे. तरी सदरचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.६६** **प्रतिवर्षी प्रमाणे गुडीपाडवा (मराठी नववर्षानिमित्त) सादर करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांबाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, शिलधी प्रतिष्ठान, शिर्डी यांनी सालाबादप्रमाणे याही वर्षी गुरुवार दि.११/०४/२०१३ रोजी गुढीपाडवा चैत्र शु.१ (मराठी नववर्ष ) च्या पुर्वसंध्येला बुधवार दि.१०/०४/२०१३ तसेच मराठी सुष्टीतील नामवंत नाटय अभिनेत्यांची प्रमुख भुमिका असलेले नाटय प्रयोगाचे व साईरत्न पुरस्कार सोहळा यांचे आयोजन केलेले आहे. त्यासाठी साईनगरचे भव्य मैदान व विद्युत पुरवठा मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

दि.२४/०५/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.६६ व निर्णय क्र.४७९ अन्वये शिर्डी गावातील सार्वजनिक कार्यक्रमासाठी साईनगर परीसरात सेवाआकार घेऊन मोकळे मैदान दयावे व विजपुरवठा करणेत यावा असे ठरलेले आहे. यानुसार सन २००९,२०१०, २०११, २०१२ मध्ये शिलधी प्रतिष्ठान शिर्डी यांना नविन वर्षाचे प्रारंभ दिनी नाटक सादर करणेस व रक्कम रु.२,०००/- सेवा आकार घेऊन साईनगर मैदान दिले होते.

त्यानंतर साईनगर मैदानाबाबत मा.त्रिसदस्यीय समितीचा दि.२८/०४/२०१२ चा निर्णय खालीलप्रमाणे झालेला आहे.

निर्णय क्र.३६९ यावर सविस्तर चर्चा होऊन साईनगर परिसरात संस्थान कर्मचाऱ्यांची निवासस्थाने व श्री साईबाबा हॉस्पिटल आहे. साईनगर मैदानात कार्यक्रमास परवानगी दिल्यास कार्यक्रमाचे लाऊड स्पिकरचे आवाजाने श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रुग्णांना त्रास होतो. याकरीता येथून पूढे साईनगर मैदान संस्थानचे कार्यक्रमाव्यतिरिक्त कोणासही वापरण्यास देण्यात येऊ नये.

तसेच मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.१८/१०/२००८ चे सभेत निर्णय क्र.८०५ मध्ये "येथुन पूढे साईनगर मैदान कोणत्याही खाजगी व राजकीय प्रकारच्या कार्यक्रमास भाडोत्री देण्यांत येऊ नये" असे ठरले आहे याचे काटेकोर पालन करण्यात यावे असे ठरले.

**१)** दि.८/१०/२०१२ चे सभेतील निर्णयानुसार डॉ.अण्णसाहेब गव्हाणकर साई सेवा ट्रस्ट,कुर्ला मुंबई हे ८० वर्षापासून कोजागिरी पौर्णिमा निमित्त कार्यक्रम हे मंदिरामध्ये सायंकाळी ७ ते ११ पर्यत व शेजारती नंतर मंदिर परिसरात कलाकार हजेरी कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम करत असतात.

**२)** तेरा वर्षापासून अस्थमा (दमा ) चिकित्सा शिबीर साईनगर मैदानावर कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी आयोजित करण्यात येते. हा कार्यक्रम डॉ.यु.एस.तांबोळी हे दमा रुग्णासाठी मोफत औषध देतात. त्यासाठी दि.२९/१०/२०१२ रोजी साईनगर मैदानावर परवानगी देण्यात आली होती.

**३)** दिनांक २८/४/२०१२ च्या झालेल्या निर्णयानंतर मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.१५/०९/२०१२ च्या सभेतील निर्णय क्र.७८९ नुसार श्री.अरुण गायकवाड, विश्वस्त,लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट,शिर्डी यांना दिपावली (लक्ष्मीपूजन) या दिवशी तेलाचे दिवे लावणे या कार्यक्रमासाठी दि.१०/११/२०१२ ते १३/११/२०१२ अखेर तीन दिवस साईनगर मैदान वापरासाठी देण्यात आले होते.

**४)** दिनांक ८/०१/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५६ नुसार श्री.अरुण गायकवाड, विश्वस्त, लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट,शिर्डी यांना दि. १४ व १५ जानेवारी २०१३ रोजी साईलक्ष्मी यज्ञ कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात आलेली होती.

**५)** दिनांक ८/०१/२०१३ चे व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.५५ नुसार साईसंगम सेवाभावी संस्था, शिर्डी यांना २३/०१/२०१३ ते २९/०१/२०१३ अखेर साईभजन संध्या कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात आलेली होती.

तरी उपरोक्त कार्यक्रम करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, यानंतर साईनगर मैदान संस्थानचे कार्यक्रमाव्यतिरिक्त कोणासही वापरात देऊ नये, याकरिता मागील दोन वर्षामध्ये ज्यांना कार्यक्रमांसाठी मैदान वापरास दिले होते, त्यांना यापुढे साईनगर मैदान कार्यक्रमासाठी मिळणार नाही, असे लेखी पत्र पाठविणेत यावे व साईनगर मैदान कार्यक्रमासाठी मिळणेबाबत अर्ज आल्यास, त्वरीत याविषयी उलट टपाली कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.६७ श्री रामनवमी उत्सव- २०१३ कलाकार निश्चित करणे व किर्तनकार बिदागी निश्चित करणे.**

**प्रस्ताव-** श्री रामनवमी उत्सव २०१३ हा गुरुवार दि.१८/०४/२०१३ ते शनिवार दि.२०/०४/२०१३ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम:-**

श्री रामनवमी उत्सवाकरीता दरवर्षी श्री गोरटे महाराज प्रतिष्ठान, गोरटे यांचे मार्फत पाठविलेले कीर्तनकार कीर्तन करीत असतात. यावर्षी त्यांना पत्र दिलेले आहे. मागील वर्षी रामनवमी उत्सवात ३ दिवसाचे कीर्तनासाठी रु.९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. मागील उत्सवाप्रमाणेच कीर्तनकारास रु.९००१/-( रु.नऊहजार एक मात्र ) मानधन देणेस मान्यता असावी.

**ब) कलाकार कार्यक्रम :-**

उत्सवात कार्यक्रमास परवानगी मागणाऱ्या कलाकारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम तपशील | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| १ | कैलास हरेकृष्णदास, ७९ प्रशांतनगर, हनुमान मंदिराजवळ, काटोलरोड,नागपूर<br>मो-०९८२३७२१५६३<br>आकाशवाणी, दुरदर्शन, आस्था चॅनल कार्यक्रम केलेले आहे . साईमंदीर संस्थान ( साईअमृतधारा या चॅनेलवर Live Singer | ओम साईराम मधुर भजनसंध्या | | विनामुल्य |
| २ | अनुपमा देशपांडे, पार्श्वगायिका<br>बी/१४०१,पंचशील हाईट, महावीर नगर,कांदीवली, (प) मुंबई -४०० ०६७<br>मो.०९८२०१२४७९५ | साईभजन संध्या- मंदीरात सकाळी पहाटेच्यावेळी होणारी भूपाळी गायली आहे. उठा उठा सकळ जण | | विनामुल्य |
| ३ | गुरुकुल किंदेर गारटीन स्कूल<br>बन्सतीनगर, रुरकेला, ओडिशा<br>मो-०९९३८७७६७६५, ०९९३८७९६८५८ | साईभजन | | विनामुल्य |
| ४ | विजय बा.ढोले व योगेश परांजपे,श्रीरामपूर<br>मो-७५८८५४१७४३, ९८९०४३१७४१ | साई तेरी माया - साईभजन संध्या | | विनामुल्य |
| ५ | आर्चिता वेनूगोपाल, आंध्रप्रदेश | कुचीपुडी डान्स | | विनामुल्य |
| ६ | सौ.सुनिता टिकारे , ४,देवदर्शन बिल्डींग, टि.एच कटारीया मार्ग, माहिम मुंबई ४०० ०१६<br>मो-९८६७८१२७४२<br>कार्यक्रम झालेला आहे. | शास्त्रीय संगीत, भक्ती संगीत, अभंग भजन | | विनामुल्य |
| ७ | देवरावजी कुळमेथे, संभाजीनगर भोरमळा, रेल्वे ट्रॅक्शन गेटसमोर, एकलहरे रोड नाशिक रोड<br>मो- ९२२५७३८६५०<br>कार्यक्रम झालेला आहे. | साईभजनसंध्या | | विनामुल्य |
| ८ | सौ.प्राजक्ता जोगळेकर, शिर्डी<br>श्री रामनवमी २०१२ रोजी कार्यक्रम झालेला आहे.<br>मो- ९९७०१७७७८४ | भरतनाटयम | | विनामुल्य |
| ९ | साई गोपाल देशमुख, बीड<br>मो-९८२२५९५९४२<br>श्री गुरुपौर्णिमा-२०१२ रोजी कार्यक्रम झाला आहे . | दरबार मेरे साईका | | विनामुल्य |
| १० | अनंत स.पांचाळ, ( ढोलकी वादक )<br>१/११, हेंद्रे (रुस्तम) बिल्डींग गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई,फोन नं- ४९६०१९८ | मुजरा घ्या साईनाथा - सुमधुर व विविध गीतांचा कार्यक्रम | | मानधनाचा उल्लेख नाही |
| ११ | के.पी. लिपीका रेड्डी , संकेतिका विद्यापरिषद इंजिनिअरींग कॉलेज, विशाखापट्टणम्<br>मो- ९४४१४८००२१, ९६७६९४५२४० | कुचीपुडी डान्स | | मानधनाचा उल्लेख नाही |
| १२ | टि.वरुण , ९४,एसबीआय ऑफिसर कॉलनी मुसरमबाग, हैद्राबाद (आंध्रप्रदेश)<br>मो-९०००३२५५४७ | कुचीपुडी डान्स | | मानधनाचा उल्लेख नाही |
| १३ | सौ.सध्या फडके आपटे,<br>ए/३, स्वागत अपार्टमेंट, सहवास सोसायटी कर्वेनगर, पुणे .मो- ९६५७७०९९३२ | सितारवादक | | मानधनाचा उल्लेख नाही |
| १४ | एम.वेदव्यास,<br>मो-९०३२८२३४३८ | कुचीपुडी डान्स | | मानधनाचा उल्लेख नाही |
| १५ | अश्विनी कुलकर्णी, नागपूर | सबका मालिक एक है- महानाटय | | मानधनाचा उल्लेख नाही |
| १६ | ह.भ.प.सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी, डोंबिवली.<br>६, माधवी सोसायटी,राजानी पथ ,कासलेन, ३ रामनगर, डोंबिवली ( पू) ४२१ २०१<br>मो-९३२३०१९३५१ | कीर्तन, मनोरंजनातुन समाजप्रबोधन, भक्तीगीत गायन | | मानधनाचा उल्लेख नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | सौ.रोहीणी महाजन,<br>प्लॅट नं-२०, गंगा सोसायटी, सहकारनगर, नंबर-२, पुणे मो-९४२३४४२९८४ | भजनाचे विविध कार्यक्रम -गोंधळ, जोगवा, भारुड, पोवाडा | | मानधनाचा उल्लेख नाही |
| १८ | रामकृष्ण केणी ,<br>१९२ धारावी कोळीवाडा, मुंबई.<br>मो-९५९४३८६८९५ | साईलीला महानाटयाचा दोन अंकी प्रयोग | | मानधनाचा उल्लेख नाही. |
| १९ | गुरु रेखा श्री ( देसाई )<br>डी-००२/००३ मिरा कॉम्पलॅक्स न्यु गोल्डन नेस्ट रोड, गोल्डन नेस्ट पोलिस चौकीच्या पाठीमागे , भायंदर (पुर्व) ठाणे,मुंबई.मो-९८२०१९७१७५ | भारतनाटयम , कथक व भजन | | २० कलाकाराचे जाणे येण्याचे प्रवास भाडे अपेक्षित आहे. |
| २० | अमेय गुप्ते, मुंबई<br>१५, जगन निवास, एल.जे रोड , शिवाजी पार्क दादर, मुंबई. मो- ९३२३३९७८०६ | मराठी व हिंदी गीतांचा सुरेल अविष्कार | २० | रु.२१,०००/- |

अ.नं.१ ते ९ कलाकारांनी कार्यक्रम विनामुल्य करणेबाबत कळविलेले आहे. त्यापैकी अ.नं.७ते ९ या कलाकारांचे कार्यक्रम झालेले आहेत. अ.नं. १० ते १८ कलाकारांनी मानधनाचा उल्लेख केलेला नाही. अ.नं.१९ यांनी २० कलाकारांचे मुंबई येथील जाणे येणेचे भाडे मागितलेले आहे. अ.नं.२० यांनी रु.२१,०००/- ची मागणी केलेली आहे. रामनवमी उत्सव ३ दिवसाचा असल्याने किमान तीन कार्यक्रम आयोजीत करावे लागतील.

मान्यता असावी.

**निर्णय क्र.३२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१३ निमित्ताने विनामुल्य सेवा करणाऱ्या कलाकरांना प्राधान्य देण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच, विनामुल्य सेवा करणाऱ्या कलाकारांची निश्चित करण्याचे अधिकार श्री.बी.डी. साबळे, श्री.एस.व्ही. गमे, प्रशासकीय अधिकारी, अधिक्षक- मंदिर विभाग यांना प्रदान करणेत आले व किर्तनकाराची बिदागी रु.९,००१/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन/ वशी-०५)

---

**विषय नं.६८ रामनवमी उत्सव २०१३ बाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७(१) मध्ये खालील तरतुद आहे.

राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा -अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पुजा विधी , उत्सव साजरे केले जातात.

श्री साईबाबांनी हयात असतांना शिर्डीत श्री रामनवमी उत्सव सुरु केला. त्यानुसार रानमवमी उत्सव- २०१३ हा १०२ वा उत्सव आहे.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री रामनवमी उत्सव गुरुवार दिनांक १८/०४/२०१३ ते शनिवार दिनांक २०/०४/२०१३ ( चैत्र शुध्द ८ शके १९३५ ते चैत्र शु.९ शके १९३५ ) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | रामनवमी -२०१३ चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाची कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका व उत्सव उदिप्रसाद | भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना तसेच मान्यवरांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,६४,१०० पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमीप्रमाणे वर्तमान पत्रातून प्रेस नोट ( न्यूज अॅटम ) म्हणून प्रसिध्दी देण्यात येईल |
| २ | उत्सव व्यवस्था | **अ) कलाकार कार्यक्रम** |
| | प्रारंभ दिवस<br>गुरुवार, दि.१८/४/२०१३<br>चैत्र शु ८।। शके १९३५ | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |

| | | |
|---|---|---|
| | मुख्य दिवस<br>शुक्रवार,दि.१९/४/२०१३<br>चैत्र शु ८।। शके १९३५ | १) सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम ( साईनगर मैदान स्टेजवर )<br>२) रात्री १०.०० ते सकाळी ५.०० पर्यत ( २०/०४/२०१३) या वेळेत इच्छुक कलाकारांचा साईभजनांचा कार्यक्रम. या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | सांगता दिवस<br>शनिवार,दि.२०/४/२०१३<br>चैत्र शु ९।। शके १९३५ | सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम ( साईनगर मैदान स्टेजवर )<br>उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत.इच्छुक कलाकारांची पत्रे व तक्ता स्वतंत्र अवलोकनार्थ सादर केला जाईल. |
| | **ब) कीर्तन कार्यक्रम** | श्री रामनवमी कीर्तन कार्यक्रम ह.भ.प.दासगणू महाराज आश्रम गोरटे, हे करीत असतात. त्यांचेकडून आलेल्या कीर्तनकारापासून कीर्तने होतील. निमंत्रित कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रित कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत अदा करण्यात येईल. |
| ३ | श्री साई सत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | गर्दीच्या काळात व्यवस्थापनाच्या दृष्टीने उत्सवकाळात सत्यनारायण व अभिषेक पूजा बंद ठेवण्यात येतात. उत्सवकाळात दिनांक दि.१८/०४/२०१३ ते दि.२०/०४/२०१३ अखेर श्री साईसत्यव्रत पुजा बंद ठेवता येतील. |
| ४ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दि.१८/४/२०१३ रोजी सकाळी ६.१५ वाजता श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.१९/०४/२०१३ सकाळी ५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे समितीचे सदस्य पाहिले अध्याय पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.१७/०४/२०१३ रोजी मंदीर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणाऱ्या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई मंदीर रात्रभर उघडे राहील. श्री रामनवमी उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.सदस्यांची नावे ठरविणे आहे. |
| ५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी गुरुवार दि.१८/०४/२०१३ राजी सकाळी ९.१५ वाजात श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी शुक्रवार दि.१९/०४/२०१३ रोजी सायंकाळी ५.०० वाजता रथाची गावातून मिरवणूक निघेल. |
| ६ | कावडी व निशाणाची मिरवणूक | उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक १९/०४/२०१३ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्रींचे कावडी व सायंकाळी ४.०० वाजता निशाणाची मिरवणूक राहिल. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी कावडीने घेऊन येतात. यासाठी समाधी मंदीराचे बाहेरील बाजूस दक्षिण गेटच्या समोर अभिषेक मुर्ती ठेऊन स्वतंत्र व्यवस्था करण्यात येते. कावडीधारकांना श्रीफळ प्रसाद दिला जातो. या वर्षीही तशी कार्यवाही करण्यात येईल. |
| ७ | विद्युत रोषणाई | श्री रामनवमी उत्सवात श्री व्दारकामाई मंडळ,मुंबई हे समाधी मंदीर, श्री व्दारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदीर परिसरात सोईप्रमाणे विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च त्यांना देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. विद्युत विभागामार्फत त्यांना या उत्सवात रोषणाई करणेचे पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ८ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने नेहमीप्रमाणे जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक अहमदनगर यांना विनंती करण्यात येईल. |
| ९ | प्रसाद-भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.त्रिसदस्यीय समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलिस कर्मचारी व उत्सवात काम करणेकारीता मदतीस येणाऱ्या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल.<br>सन २०१२ चे पुण्यतिथी उत्सवात तिनही दिवसांचे मिष्टांन्न पदार्थ शिरा तीनही दिवस ठेवण्यात आले होते.याही उत्सवात मागील उत्सवाप्रमाणे मिष्टांन्न देता येतील. |
| १० | लिलाव | श्रींना अर्पण केलेल्या वस्त्रांची व इतर वस्तंची नेहमीप्रमाणे प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने उत्सवाचे तिनही दिवशी विक्री करण्यात येईल. |
| ११ | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफटमध्ये ठेवण्यात येतील. तसेच देणगी काऊटर्सची वेळ सकाळी ४ ते रात्रौ ११ पर्यत करण्यात येईल. |
| १२ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात येईल. |
| १३ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईप्रसाद न.१ व नं.२, धर्मशाळा नं.२, व्दारावती, भक्तनिवासस्थान इ, इमारतीमधून तसेच साईनगर, धर्मशाळा व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी |

| | | |
|---|---|---|
| | | पदयात्रीसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदीर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप / शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व उन्हाळी मंडपही टाकावयाचे आहेत. त्यास मान्यता असावी. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. पालखी धारकांची आलेल्या पत्रानुसार साईप्रसाद निवासस्थानाकडे तक्ता करण्यात येऊन त्यांचे निवासाबाबत सर्व निवासस्थाने एकत्रीत नियोजन करतील. |
| १४ | प्रथमोपचार केंद्र | मागील उत्सवात संस्थानमार्फत दिक्षीत वाडा येथे तीनही दिवशी तिन शिप्ट मध्ये व पिंपळवाडी रोड वरील दर्शनरांग प्रवेशव्दार येथे पहिल्या व तिसऱ्या दिवशी दोन शिप्ट मध्ये व मुख्य दिवशी तिन शिप्ट मध्ये असे दोन ठिकाणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात आले होते. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरात ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे या उत्सवात कार्यवाही करण्यात येईल. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री रामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणाऱ्या पालख्या ठेवण्याची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, धर्मशाळा, परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणाऱ्या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय उद्यान श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, धर्मशाळा इ. इमारतीत तसेच साईनगर मैदानात , जुन्या प्रसादालाचे न.भ.निवासाचे व धर्मशाळेच्या मोकळया जागेत मंडप/ शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणाऱ्या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. त्याचप्रमाणे येणाऱ्या पालख्यांनसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिरडी रत्यावर मागील श्री रामनवमी प्रमाणे यंदाही करावी लागणार आहे. त्या सबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजुरीसाठी सादर करतील. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नासिक, शिंदे, सिन्नर (एमआयडीसी), खोपडी, दत्तमंदीर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा,सायाळे, जवळके , डोऱ्हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीजव्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत येईल. तसेच दोन वर्षापासून पालखीतील पदयात्री शिर्डी मध्ये आल्यावर त्यांना संस्थानतर्फे एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येते. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून विनामुल्य देण्यात येईल. |
| १६ | कुस्त्या हंगामा | श्री रामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हंगामा गावकऱ्यांमार्फत भरविण्यात येतो. गेल्या वर्षी श्री रामनवमी उत्सवाचे १०२ आहे. मागील उत्सवात कुस्त्यांसाठी रुपये ३,००,०००/- ( अक्षरी रुपये तीन लाख मात्र ) खर्चास मंजूरी देण्यात आलेली होती. यावर्षी द्यावयाची रक्कम निश्चित करणे आहे. अंदाजपत्रकीय तरतुदीत मागील वर्षाप्रमाणे रु.३ लाखाची तरतुद दर्शविण्यात आलेली आहे. मा.त्रिसदस्यीय समितीचे मंजुरीनुसार सदर तरतुद कमी / जास्त करता येईल. |
| १७ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉलला पाणी सोडणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १९ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री रामनवमी उत्सव -२०१२ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ६७,००,०००/- (अक्षरी रुपये सदुसष्ट लाख मात्र ) इतक्या रकमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ३३,४४,४१४/- ( रुपये तेहतीस लाख चौरेचाळीस हजार चारशे चौदा मात्र) इतका खर्च झाला होता.<br>श्री रामनवमी -२०१३ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४९,६०,०००/- (रुपये एकुणपन्नास लाख साठ हजार) मंजूरीसाठी सादर केलेले आहे. |

तरी श्री रामनवमी उत्सव २०१३ साजरा करणेस, याकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे ४९,६०,०००/-(रुपये एकुणपन्नास लाख साठ हजार) चे खर्चास मान्यता असावी.

अवलोकनार्थ व निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/ वशी-०५)

---

**विषय नं.६९ शिर्डी नगरपंचायतीचे मालकीचे मौजे शिंगवे येथील क्षेत्रास वॉलकंपाऊंडचे बांधकामास रु.८० लाख निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्याधिकारी, नगरपंचायत शिर्डी यांनी जा.क्र.नप./बांध/कावि-५/९६२/२०१३, दि.२८.०२.२०१३ चे पत्राने शिर्डी नगरपंचायतीचे मालकीचे मौजे शिंगवे येथील क्षेत्रास वॉलकंपाऊंडचे बांधकामास रुपये ८० लाख निधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केली आहे.

यापुर्वीही मा.अध्यक्षा,नगरपंचायत शिर्डी यांनी जा.क्र.न.पं./साप्र/कावि-१/४२३/२०१२, दि.१५.०९.२०१२ चे पत्राने, १९ एकर जमीन खरेदी, विद्युत व्यवस्था, पाणी व्यवस्था, पोहच रस्ता व अंतर्गत रस्ते, शेड कॉन्क्रीटीकरण, सेंद्रीय खत प्रकल्प, गॅस प्रकल्प, विद्युत निर्मीती प्रकल्प, जळाऊ विटा/ कोळसा निर्मीती प्रकल्प, प्लॅस्टीक पुर्नवापर प्रकल्प, शास्त्रोक्त भुमि भराव, अद्ययावत वहाने व इतर खर्चासाठी रुपये २,५९० लाख निधीची मागणी केली होती. दि.०८.१०.२०१२ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.८५० अन्वये, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात आलेला आहे.

शिर्डी नगरपंचायतचे मौजे शिंगवे येथील क्षेत्रास वॉलकंपाऊंडचे बांधकामासाठी निधी मागणीचा प्रस्ताव अवलोकनार्थ व निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.३३० सदरहू विषयावर सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीच्या मा.नगराध्यक्षा व मुख्याधिकारी यांना पुढील सभेपुढे समक्ष बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-सामान्य प्रशासन/ वशी-०३)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेकामी भाडोत्री टँकर लावणेस व टँकरधारकांचे बीलाची रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सध्या संस्थान परिसरास कनकुरी- पिंपळवाडी- संस्थान या संयुक्त पाणीपुरवठा योजनेच्या कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातून पाणीपुरवठा करणेत येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करणेत आली असून, सध्या या ठिकाणी असणाऱ्या ०३ साठवण तलावांची साठवण क्षमता ३३२ दशलक्ष लिटर्स आहे.

सध्या या साठवण तलावातून कनकुरी व पिंपळवाडी या गांवासह संस्थान परिसरातील मंदिरे, श्री साई प्रसादालय, भक्तनिवासस्थाने, रुग्णालये, शैक्षणिक संकुले यांसह कर्मचारी वसाहती, ०३ कर्मचारी हौसिंग सोसायटी, पोलिस स्टेशन, जिल्हा परिषद शाळा आदि ठिकाणी दररोज अंदाजे सरासरी ४० ते ४५ लाख लिटर्सचा पाणीपुरवठा केला जात आहे.

नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचे जा.क्रं.सिंचन/९/१०४३/२०१३, दि.०२.०२.२०१३ पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी गोदावरी/दारणा नदी, गोदावरी डावा/उजवा कालव्यातून शासन मंजुरीनुसार पिण्याचे पाणी पुरवठा आवर्तन संस्थानचे साठवण तलावात माहे डिसेंबर २०१२ व जानेवारी २०१३ या कालावधीत देण्यात येवून पिण्याचे पाणी पुरवठा केलेला आहे. उपरोक्त पत्रात त्यांनी चालु वर्षी प्रकल्पाच्या जलाशयावर व संपुर्ण लाभक्षेत्रात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाल्याने प्रकल्पातील धरणांमध्ये देखील पुरेसा पाणीसाठा उपलब्ध झालेला नाही. जलाशयातील उपलब्ध पाणी साठा हा माहे जुलै २०१३ पावतो पुरवावयाचा असल्याने पाणी अत्यंत काटकसरीने वापरणेबाबत कळविले आहे.

यावर उपाय-योजना म्हणून पाणी वापर काटकसरीने करणेबाबत परिपत्रक ठिकठिकाणी लावण्यात आलेले आहेत. बगीचासाठी बोअरवेल व विहीरीच्या पाण्याचा वापर करणेबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच श्री साईप्रसादालयात आवश्यक त्यावेळी ताटांऐवजी पत्रावळीचा वापर सुरु करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच आवश्यक त्या ठिकाणी पाणी कपात सुरु करण्यात आलेली आहे. कर्मचारी वसाहत व बगीचासाठी वापरात येणारे पाण्याचे प्रमाण कमी करुन उर्वरीत पाण्याचा वापर साईभक्तांचे वापरासाठी करण्यात येत आहे. तसेच साठवण तलावाचे बाजूचे स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरीतून पाईपलाईन टाकून ते पाणी वापरासाठी घेणेसाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

परंतू दिनांक ०२.०३.२०१३ रोजी शिर्डीत श्रीसाईचे दर्शनासाठी साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढल्याने व साठवण तलावातील पाणी संपल्याने पाणी टंचाई निर्माण झाली. संस्थान परिसरातील विहीरी व बोअरवेल तसेच स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरीतून घेण्यात आले. पाणी अपुरे पडल्यामुळे संस्थान परिसरास तातडीने पाणी पुरवठा करणेसाठी उपलब्ध झालेल्या स्थानिक टँकरधारकांशी केलेल्या चर्चेप्रमाणे त्यांनी खालील दराप्रमाणे पाणी पुरवठा करणेचे मान्य केलेले आहे.

टँकरधारकांनी नमुद केलेल्या दराचा तपशिलः-

| अ.नं. | टँकर धारकाचे नांव | टँकर क्षमता लिटर्समध्ये | मान्य दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री राजेंद्र कातोरे, निघोज-निमगांव. | ७००० ते ९००० | रु. ३७५/- प्रती ट्रीप. |
| ०२ | श्री भारत मते, निघोज-निमगांव. | ७००० ते ९००० | रु. ३७५/- प्रती ट्रीप. |
| ०३ | श्री संजय चिकणे, रुई | ७००० ते ९००० | रु. ३७५/- प्रती ट्रीप. |
| ०४ | श्री प्रसाद कोते, शिर्डी. | ७००० ते ९००० | रु. ३७५/- प्रती ट्रीप. |
| ०५ | श्री गणपत गोंदकर, शिर्डी. | ७००० ते ९००० | रु. ३७५/- प्रती ट्रीप. |

**अ)** वरील प्रमाणे उपलब्ध टँकरधारकांनी त्यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे रु.३७५/- मात्र प्रती ट्रीप या दराने पाणी पुरवठा करणेचे मान्य केलेले आहे. तसेच जे साईभक्त टँकरधारक पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करुन देणेस तयार असतील/इच्छुक असतील अशा टँकरधारकांना प्रत्यक्ष डिझेल खर्च देवून अथवा ते जे मोफत सेवा उपलब्ध करुन देणेस तयार असतील त्यांचेकडुन पाणी पुरवठा सुरु करणेस मान्यता मिळावी.

तरी संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेसाठी भाडोत्री टँकर लावणेकामी व टँकरधारक व संस्थान यामध्ये मान्य झालेला दर रु. ३७५/- मात्र प्रती ट्रीप या दराने वरील नमुद व ऐनवेळी उपलब्ध

होणाऱ्या टँकरधारकांकडुन पाणी पुरवठा करुन घेणेसाठी व पाणी पुरवठा करणेसाठी येणारे एकुण खर्चास मान्यता मिळावी.

**निर्णय क्र.३३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेसाठी यापुर्वी घेतलेल्या पाण्याचे टँकर्ससाठी रु. ३७५/- मात्र प्रति टँकरप्रमाणे रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, यापुढेही पाणी टंचाई असे पर्यंत प्रस्तावित केलेप्रमाणे उपरोक्त मान्य दराने, भाडोत्री टँकर लावुन संस्थान परिसरास पाणी पुरवठा करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अनुषंगिक योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेकामी मटेरियल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सध्या संस्थान परिसरास कनकुरी- पिंपळवाडी- संस्थान या संयुक्त पाणीपुरवठा योजनेच्या कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातून पाणीपुरवठा करणेत येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत करणेत आली असून, सध्या या ठिकाणी असणाऱ्या ०३ साठवण तलावांची साठवण क्षमता ३३२ दशलक्ष लिटर्स आहे.

सध्या या साठवण तलावातून कनकुरी व पिंपळवाडी या गांवासह संस्थान परिसरातील मंदिरे, श्री साई प्रसादालय, भक्तनिवासस्थाने, रुग्णालये, शैक्षणिक संकुले यांसह कर्मचारी वसाहती, ०३ कर्मचारी हौसिंग सोसायटी, पोलिस स्टेशन, जिल्हा परिषद शाळा आदि ठिकाणी दररोज अंदाजे सरासरी ४० ते ४५ लाख लिटर्सचा पाणीपुरवठा केला जात आहे.

नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचे जा.क्रं.सिंचन/९/१०४३/२०१३, दि.०२.०२.२०१३ पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी गोदावरी/दारणा नदी, गोदावरी डावा/उजवा कालव्यातून शासन मंजुरीनुसार पिण्याचे पाणी पुरवठा आवर्तन संस्थानचे साठवण तलावात माहे डिसेंबर २०१२ व जानेवारी २०१३ या कालावधीत देण्यात येवून पिण्याचे पाणी पुरवठा केलेला आहे. उपरोक्त पत्रात त्यांनी चालु वर्षी प्रकल्पाच्या जलाशयावर व संपुर्ण लाभक्षेत्रात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाल्याने प्रकल्पातील धरणांमध्ये देखील पुरेसा पाणीसाठा उपलब्ध झालेला नाही. जलाशयातील उपलब्ध पाणी साठा हा माहे जुलै २०१३ पावतो पुरवावयाचा असल्याने पाणी अत्यंत काटकसरीने पुरविणेबाबत कळविले होते.

यावर उपाय-योजना म्हणून पाणी वापर काटकसरीने करणेबाबत परिपत्रक ठिकठिकाणी लावण्यात आलेले आहेत. बगीचासाठी बोअरवेल व विहीरीच्या पाण्याचा वापर करणेबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच श्री साईप्रसादालयात आवश्यक त्यावेळी ताटांऐवजी पत्रावळीचा वापर सुरु करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच आवश्यक त्या ठिकाणी पाणी कपात सुरु करण्यात आलेली आहे. कर्मचारी वसाहत व बगीचासाठी वापरात येणारे पाण्याचे प्रमाण कमी करुन उर्वरीत पाण्याचा वापर साईभक्तांचे वापरासाठी करण्यात येत आहे. तसेच साठवण तलावाचे बाजूचे स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरीतून पाईपलाईन टाकून ते पाणी वापरासाठी घेणेसाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

परंतू दिनांक ०२.०३.२०१३ रोजी शिर्डीत श्रीसाईचे दर्शनासाठी साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढल्याने व साठवण तलावातील पाणी संपल्याने पाणी टंचाई निर्माण झाली. संस्थान परिसरातील विहीरी व बोअरवेल तसेच स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरीतून पाणी घेणेसाठी सदरच्या उपलब्ध विहीरीत मोटरी टाकून पाणी घेण्यात आलेले आहे. या विहीरीतून उपलब्ध होणारे पाणी साईभक्तांचे वापरासाठी अपुरे पडत असून अजून जादा प्रमाणात पाण्याची उपलब्धता करावी लागणार आहे.

सन २०१२ मध्ये पाणी पुरवठा विभागाकरीता विविध क्षमतेच्या १० इलेक्ट्रिक मोटारी खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या मोटारी विविध ठिकाणी बसविण्यात आलेल्या आहेत. ज्या ठिकाणांहून मोटारी बसवून पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे तेथुन सलग पाणी उपलब्ध होत नाही. जो पर्यंत विहीरीत पाणी उपलब्ध आहे तो पर्यंत मोटार चालविली जाते. विहीरीतील पाण्याचा उपसा झाल्यानंतर विहीरीत पाण्याची लेव्हल होईपर्यंत मोटार बंद ठेवावी लागते. परिसरातील विहीरींची पाण्याची पातळी यावर्षी जादा प्रमाणात खालावलेली असल्याने जास्त संख्येने विहीरींची उपलब्धता शोधून पाणी उपलब्ध करावे लागत आहे. प्रत्येक विहीरीतून पाणी लेव्हल झाल्यानंतर मोटारी चालवून पाणी घेणे सुरु आहे. पाटबंधारे विभागाचे पत्राप्रमाणे जुलै २०१३ पर्यंत सदरची परिस्थिती राहणार असल्याने आपणास मिळेल तेथुन पाणी उपलब्ध करावे लागणार आहे.

यासाठी आपणास खालीलप्रमाणे मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे.

| अं.नं. | मटेरियल तपशिल | आवश्यकता | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | १० एच.पी. पाणबुडी मोटार, कॉपर रोटर, टेक्स्मो कंपनी. | ०२ नग. | रु. ४०,०००/- प्रती नग. | ८०,०००.०० |
| ०२ | ५ एच.पी. पाणबुडी मोटार, कॉपर रोटर, टेक्स्मो कंपनी, | ०२ नग. | रु. २३,०००/- प्रती नग. | ४६,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | ६/१२ स्टेज सबर्मसिबल मोटार, कॉपर रोटर, टेक्स्मो कंपनी. | ०२ नग. | रु. २७,०००/- प्रती नग. | ५४,०००.०० |
| ०४ | फ्लॅट केबल- ६ स्क्वे.एमएम पॉलीकॅब कंपनी. | २५० मिटर. | रु. १०५/- प्रती मिटर. | २६,२५०.०० |
| ०५ | फ्लॅट केबल- ४ स्क्वे.एमएम पॉलीकॅब कंपनी. | २५० मिटर. | रु. ७२/- प्रती मिटर. | १८,०००.०० |
| ०६ | एम.एस.नॉन रिटर्न व्हॉल (फ्लॅंज टाईप) | ०६ नग. | रु. ९५०/- प्रती नग. | ५७००.०० |
| | | | एकुण रक्कम- | २,२९,९५०.०० |

याकरीता अंदाजे रु. २,२९,९५०/- मात्र खर्च अपेक्षित आहे तसेच मा. त्रिसदस्यीय समितीचे बैठकिस/ सभेस अजुन काही कालावधी लागणार असल्याने दरम्यानचे कालावधीत दर नमुद केलेली कार्यवाही पूर्ण करुन घेणे अत्यावश्यक आहे. सबब वरीलप्रमाणे साहित्य स्थानिक पातळीवरती उपलब्ध असल्यास तातडीने कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. २,२९,९५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी.

**निर्णय क्र.३३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरास पाणी पुरवठा करणेकामी आवश्यक असलेले साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

**तसेच, सध्याची पाणी टंचाई विचारात घेता, सदरचे काम तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने, याकामी प्राप्त होणारी कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडुन योग्य ती कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,२९,९५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईआश्रम प्रकल्प भाग ०१ व ०२ येथील वॉटर्स कुलर्स जोडणीसाठी मटेरियल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे आर्थिक देणगीतून संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी हद्दीतील सर्व्हे नं.१०७,१०८,१०९ पैकी मधील जमिनीमध्ये साईआश्रम प्रकल्प भाग १ हा निवासी प्रकल्प व संस्थान मालकीच्या मौजे निमगांव-कोऱ्हाळे हद्दीतील गट नं. १७२ पैकी मधील जमीनीमध्ये भक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी साईआश्रम प्रकल्प भाग २ निवासी प्रकल्प उभारणेचे काम अंतिम टप्प्यात आहे.

साईआश्रम प्रकल्प भाग १ या प्रकल्पाचे दि. ११/०४/२०१३ रोजी उद्घाटन करण्याचे नियोजित असून दि. १८/०४/२०१३ ते दि. २०/०४/२०१३ या कालावधीत श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येत असल्याने त्या निमित्त सदर प्रकल्पातील खोल्या/ हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन दयावयाच्या आहेत.

याबाबत दि.२०/०३/२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब, मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब, सर्व प्रशासकीय अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिक्षक/विभाग प्रमुख यांचे समवेत साई आश्रम प्रकल्प भाग १ येथे राऊंड घेण्यात आला सदरच्या राऊंडमध्ये मा.कार्यकारी अधिकारी साहेब व उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी साईआश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ येथे साईभक्तांसाठी पिण्यासाठी थंड पाणी उपलब्ध होणेसाठी विद्युत विभागामार्फत नव्याने खरेदी करण्यात आलेले वॉटर कुलर्सचे ठिकाण ठरवून ते कार्यान्वित करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. सदर ठिकाणी पाण्याचे कनेक्शन नसल्याने वॉटर कुलर्स कार्यान्वित करणेसाठी त्यासाठी आवश्यक पाईप टाकून पाणी पुरवठा कनेक्शन जोडण्याचे काम करावे लागणार आहेत.

सदरचे काम करणेसाठी आवश्यक साहित्य सध्या पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध नाही. यासाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करुन पाईपलाईन कनेक्शन करण्याचे काम पाणी पुरवठा विभागांतर्गत करता येईल. यासाठी आवश्यक साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अं.नं. | मटेरियल तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | यु.पि.व्ही.सी.पाईप- १" | फिनोलेक्स | १२०० | फुट | २२.०० | २६,४००.०० |
| ०२ | यु.पि.व्ही.सी.पाईप- १/२" | फिनोलेक्स | ४०० | फुट | १२.०० | ४,८००.०० |
| ०३ | यु.पि.व्ही.सी.सॉकेट- १" | फिनोलेक्स | ४० | नग | १८.०० | ७२०.०० |
| ०४ | यु.पि.व्ही.सी.सॉकेट- १/२" | फिनोलेक्स | २० | नग | १०.०० | २००.०० |
| ०५ | यु.पि.व्ही.सी.एलबो- १" | फिनोलेक्स | १४४ | नग | १८.०० | २,५९२.०० |
| ०६ | यु.पि.व्ही.सी.एलबो (ब्रास)- १/२" | फिनोलेक्स | ९० | नग | ६०.०० | ५,४००.०० |
| ०७ | यु.पि.व्ही.सी.एलबो १/२" प्लेन | फिनोलेक्स | १४४ | नग | १२.०० | १,७२८.०० |
| ०८ | बीब कॉक - १/२" (नं.एसी ८१०२) | प्लंबर | ८४ | नंग | १०५०.०० | ८८,२००.०० |
| ०९ | यु.पि.व्ही.सी.सोल्युशन. | फिनोलेक्स | ०२ | लिटर | ९००.०० | १,८००.०० |
| १० | यु.पि.व्ही.सी. बॉल व्हॉल- १" | फिनोलेक्स | १८ | नग | ३००.०० | ५,४००.०० |
| ११ | यु.पि.व्ही.सी. टी- १" x १/२" | फिनोलेक्स | १३० | नग | ३०.०० | ३,९००.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | यु.पि.व्ही.सी. रेडसर- १" x १/२" | फिनोलेक्स | ३६ | नग | ३२.०० | १,१५२.०० |
| १३ | यु.पि.व्ही.सी. टी- १/२" | फिनोलेक्स | ९० | नग | १८.०० | १,६२०.०० |
| १४ | यु.पि.व्ही.सी. युनियन- १/२" | फिनोलेक्स | ९० | नग | ३०.०० | २,७००.०० |
| १५ | यु.पि.व्ही.सी. बॉल व्हॉल- १/२" | फिनोलेक्स | ९० | नग | १८०.०० | १६,२००.०० |
| १६ | यु.पि.व्ही.सी. १/२" थ्रेडर ब्रास (आतील आटे) | फिनोलेक्स | ८० | नग | ६०.०० | ४,८००.०० |
| १७ | यु.पि.व्ही.सी. १/२" थ्रेडर ब्रास (बाहेरील आटे) | फिनोलेक्स | ८४ | नग | ६०.०० | ५,०४०.०० |
| १८ | यु.पि.व्ही.सी. एन्डकॅप- १" | फिनोलेक्स | १८ | नग | १२.०० | २१६.०० |
| १९ | १/२" x २ फूट इनलेट पाईप | प्रयाग | ८४ | नग | ३०.०० | २,५२०.०० |
| २० | ॲंगल कॉल- १/२" | के.के. | ८४ | नग | ३१०.०० | २६,०४०.०० |
| २१ | SWR पाईप- २.१/२" | फिनोलेक्स | १२०० | फूट | २४.०० | २८,८००.०० |
| २२ | पि.व्ही.सी. रेडयुसर- २.१/२" x १.१/४" | फिनोलेक्स | ७२ | नग | ४५.०० | ३,२४०.०० |
| २३ | SWR प्लग बेन्ड- २.१/२" | फिनोलेक्स | १०८ | नग | ५५.०० | ५,९४०.०० |
| २४ | SWR सिंगल वाय- २.१/२" | फिनोलेक्स | ७२ | नग | ५८.०० | ४,१७६.०० |
| २५ | SWR प्लेन बेन्ड- २.१/२" | फिनोलेक्स | ६० | नग | ४८.०० | २,८८०.०० |
| २६ | PVC पाईप- १.१/४" | फिनोलेक्स | ३०० | फूट | १५.०० | ४,५००.०० |
| २७ | PVC एलबो- १.१/४" | फिनोलेक्स | ६० | नग | १२.०० | ७२०.०० |
| २८ | PVC टी- १.१/४" | फिनोलेक्स | ६० | नग | १६.०० | ९६०.०० |
| २९ | PVC थ्रेडर- १.१/४" (आतील आटे) | फिनोलेक्स | ६० | नग | १८.०० | १,०८०.०० |
| ३० | PVC बंद प्लग- १.१/४" | फिनोलेक्स | ६० | नग | ०८.०० | ४८०.०० |
| ३१ | PVC सोल्युशन | फिनोलेक्स | ०१ | लिटर्स | ४००.०० | ४००.०० |
| ३२ | प्लंबींग खिळे- २.१/२" | - | ०५ | किलो | ९०.०० | ४५०.०० |
| ३३ | क्लीप पट्टी- ४" | - | १०० | नग | ५.०० | ५००.०० |
| | | | | | **एकुण-** | **२,५५,५५४.००** |

साईआश्रम प्रकल्प भाग- १ व २ करीता वॉटर कुलर्स चे कनेक्शन करणेसाठी वरीलप्रमाणे प्लंबींग साहित्य खरेदी करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे रु. २,५५,५५४/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे साहित्य तातडीने कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,५५,५५४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.३३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईआश्रम प्रकल्प भाग ०१ व ०२ येथे निवास करणाऱ्या साईभक्तांना पिण्याचे थंड पाणी उपलब्ध करुन देणेकामी खरेदी केलेले वॉटर्स कुलर्स जोडणीसाठीचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

**तसेच, सदरचे काम तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने याकामी प्राप्त होणारी कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडुन योग्य ती कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,५५,५५४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग प्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४** **संस्थान परिसरातील इमारतींसाठी पाणी घेणेसाठी पी.व्ही.सी. पाईप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचे जा.क्रं.सिंचन/९/ १०४३/२०१३, दि.०२.०२.२०१३ पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये त्यांनी गोदावरी/ दारणा नदी, गोदावरी डावा/उजवा कालव्यातून शासन मंजुरीनुसार पिण्याचे पाणी पुरवठा आवर्तन संस्थानचे साठवण तलावात माहे डिसेंबर २०१२ व जानेवारी २०१३ या कालावधीत देण्यात येवून पिण्याचे पाणी पुरवठा केलेला आहे. उपरोक्त पत्रात त्यांनी चालु वर्षी प्रकल्पाच्या जलाशयावर व संपुर्ण लाभक्षेत्रात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाल्याने प्रकल्पातील धरणांमध्ये देखील पुरेसा पाणीसाठा उपलब्ध झालेला नाही. जलाशयातील उपलब्ध पाणी साठा हा माहे जुलै २०१३ पावतो पुरवावयाचा असल्याने पाणी अत्यंत काटकसरीने पुरविणेबाबत कळविले आहे.

यावर उपाय-योजना म्हणून माहे मार्च २०१३ पासून पाणी वापर काटकसरीने करणेबाबत परिपत्रक ठिकठिकाणी लावण्यात आलेले आहेत. बगीचासाठी बोअरवेल व विहीरीच्या पाण्याचा वापर करणेबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच श्री साईप्रसादालयात आवश्यक त्यावेळी ताटांऐवजी पत्रावळीचा वापर सुरु करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच आवश्यक त्या ठिकाणी पाणी कपात सुरु करण्यात आलेली आहे. कर्मचारी वसाहत व बगीचासाठी वापरात येणारे पाण्याचे प्रमाण कमी करुन उर्वरीत पाण्याचा वापर साईभक्तांचे वापरासाठी करण्यात येत आहे. तसेच साठवण तलावाचे बाजूचे स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरीतून पाईपलाईन टाकून ते पाणी वापरासाठी घेणेसाठी पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

दिनांक ०२.०३.२०१३ रोजी शिर्डीत श्रीसाईचे दर्शनासाठी साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढल्याने व साठवण तलावातील पाणी संपल्याने पाणी टंचाई निर्माण झाली. संस्थान परिसरातील विहीरी व बोअरवेल तसेच स्थानिक शेतकऱ्यांचे विहीरीतून पाणी घेणेसाठी सदरच्या उपलब्ध विहीरीत मोटरी टाकून पाणी घेण्यात आलेले आहे. या विहीरीतून उपलब्ध होणारे पाणी साईभक्तांचे वापरासाठी अपुरे पडत असून अजून जादा प्रमाणात पाण्याची उपलब्धता करावी लागणार आहे.

माहे जुन २०१२ मध्ये पाणी पुरवठा विभागाकरीता आवश्यक मटेरियल खरेदी करण्यात आलेले आहे. यावेळी सदरचे मटेरियल वापरण्यात येवून पाण्याची तात्पुरती सोय करण्यात येवून संस्थान परिसराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आलेला आहे. ज्या ठिकाणांहून मोटारी बसवून पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे तेथुन सलग पाणी उपलब्ध होत नाही. जो पर्यंत विहीरीत पाणी उपलब्ध आहे तो पर्यंत मोटार चालविली जाते. विहीरीतील पाण्याचा उपसा झाल्यानंतर विहीरीत पाण्याची लेव्हल होईपर्यंत मोटार बंद ठेवावी लागते. परिसरातील विहीरींची पाण्याची पातळी यावर्षी जादा प्रमाणात खालावलेली असल्याने जास्त संख्येने विहीरींची उपलब्धता शोधून पाणी उपलब्ध करावे लागणार आहे. पाटबंधारे विभागाचे पत्राप्रमाणे जुलै २०१३ पर्यंत सदरची परिस्थिती राहणार असल्याने आपणास मिळेल तेथुन पाणी उपलब्ध करावे लागणार आहे.

दिनांक १८.०४.२०१३ ते दिनांक २०.०४.२०१३ अखेर श्रीरामनवमी उत्सव-२०१३ साजरा करण्यात येणार असल्याने श्रींचे दर्शनासाठी शिर्डीत मोठया प्रमाणावर साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता आहे. पाटबंधारे विभागाकडुन पाण्याचे रोटेशन वेळेवर उपलब्ध न झाल्यास, माहे एप्रिल ते जुलै २०१३ मध्ये पाण्याचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. याकरीता श्रीरामनवमी उत्सव २०१३ पुर्वी आपणास पाण्याची सोय उपलब्ध करावी लागणार आहे.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी साठवण तलावाचे उत्तर बाजूस श्री औताडे यांची विहीर व श्री सापिके यांचा बोअरवेल आहे. दोन्ही ठिकाणी भरपुर प्रमाणात पाणी उपलब्ध असून सदरचे पाणी सायफनव्दारे कनकुरी साठवण तलाव येथे समपर्यंत नेल्यास आपणास दररोज सलग साधारणतः ४ इंच पाणी उपलब्ध होईल.

यासाठी आपणास खालीलप्रमाणे मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.नं | मटेरियल तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ४" पि.व्ही.सी. पाईप (४ के.जी.)- जैन कं. | ४३० नग. | रु. ७१०/- प्रती नग. | ३,०५,३००.०० |
| ०२ | ४" पि.व्ही.सी. बेंड. | १५ नग. | रु. २०५/- प्रती नग. | ३,०७५ |
| ०३ | ४"x३" पि.व्ही.सी. रेडयुसर. | १० नग. | रु. ६२/- प्रती नग. | ६२०.०० |
| ०४ | ३" पि.व्ही.सी. टेलपीस. | १५ नग. | रु. ३५/- प्रती नग. | ५२५.०० |
| ०५ | ३" नॉन रिटर्न व्हॉल. | ०९ नग. | रु. १२००/- प्रती नग. | १०,८००.०० |
| ०६ | पि.व्ही.सी. सोल्युशन. (१ लि.पॅकिंग) | ०६ नग. | रु. ३४५/- प्रती नग. | २,०७०.०० |
| | | | एकुण रक्कम- | ३,२२,३९०.०० |

वरील प्रमाणे मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे रु. ३,२२,३९०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी वरीलप्रमाणे मटेरियल कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु. ३,२२,३९०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी.

**निर्णय क्र.३३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील इमारतींसाठी शिर्डी परिसरातील विहीरींवरुन पाणी घेणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेत यावे, असे ठरले.**

**तसेच, सध्याची पाणी टंचाई विचारात घेता, सदरचे काम तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने याकामी प्राप्त होणारी कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडुन योग्य ती कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,२२,३९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **साईनाथ मंगलकार्यालय नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरालगतच उत्तर पूर्वेला संस्थानचे श्री साईनाथ मंगल कार्यालय इमारत आहे. सदर इमारत विस्तारीकरणाचे काम सन २०००-२००१ मध्ये करणेत आले आहे. तसेच त्यानंतर सन २००८-२००९ मधे सदर इमारतीचे आतील बाजुने रंगकाम करणेत आले आहे.

मा. अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.०७/०३/२०१३ रोजी सदरहू मंगल कार्यालयाची पाहणी कली यावेळी सदर इमारतीचे आतील व बाहेरील रंगकाम करणेबाबत सूचना दिल्या आहेत. याबाबत साईप्रसाद निवासस्थान विभागाने दि.०८/०३/२०१३ रोजीचे टिपणीनुसार कळविले आहे. मा. प्रशासकीय अधिकारी यांनी सदर मंगल कार्यालयातील भिंतीला ७ फुट उंचीचे टाईल्स लावल्यास स्वच्छता राहील असे टिपणीवर नमूद केले आहे.

सध्या सदर इमारतीत फ्लोरींगकरीता कोटा फरशी, जिन्यात कडप्पाचे टप्पे, लाकडी खिडक्या असून सदर इमारत बरीच जुनी असल्याने सदर इमारतीचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. नूतनीकरणामध्ये खालील बाबींचा समावेश करता येईल.

१. सध्या असलेल्या कोटा फरशीवर नविन व्हिट्रीफाईड टाईल्स व भिंतीस ७ फुट उंचीचा डॅडो करणे
२. इमारतीचे पायऱ्या व जिन्याचे पायऱ्यांना नविन ग्रेनाईट टप्पे घेणे.
३. सध्या असलेल्या खिडक्या काढून ग्रेनाईट सिल व ॲल्युमिनिअम स्लायडींग (थ्री ट्रॅक) खिडक्या व नविन एम.एस. ग्रील बसविणे
४. संडास बाथरुमचे सध्याचे लाकडी चौकटी खराब झालेल्या असल्याने नविन आर.सी.सी. चौकटी बसविणे, खराब झालेले लाकडी शटर काढून फायबरचे शटर घेणे.
५. संडास - बाथरुमचे फ्लोरींग / डॅडो करीता सध्याचे ग्लेझ्ड टाईल्स काढून नविन पध्दतीने सिरॅमिक टाईल्स बसविणे, नविन संडास भांडे बसविणे
६. पाण्याची पाईप लाईन, सांडपाण्याची व संडास बाथरुमची पाईप लाईन नवीन टाकणे, प्लंबीगची इतर सर्व कामे करणे.
७. संडास- बाथरुमचे जुने वाटरप्रुफींग तोडून नविन वॉटरप्रुफींग करणे
८. आतील बाजुने लस्टरपेंट व बाहेरील बाजुने ॲपेक्स पेंट घेणे.
९. इमारतीचे बाजुने पेव्हींग ब्लॉक बसविणे
१०. कॉलमला ग्रेनाईटचा डॅडो करणे.
११. किचन शेड मधील फ्लोरींग व डॅडो बदलणे, रंगकाम करणे.

वरीलप्रमाणे कामांचा समावेश करुन नूतनीकरण केल्यास मंगल कार्यालय इमारत सुशोभित होईल तसेच इमारतीचा भक्तांसाठी अधिक उपयोग होईल. याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/०६/२००९ रोजीचे सभेतील नि.क्र.५२९ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झाला आहे.

"श्री साईनाथ मंगल कार्यालयाचे नूतनीकरण करणे ऐवजी सदर इमारत पाडण्यात येऊन त्याठिकाणी सांस्कृतीक भवन बांधणेबाबत आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन तयार करुन तो. मा. व्यवस्थापन समितीचे निणयार्थ सादर करावा असे ठरले."

साईनाथ मंगल कार्यालयाचा प्लॉट ८८७ चौ.मी. एवढे क्षेत्रफळाचा आहे. त्यात तळमाळ्यावर १८३ चौ.मी. क्षेत्रफळ बांधकाम असून पहिल्या माळ्यावर ३३७ चौ.मी. क्षेत्रफळ बांधकाम आहे. एकूण ५२० चौ.मी. इतके बांधकाम करणेत आलेले आहे. सध्याची इमारत पाडून नविन इमारतीचे बांधकाम केल्यास इतके क्षेत्रफळ उपलब्ध होणार नाही. याकरीता नवीन इमारत बांधणे ऐवजी सध्याचे इमारतीचे नूतनीकरण करणे योग्य होईल.

साईनाथ मंगल कार्यालय इमारतीचे नूतनीकरण करणेस प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.४०,००,०००/- मात्र खर्च येईल. याकामी संस्थानचे खालील आर्किटेक्ट यांचेकडून सेवा घेता येईल.

**१.** काबरे चौधरी आर्किटेक्ट, नाशिक **२.** आर्किटेक्ट अरविंद वैद्य ॲण्ड असो. संगमनेर
**३.** आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे **४.** आर्किटेक्ट अविनाश डहाणुकर, मुंबई

उपरोक्त कामासाठी आर्किटेक्टचरल डीझाईन, ड्रॉईंग, एस्टीमेट व निविदा इ. साठी सेवा घ्यावी लागणार आहे. याकामी काबरे चौधरी आर्किटेक्ट, नाशिक यांचेकडून सेवा घेता येईल असे मत आहे.

तरी संस्थानचे श्री साईनाथ मंगल कार्यालयाचे नूतनीकरण करणेसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेस व याकामी आर्किटेक्चरल सेवा पुरविणेसाठी काबरे चौधरी, आर्किटेक्ट यांची नियुक्ती करणेस मा. त्रीसदस्य समिती सभेत मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६ साईआश्रम प्रकल्पाचे उद्‌घाटनासाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे नियोजित शिर्डी भेटीकरीता मंडप उभारणी व इतर आवश्यक कामे करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दानशूर साईभक्त मा.श्री. के.व्ही.रमणी संस्थापक तथा कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दि.२४/११/२००५ चे पत्राव्दारे साईभक्तांसाठी भक्तनिवास इमारतींचे बांधकाम त्यांचे ट्रस्टतर्फे देणगीदाखल करुन देणेची तयारी असलेबाबतचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केला होता. त्यावर दि.१८/१२/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.७८३ अन्वये संस्थानतर्फे जागा उपलब्ध करुन देणे व इमारत बांधकामाचा सर्व खर्च शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी करणे व यासाठी त्यांचे बरोबर आवश्यक करारनामा करुन घेण्यात यावा असे ठरले. त्यानुसार संस्थान व शिर्डी साई साई ट्रस्ट, चेन्नई यांचे दरम्यान दि.०४/०२/२००६ रोजी समझोता करारनामा (MOU) करण्यात आला आहे. त्यानुसार "साई आश्रम" या भक्तनिवास प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी पूर्ण केले आहे, तसेच संस्थानतर्फे परिसर विकासाचे व इतर आवश्यक कामे पूर्ण करण्यात आली आहेत

यापैकी साई आश्रम भाग-१ चे बांधकाम मौजे शिर्डी येथील संस्थान मालकीचे सर्व्हे नं. १०७,१०८ व १०९ पै. मधिल ५ हे. ८० आर १७ चौ.मी. क्षेत्रफळाचे भूखंडावर करण्यात आलेले आहे. त्यामधिल एकूण १२ निवासी इमारतींमधील १५३६ खोल्यांची निवास क्षमता ६१४४ व्यक्ती इतकी आहे. तसेच साई आश्रम भाग-२ चे बांधकाम मौजे निमगांव कोऱ्हाळे येथिल संस्थान मालकीचे गट नं.१७२ मधिल ६ हे.७९ आर क्षेत्राचे भूखंडावर करण्यात आलेले आहे. त्यामधिल एकूण ०६ निवासी इमारतींमधील १९२ हॉल्सची निवासक्षमता ३४५६ व्यक्ती इतकी आहे.

सदर प्रकल्पाचे उद्घाटन मा.ना.श्री. पृथ्वीराजजी चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभ हस्ते गुरुवार, दि.११/०४/२०१३ गुढीपाडवा या शुभदिनी करण्याचे नियोजीत आहे. कार्यक्रमाचे पूर्व तयारी करीता दि.२०/०३/२०१३ रोजी मा. कार्यकारी अधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी व इतर अधिकाऱ्यांनी कार्यक्रम स्थळाची पाहणी केली. यावेळी उद्घाटन कार्यक्रमाकरीता कार्यक्रम स्थळावर मंडप उभारणीची जागा ठरविण्यात आली त्यानुसार आर ब्लॉक इमारतीचे दक्षिणेस व एच व आय या इमारतींचे उत्तरेस असलेल्या अंतर्गत रस्त्यांचे मोकळ्या जागेत पूर्व-पश्चिम असा मंडप उभारण्याचे ठरले आहे. त्यामध्ये स्टेज पश्चिमभिमूख करावयाचे आहे. याप्रमाणे मंडप, स्टेज, खुर्च्या, साउंड सिस्टिम व्यवस्था व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेसाठी अंदाजे रु.८ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे येणारे एकूण रु.८.०० लक्ष मात्रचे अपेक्षित अंदाजे खर्चास प्रशासकिय मान्यता मिळणेस विनंती. तसेच उपरोक्त कामासाठी विहीत पद्धतीने कोटेशन्स/ दरपत्रके मागवून काम करणेसाठी मंजुरी मिळणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.३३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्पाचे उद्‌घाटनासाठी मा.ना.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे नियोजित शिर्डी भेटीकरीता मंडप उभारणी व इतर आवश्यक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन, प्राप्त होणारी कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडुन त्यातील निम्नतम दरधारकास कार्यादेश देण्यात यावा व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.३३७** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

**(१)** श्री साई प्रसादालयामध्ये विनामुल्य प्रसाद भोजन देणेसाठी देणगी देणाऱ्या दानशुर साईभक्तांचा त्या-त्या दिवसासाठी डिजीटल इलेक्ट्रॉनिक्स बोर्ड लावणेत यावा.

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय/ विद्युत विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र. २६२ ते ३३७ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्री ०८.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी